# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०२/२००७

आज दि. २०/०२/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १२ दि. ०७/०२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ४) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| ८) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १०) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ११) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १२) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १३) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| १४) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| १६) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| १७) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| १८) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| १९) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| २०) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| २१) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| २२) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| २३) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| २४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| २५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| २६) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| २७) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| २८) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| २९) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३०) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ३१) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ३२) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ३३) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ३४) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३५) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ३६) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ३७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ३८) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ३९) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ४०) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ४१) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ४२) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| २) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ३) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ४) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ५) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ८) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ९) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १०) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ११) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १२) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १३) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| १४) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| १५) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| १६) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| १७) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| १८) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| १९) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| २०) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| २१) | श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| २२) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २३) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २४) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| २५) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| २६) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २७) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| २८) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| २९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ३०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ३१) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ३२) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ३३) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ३४) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ३५) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ३६) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ३७) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| ३८) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज दिलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ३) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |

**मा. महापौर :-**

सचिवांनी कामकाजास सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रीय गितासाठी जागेवर उभे राहायचे आहे.

(वंदे मातरम् या राष्ट्रीय गितानंतर सभा सुरु करण्यात आली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार. २० फेब्रुवारी २००७ ची मा. महासभा या सभेसाठी सभागृहात उपस्थित असलेले मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड साहेब तसेच नगरसचिव श्री. हरेश पाटील साहेब, उपस्थित असलेले विरोधी पक्षनेता श्री. परशुराम पाटील साहेब, सर्व समितींचे सभापती, उपस्थित असलेल्या सर्व नगरसेवीका आणि नगरसेवक, सर्व गटनेते तसेच सर्व सन्मा उपायुक्त, अधिकारी वर्ग , प्रेक्षक गॅलेरीत उपस्थित असलेले सर्व बंधु - भगिनी सर्व वृत्तपत्राचे प्रतिनिधी . आजची सभा ही विषयपटलावर दिलेल्या विषयांवर चर्चा करण्याकरीता बोलविण्यात आलेली आहे. विशेष करुन त्या सन्मा. सभापतींचे अभिनंदन करते व त्यांच्या कामामध्ये सुयश येवो प्रत्येक समितीच्या सभापतींनी पुढील कामकाजासाठी चांगल्या प्रकारे अग्रक्रम करावा अशी मी त्यांना शुभेच्छा देते. शिक्षण समितीचे सभापती श्री. हंसुकूमार पांडेजी, आरोग्य परिरक्षण समितीचे सभापती श्री. चंद्रकांत मोदी साहेब, क्रिडा व समाजकल्याण समितीच्या सभापती श्रीम. गिता जैन मॅडम, गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीचे सभापती श्री. अशोक बळवंत पाटील साहेब ह्यांची निवड झाल्याबद्दल मी सभागृहातर्फे व महापौरांतर्फे हार्दिक अभिनंदन करते. व चांगल्या कार्यासाठी त्यांचे सुयश चिंतते धन्यवाद. सचिवांनी पुढील कामकाजास सुरुवात करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, श्री. मिलन पाटील व श्री. याकुब कुरेशी यांचेही तुम्ही अभिनंदन करा ना.

**मा. महापौर :-**

विधी समितीचे सभापती पदी श्री. मिलन पाटील व पाणी पुरवठा समितीच्या सभापती पदी श्री. याकुब कुरेशी यांची निवड झाल्याबद्दल मी त्यांचेही अभिनंदन करते. धन्यवाद.

(मा. नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. बारा वाजलेले आहेत. सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गारोडीया यांचा प्रश्न आहे. ते गैरहजर आहेत. पुन्हा सन्मा सदस्य श्री. ओमप्रकाश गारोडीया यांचा प्रश्न आहे, ते गैरहजर आहेत. सन्मा. सदस्य श्री. रमेश जैन हे देखील गैरहजर आहेत. सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे हे देखील गैरहजर आहेत. आजच्या सभेचे प्रश्न संपलेले आहेत. त्यामुळे सभागृहाच्या परवानगीने मी पुढील विषयाला सुरुवात करत आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी तुम्ही दिलेले प्रश्न प्रशासनाने लिमिटेड दिलेले आहेत. त्याच्या पुढेही प्रश्न आहेत. एकतर घेणार नसाल तर पुढचे प्रश्न क्रमशः घेता. एकतर प्रश्नांना वेळ मिळत नाही. वर्ष वर्ष प्रश्न येत नाहीत आता वेळ आहे तर हे आले नाहीत म्हणुन तुमची तयारी नाही म्हणुन प्रश्न संपला असे म्हणत असाल तर ते योग्य नाही. पुर्ण प्रश्न संपले आहेत का ते जाहिर करा. परत नवीन प्रश्न टाकले तर पुढच्या मिटींगला आले पाहिजेत. वर्ष वर्ष लोकांचे प्रश्न आले नाहीत.

**नगरसचिव :-**

नवीन टाकले आहेत. हे प्रश्न शेवटच्या प्रश्नापर्यंत होते.

**प्रकाश दुबोले :-**

आत्ता कोणतेच प्रश्न शिल्लक नाहीत?

**नगरसचिव :-**

शिल्लक नाहीत. आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पाहिली लक्षवेधी सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांची आलेली आहे. त्यांचा विषय आहे, महाराष्ट्र शासनाच्या धोरणांचा एस. ई. झेड. मुळे उत्तन , डोंगरी, पाली हा विभाग बाधित झाला असुन तेथील नागरिकांन समोर उभ्या राहिलेल्या समस्यांन बाबत. दुसरी लक्षवेधी सन्मा. सदस्या श्रीम. संगिता विजय म्हात्रे यांची आहे .श्री. ए. एस. सुर्यवंशी, प्रशासन अधिकारी महापालिका शिक्षण मंडळ मिरा भाईंदर महानगरपालिका यांची बदली करणेबाबत. अशा दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी श्री. रोहिदास शंकर पाटील यांची आहे व दुसरी सौ. संगिता विजय म्हात्रे यांची आहे. या दोन्ही लक्षवेधी सुचना मा. महापौरांना सादर करतो. मी आलेल्या लक्षवेधी पुर्ण वाचुन दाखवतो.

(नगरसचिवांनी सन्मा. सदस्य श्री. रोहिदास शंकर पाटील व सन्मा. सदस्य सौ. संगिता विजय म्हात्रे यांच्या लक्षवेधीचे वाचन केले.)

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सभागृह मा. महापौर मॅडम, ज्या दोन लक्षवेधी आल्या आहेत. प्रघाताप्रमाणे आपण पहिली लक्षवेधी घेत असतो आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब आपली पहिली लक्षवेधी एस. ई. झेड बाबत आहे, ती घ्यायची आहे. परंतु दुसऱ्या लक्षवेधीबाबत मी सभागृहाच्या निदर्शनास एक बाब आणतो की, शिक्षण अधिकारी श्री. ए. एस. सुर्यवंशी साहेब........

**रोहिदास पाटील :-**

माझे तुमच्या वक्तव्यावरच पहिले ऑब्जेक्शन आहे. ज्यावेळी सभागृहामध्ये हे कामकाज नियमानुसार चालवायचे असे ठरल्यानंतर या डायसवर कोणी बसावे असे जेव्हा ठरले. तेव्हा असे ठरले की, प्रथा अशी आहे. की, मा. महापौर , मा. आयुक्त आणि सचिव असे बसणे गरजेचे आहे. आपण अधिकाऱ्यांना खाली घेतले. त्या पध्दतीने मा. उपमहापौर सुध्दा खालीच यायला पाहिजे. वर बसायचे नाही आणि तुम्ही तर आत्ता निवेदने करता. आम्ही काय स्विकारायचे ? तुमचे बसणे स्विकारायचे की तुमचे निवेदन ऐकुन घ्यायचे.

**मा. उपमहापौर :-**

या बाबतीत जो नियम असेल त्या नियमाप्रमाणे आपण करु. फक्त माझे एक निवेदन अतिशय महत्वाचे आहे. शहराच्या हितामध्ये आहे. ते आपल्याला सांगतो की, शिक्षण अधिकाऱ्यांना आपण इथुन कार्यमुक्त केले. तशा आशयाचे आदेश मा. आयुक्त महोदयांनी पारित केले. मा. महासभेला आश्वासित केले आणि पुन्हा संबंधीत शिक्षण अधिकारी दुसरी ऑर्डर घेउन आले. त्यांचे कार्यालयसुध्दा मा. आयुक्तांनी सिल केले आणि त्यानंतर शिक्षण अधिकारी पुन्हा एक ऑर्डर घेउन आले की, त्यांना इथे कंटीन्यु करायचे तो अधिकार महापालिकेचा नाही तो अधिकार शिक्षण खात्याचा आहे आणि वारंवार शिक्षण उपसंचालिका श्री. काकड मॅडम, यांच्याकडुन पत्र आणले जाते आणि ते पत्र आपल्या महापालिकेला पुन्हा सादर केलेले आहे. तर ह्या लक्षवेधीनंतर आपल्याला ह्या विषयावर काय चर्चा करता येईल किंवा कसे? नसेल तर पुढील सभेमध्ये हा विषय रितसर आणावा. आणि या विषयावर चर्चा व्हावी.

**रोहिदास पाटील :-**

विषय पुढील सभेत आणा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी मा. उपमहापौरां बद्दल जे वक्तव्य केले. मा. उपमहापौर डायसवर बसु शकतात.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. तच आम्हाला विचारायचे होते. कूठल्या महापालिकेमध्ये उपमहापौर डायसवर बसलेले आहेत.

**हंसुकूमार पांडे :-**

चार लोग डायसवर बैठ सकते है। मा. उपमहापौर डायसवर बैठ सकते है।

**शशिकांत भोईर :-**

कुठल्या कायद्यात दिलेले आहे की, उपमहापौर डायसवर बसु शकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

हे कायद्यात नाही.

**मा. महापौर :-**

गेल्या वेळेला सभेमध्ये चर्चा झाली.

**रोहिदास पाटील :-**

ते बसले आहेत त्यांना खाली उतरा असा आदेश देत नाही. ते नियमानुसार नाही.

**हंसुकूमार पांडे :-**

चार लोक बसु शकतात.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपमहापौर डायसवर बसु शकत नाहीत असा नियम दाखवावा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. पाच वर्षे उलटुन गेली तेव्हा आपण कुठे होते. आणि आत्ता दोन - तीन महिने राहिल्यानंतर तुम्ही मा. उपमहापौरांना तिथे बसायचा अधिकार नाही असे बोलता हे चुकीचे आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, याबाबतीमध्ये खुलासा करावा. कारण ज्या पध्दतीने मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये उपमहापौर हे डायसवर बसू शकतात.

**रोहिदास पाटील :-**

सचिवांनी निवेदन करावे.

**नगरसचिव :-**

मागील सभेत चर्चा झाल्याप्रमाणे मा. महापौरांनी असे निर्देश दिले होत की, फक्त जे अधिकारी बसतात त्यांना खाली बसायची व्यवस्था करावी. त्याप्रमाणे व्यवस्था केलेली आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

बरोबर आहे.

**रोहिदास पाटील :-**

डायस हे व्यासपिठ आहे. व्यासपिठावर कोणी बसावे याचे नियम आहेत.

**जयंत पाटील :-**

सभाशास्त्र काय म्हणते तेवढेच सांगा.

**नगरसचिव :-**

सभाशास्त्रा प्रमाणे व्यासपिठावर मा. महापौर, मा. आयुक्त आणि सचिव हे बसु शकतात.

**परशुराम पाटील :-**

अधिकाऱ्यांनासुध्दा खाली बसण्याची काहीतरी व्यवस्था करा. त्यांचासुध्दा तुम्ही चांगला विचार करा ते अधिकारी किती चांगले ते बघा ना. त्यांना सुध्दा खाली बसायला लावले . त्यांना टेबल नाही, काही नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही उपमहापौरांना खाली उतरवत नही. तुम्ही खाली बसा.

**परशुराम पाटील :-**

कशाला खाली बसायचे . आपण जे वक्तव्य करता ते चुकीचे आहे. म्हणुन आम्हाला उठावे लागते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौरांनी आदेश दिले आहेत. मग विषय संपला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी एका एकाने बोला.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपमहापौरांनी डायसवर बसावे असा आपला आदेश आहे का? असा नियम नाही ना?

**प्रभात पाटील :-**

असा नियम असेल तर आम्हाला दाखवा.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, तुमचा आदेश आहे ना?

**मा. महापौर :-**

माझ्या संमतीने मा. उपमहापौर माझ्या बाजुला डायसवर बसतील

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांची परवानगी असताना आपल्याला काहीच बोलायचा अधिकार नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांचे काय?

**परशुराम पाटील :-**

मा. उपमहापौरांनी जेव्हा मा. उपमहापौरांना बसण्याचा अधिकार आहे असे बोलल्यानंतर तुम्हाला बोलण्याचा अधिकारच नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य श्री. परशुराम पाटील न्यायपालिका मे किसीका भी चलता नाही। न्यायपालिका सबसे उपर है।

**रोहिदास पाटील :-**

सिर्फ न्याय चलता है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

न्यायपालिका के उपर कोई भी नही है। आज के तारीख मे सुप्रीम.......

(सभागृहात गोधंळ )

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य श्री. परशुराम पाटील, मा. मुख्यमंत्री, मा. प्रधान मंत्री वो भी न्यायपालिका के निचे ही है। उसके लिये न्यायपालिकाके उपर जाने की कोशिश आप मत किजिए।

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी बसुन घ्यावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

न्यायपालिका के सुप्रीम ने बोला है की, बैठो तो बैठ सकते है ना।

**रोहिदास पाटील :-**

बसु द्या मा. महापौर मॅडम, लक्षवेधी बद्दल बोलायचे ना? मी भारतीय जनता पार्टीच्या वतीने या सभागृहात आपणा सर्वांचे लक्ष वेधु इच्छितो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये शासनाच्य धोरणानुसार मुर्धा, राई, मोर्वा, डोंगरी , पाली, चौक, उत्तन परिसर जे म्हणतो तो, हा सर्व परिसर विशेष आर्थिक विकास क्षेत्र म्हणुन घोषीत केलेला आहे. जे घोषित करुन आज अनेक महिने होउन गेलत. तरी सुध्दा महानगरपालिकेच्या वतीने प्रशासनाच्या किंवा शासनाच्या वतीने त्याबद्दल सविस्तर चर्चा या सभागृहात झाली नाही. आधीच्या मा. महासभेमध्ये आम्ही ह्याच्यावर आम्ही आवाज उठवला होता. सगळ्यांच्या निदर्शनास आणले होते की, अगदी महत्वाचा हा विषय आहे तिथे राहणाऱ्या मच्छिमारंचा तिथे राहणाऱ्या शेतकऱ्यांचा, तिथे राहणाऱ्या नागरिकांचा ज्यांची मालकी जमीन आहे. अशा जमीन मालकाचा हा विषय आहे. की शासनाने जे आज केंद्रात कॉंग्रेसचे सरकार आणि महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरकार सरकार मध्ये काय चाललेले आहे हे लोकांना समजायच्या आधी सरकारला त्या सरकारमध्ये बसलेले हितसंबधी जे अधिकारी आणि पदाधिकरी आहेत त्यांच्या संगनमताने काय होते त्याचा हा नमुना आहे. की, मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील पाच हजार चारशे हेक्टर जमीन ही आर्थिक विकास क्षेत्राखाली घातली गेली. ज्याच्यामध्ये तीन हजार हेक्टर जमीन ही खाजगी जमीन आहे. ज्या खाजगी जमीनीवर जरी ती रेकॉर्ड वर दिसत असली की, अमुक एक जमीन सरकारी आहे. सरकारी जमीन असली तरी उत्तनच्या नागरिकांनी, उत्तनच्या मच्छिमारांनी ती शासकीय जमीन असताना सुध्दा गेली अनेक वर्षे झाली आपल्या उपजिवीकेचे साधन म्हणुन शेती निर्माण केली ज्या ठिकाणी शेती निर्माण केली. त्या ठिकाणी त्यांनी तिथे आपली घरे निर्माण केली. आणि असे असतांना सुध्दा ही सरकारी जमीन घेतो असे कुठे तरी छापले जाते. आमचे त्यावर असे स्पष्ट मत आहे किंवा आम्ही निदर्शनास आणतो की, जी सरकारी जमीन म्हणुन रेकॉर्डवर आहे त्यातली निम्मी जमीन अनेक शेतकऱ्यांच्या किंवा तिथल्या भुमिपुत्रांच्या, मच्छिमारांच्या ताब्यात आहे. ती विहीत उपक्रमासाठी राबवली जाते. एकतर त्याच्यामध्ये काहींची शेती आहे तर अनेक मच्छिमार आहेत ते मासळी सुकवण्यासाठी बोट रिपेअर करण्यासाठी किंवा बोटी साकारण्यासाठी, पावसाळ्यामध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये त्या बोटी उभ्या केल्या जातात. अशासाठी त्या मच्छिमारांच्या ताब्यात आहेत पण रेकॉर्ड असे दाखवते की ती जमिन सरकारी आहे आणि कूठे तरी छापुन येते की, सरकारी जमीन घेतली जाईल . मालकी जमीन घेतली जाणार नाही पण आज ह्या एस. ई. झेड च्या बाबतीत सर्व भागांनमध्ये विशेषतः ठाणे आणि रायगड जिल्ह्यामध्ये याच्यावरआक्रोश सुरु आहे. मी तुम्हाला माहिती म्हणुन सांगतो की, उत्तन परिसरातील सुमारे दहा हजार लोकांनी ऑब्जेक्शन पिरिएडमध्ये आपले ऑब्जेक्शन निट, नियमात, योग्य ठिकाणी ती पोहोचवलेली आहेत. आपले ऑब्जेक्शन घेतलेले आहेत. पण त्याच वेळी सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी ही फक्त विरोधी तेथील नागरिकांची दिशाभुल करते असे जे पत्रक काढले हे अतिशय निंदनीय आहे, लोकाची दिशाभुल करणारे आहे आणि ज्याला सत्तेची मस्ती म्हणतात. त्याचा तो नमुना आहे. आम्ही स्पष्ट म्हणतो की, जनतेच्या हितासाठी, महापालिकेच्या हितासाठी जे असेल त्याचे आम्ही स्वागत करु. पण, भारतीय जनता पार्टी असे काम करतेवेळी त्याच्यावर बोलले जाते की हे लोकांमध्ये मतभेद तयार करतात. लोकांची दिशाभुल करतात. पण ही वास्तविकता आहे . मी शासनाचे आदेश वाचुन दाखवतो. की, मेरी टाईम बोर्ड कडे आदेश दिलेले आहेत की, हे बंदर टर्न इंडिया आणि आज साठी यांच्याकडे सुपूर्द करावे. आज तुम्हाला सर्वांना माहिती असेल की, यांचे सर्व्हे सुरु झालेला आहे. आधी मच्छिमारांचे सर्व्हे झाले . समुद्राचा सर्व्हे झाला. त्याच्यात मच्छिमांराना मच्छिमारी करण्यात बंदी करण्यात आली. आता शेतीचा सर्व्हे सुरू झालेला आहे. आणि शेतीचा सर्व्हे करतेवेळी आपली महानगरपालिकाही त्याच्यामध्ये सामिल होते. ती लोकांना त्याची खरी बातमी देत नाही. खरे काय चाललेले आहे. हे ॲक्वीजेशन साठी चाललेले आहे की, लोकांना सजा देण्यासाठी चाललेले आहे. आज लोकांची दिशाभुल करुन चालणार नाही. मुर्धा खाडी पलिकडच्या तमाम, मग ते आगरी, कोळी, ख्रिश्चन, कुणबी आणि अन्य समाज जो तिथे अनेक वर्षापासुन राहतो त्याचे हित साधणे, हित बघणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे आणि कामात बिझी मॅडम, ते पहिले कर्तव्य आहे आणि तुम्ही तूमच्याच कामात बिझी आहात. आम्ही या सभागृहात सांगू इच्छितो की, ज्या पध्दतीने एम.एम. आर. डी ने पहिल्यांदा हा विभाग एम.एम. आर. डी कडे दिला त्यापध्दतीने त्याची माहिती सभागृहाला येणे गरजेचे होते. आपण करोडो रुपये उत्तनमध्ये खर्च केलेले आहेत. उत्तनमध्ये खर्च करुन आपण त्या नागरीकांना सुविधा द्यायच्या . आपल्या परिने त्यांना सुविधा देण्याचा प्रयत्न आपण केला. आणि आता शासन जी भुमीका घेते तेव्हा हे सगळे हॅडओव्हर करा. हॅडओव्हर करते वेळी आज अनेक ठिकाणी आज म्हणतात की, रिलायन्सचे पॅकेज आलेले आहे. रिलायन्स इंडिया कंपनीने शेतकऱ्यांनसाठी हे पॅकेज केले. ह्या मिरा भाईंदर शेतकऱ्यांनसाठी कूठले पॅकेज कोण कुठे करणार आहे. तेही माहित नाही. कोणती जमीन घेणार आहेत हे अमुक एक वर्षापासुन म्हणजे ज्याला आपण म्हणावे आपली ती मागणी, आपली भुमीका राहावी. सरकारला महानगरपालिकेच्या आजच्या सभेतील कामकाजाचे ठिक निवेदन जायला पाहिजे. नोटींग नीट जायला पाहिजे की, ज्यांनी पाच – सात वर्षा पुर्वी त्या जागेचा ताबा घेतलेला आहे ती सर्व जागा म्हणजे आमचे म्हणणे आहे की, शंभर वर्षा पासुन ती जागा आमच्या ताब्यात आहे. मग, ती मिठागरे असतील आमची शेतीची जमीन असेल की, डोंगराळ जमिन असेल. ही जमीन आमची आहे. आणि आमच्या जमिनीचा विचार झाला पाहिजे. आमच्या ताब्यात जमिन आहे, त्याचा विचार

झाला पाहिजे. फक्त जमिनीच्या स्क्वेअर फुटचा विचार करुन चालणार नाही. आमचा समुद्रावरही हक्क आहे. समुद्र आमचा आहे. पिढ्यान् पिढ्या , वर्षोनुवर्ष आम्ही त्यामध्ये मच्छिमार केलेली आहे. जशी आम्ही मच्छिमार केली तसे मच्छी खाणारे, विकणारे सर्व बाधित होणार आहेत. त्याचाही विचार होणे गरजेचे आहे. हा विषय अति महत्वाचा असल्या कारणामुळे मी सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. प्रशासनाने याबाबतीत नीट निवेदन करावे. आणि या सभागृहाच्या भावना , त्या तमाम उत्तनकरांच्या बाजुने यासाठी एकमताने ठराव आहे अशा पध्दतीचे निवेदन जाणे गरजेचे आहे. जेणेकरुन आम्ही तुम्हाला पुन्हा एकदा सांगतो की, आधी सरकार त्या गुर्मीत होते की, लोकांवर आपण जे लादले आहे ते लोक स्विकारतील पण अनेक संस्थांनी त्याला विरोध केला मग विरोध केल्यानंतर सरकारला त्याची जाणीव झाली. मी हे ही निदर्शनास आणतो की, केंद्र सरकारकडुन श्रीम. सोनिया गांधीनी याच्यावर नाराजी व्यक्त केलेली आहे. आमुकांचे हित साधण्यासाठी महाराष्ट्र सरकार, म्हणजे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी सरकार जर नागरिकांचे हित सोडून भांडवलदारांचे हित साधत असेल तर ह्या सभागृहाने त्याला एकमताने विरोध करायला पाहिजे हे आमचे मत आहे. त्याच्यावर प्रशासनाने निवेदन करावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी जी लक्षवेधी या सभागृहासमोर आणलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार सी. ई . झेड मुळे उत्तन, डोंगरी, पाली हा विभाग बाधीत झालेला असुन येथील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तर नक्की सी. ई . झेड हा काय प्रकार आहे आणि याच्यमुळे नागरिकांना कुठल्या प्रकारचा त्रास होउ शकतो? याचे सविस्तर निवेदन त्या विभागाचे अधिकारी आपल्यापुढे करतील आणि त्यातुन योग्य ती चर्चा होउन नागरिकांच्या हिताचा निर्णय या ठिकाणी हे सभागृह घेणार आहे.

**दिलीप घेवारे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आता जी लक्षवेधी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी मांडली त्याबद्दल थोडासा गैरसमज आहे. एस. ई. झेड या शब्दाबद्दल त्यांनी जे रायगड जिल्ह्यातील उदाहरण दिले ते आहे स्पेशल इकॉनामिक झोन विशेष आर्थिक क्षेत्र आपले जे एस. ई. झेड आहे. ते स्पेशल एन्टरटेन्मेंट झोन, विशेष करमणुक क्षेत्र आज आपल्याला जे निसर्गसौद्य लाभलेले आहे, मोठा समुद्र किनारा लाभलेला आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

विशेष आर्थिक क्षेत्र तूमच्याकडे आहेत बघा. दि.२९/९/२००६ ला. मा. मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत तूमच्याकडे आहे. याच्यामध्ये त्यांनी लिहीलेले आहे की, गोराई, उत्तन भागात पॅन इंडिया पर्यटन लिमिटेड यांच्यातर्फे विशेष आर्थिक क्षेत्र एस. ई. झेड निश्चीत करण्याबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत तुम्ही जे म्हणता आम्हालाही त्याच्यामध्ये माहिती आहे की, दोन प्रकारचे एस. ई. झेड आहेत.

**दिलीप घेवारे :-**

ती एक मिटींग होती....

**रोहिदास पाटील :-**

आमचा गैरसमज नाही. हे तुमचेच शब्द आहेत. तुमचे पेपर आमच्या हातात आहेत. त्यातल्या खाचाखोचा सांगा ना. आमच्या फायद्याचे असेल तर आम्ही सांगु.

**जोजफ घोन्सालविस :-**

आत्तापर्यंत २४ ऑगस्ट २००४ ला तुम्ही एम. एम. आर.डी.ए कडे आम्हाला सुपुर्द केले. तूम्ही या सभागृहाला कळवले? या सभागृहामध्ये तूम्ही काही सुचना काही ठराव आणला होता? एवढा मोठा एरिया तुम्ही तोडला. तुम्ही गुप्त का ठेवले? या सभागृहापासुन का लपवले? त्यावेळी तुम्ही ठराव का आणला नाही? त्याच्यानंतर एम. एम. आर.डी.ए कडे सगळ्याबाबी सुपुर्द केल्यानंतर परत एकोणतीस तारखेला तुमची ह्या एरियावर मालकी राहिली नाही. म्हणुन तूम्हाला या बैठकीत बोलावले सुध्दा नाही. कारण तुम्ही त्याचे मालक राहिलेले नाही. तुम्ही आम्हाला असे का हिनवता? आमच्याशी खोट का बोलतात? आता इथे तुमची मालकी उरलेली नही. तुम्ही सर्व्हेसाठी ठराव पास केला. २००३ ला झालेल्या ठरावाचे इम्प्लिमेंट आता करता. आणि लोकांना सांगता की, आम्ही तुम्हाला जमिनी नावी करुन देवु किंवा तुम्हाला सनद देउ. कशी काय देउ शकाल? आम्हाला तुम्ही सांगा की, ते कुठल्या कायद्यात बसते. तुम्ही आमच्याशी असे खोटे का बोलतात? ह्या सभागृहाला जी काय वस्तुस्थिती आहे ती सांगा. आमचे काय होणार आहे? आमचे हे बंदर ताब्यात घेणार आहेत ते बंदर ताब्यात घेतल्यानंतर आम्ही चाळीस - पन्नास हजार मच्छिमार धंद्याला मुकणार आहोत, आमच्या जागेला मुकणार आहेत आणि आम्ही रस्त्यावर येणार आहोत. प्रत्येक ५,७४० हेक्टर क्षेत्र टप्प्या टप्प्याने हे सरकार आमच्याकडुन काढुन घेणार आहेत. बदल्यात काय देणार आहेत. पुर्नवसनाची काही व्यवस्था आहे का? तुमचा स्केल काय आहे? जमिनीला काय भाव आहे? आम्ही जाणार कुठे, राहणार कुठे, खाणार काय आणि काय धंदा करणार? ही सगळी वस्तुस्थिती तुम्ही या सभागृहाला सांगा की काय होणार आहे? आणि तुम्ही जर एस्सेल वर्ल्ड किंवा आता सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील बोलले की, अंबानी, रिलायन्स वगैरे आता जी संसदीय कमिटी जेव्हा हे जाणुन घेण्यासाठी मुंबईला आली होती की, ह्या शेतकऱ्यांचा विरोध का आहे? तेव्हा हेच रिलायनस वाले, एस्सेल वर्ल्ड वाले यांनी बंडल शेतकरी उभे केले होते जेव्हा आम्ही खरोखर बाधित लोक पोहोचलो तेव्हा ते लोक पळाले. ही वस्तुस्थिती आहे आणि ह्यांच्या हातात हात घालुन ही

नगरपालिका जर चालत असेल आणि आम्हाला फसवत असेल तर याच्यसारखी शरमेची गोष्ट नाही. कारण आम्ही नगरसेवक असुन देखिल आमचा एरिया गेला हे तुम्ही आम्हाला सांगितले नाही. उगाच खोटे निवेदन करु नका. जे सत्य आहे ते सभागृहाला सांगा.

**दिलीप घेवारे :-**

याच्यामध्ये खरे आणि खोटे सांगण्याचा भाग नाही. वस्तुस्थिती जी झाली आहे ती सांगण्याचा अधिकार आहे. याच्यात धोरण काय, त्याचे नियोजन काय हे आम्हालाही माहिती नाही हे तूमच्य एवढेच आम्ही इथे माहितीगार आहोत. त्याच्यात तूम्ही जे सांगितले २४ ऑगस्ट २००४ ला.............

**रोहिदास पाटील :-**

याच्यामध्ये गोड शब्दात सांगा की, या सगळ्या प्रकरणामध्ये सरकार जे करते त्याच्यमध्ये अधिकारी प्रशासन म्हणुन महापालिका अनाभिज्ञ आहे आणि सत्ताधाऱ्यांना त्याचे काही पडलेच नाही असे निवेदन करा ना.

**दिलीप घेवारे :-**

असे मी कसे काय करणार?

**जयंत पाटील :-**

सत्ताधाऱ्यांना पडली नाही तूम्ही असे म्हणता. पण तूम्हीच आता सोनियाजींची वाह वा केली. सोनियाजी केंद्रामध्ये सत्तेवर आहेत. एका ठिकाणी तूम्ही सोनियाजींची वाहवा करता. सोनियाजींनी चांगला निर्णय घेतला. नाराजी व्यक्त केली असे तुम्ही म्हणता.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील साहेब तुम्ही कुठेतरी काही जोडु नका.

**जयंत पाटील :-**

तुम्हीच बोलले आहात. तुमचेच शब्द मी सांगतो. सत्ताधारी म्हणता तर सत्ताधारी गप्प बसलेले नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

या सभागृहामध्ये तुमची अवस्था आज काय आहे?

**जयंत पाटील :-**

तुमचेच शब्द मी तूम्हाला सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

तूम्ही भुमिपुत्र आहात. तूम्ही मान्यवर नगरसेवक आहात. अनक वर्षे काम करत आहात. एवढी मोठी प्रक्रिया झाल्यानंतर एका पक्षाला किंवा नगरसेवकाला किंवा नागरिकाला त्याची जाणीव नाही. हे आम्ही सभागृहासमोर आणतो.

**जयंत पाटील :-**

स्थानिक लोकांना जर त्या गोष्टीचा त्रास होत असेल....

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आमच्या बरोबर आहात याची आम्हाला खात्री आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका ) माझे जरा ऐका. आम्ही काय म्हणतो ते तर ऐका तुम्ही सरकारला का दोष देता.

**रोहिदास पाटील :-**

दोष कोणाला द्यायचा? हे कारस्थान सन्मा. अर्थमंत्री श्री. जयंम पाटील यांचे आहे का?

**मा. महापौर :-**

एका - एका सदस्याने बोला सर्वांना बोलण्याची संधी दिली जाईल.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मुळात विशेष आर्थिक क्षेत्र याचा कूठपर्यंत आम्ही अभ्यास केला आहे इथुन सुरुवात व्हायला पाहिजे सन्मा सदस्य श्री. रोहिदास पाटील विशेष अधिकार क्षेत्र जे आहे त्या कामगारांना जॉब मिळवण्यासाठी या देशाची प्रगती होण्यासाठी आहे हे आपल्यासारख्या सुज्ञ नगरसेवकाला सांगायची गरज नही. दुसरा भाग असा आहे की, आपल्याकडे जे कोळी समाज आहे किंवा ख्रिश्चन समाज तिथे वसलेला आहे. आज आपण जे मघाशी बोललात की, रिलायन्सचे जे निवेदन, वर्तमानपत्रामध्ये आले आहे. मी ते वाचले आहे. त्या रिलायन्सच्या निवेदनामध्ये स्प्ष्ट लिहलेले आहे की, तिकडे जे गावठण आहेत, तिथले जे लोक आहेत त्यांना कुठलाही त्रास होणार नाही, अशाप्रकारचे निवेदन त्या वर्तमानपत्रातील बातमीमध्ये आहे. ते आपण वाचले असेल. त्याच्यामुळे कदाचित तसेही इकडे असेल. अपुऱ्या माहितीवर आपण चर्चा करतो आणि शासनाला दोष देतो. हे चुकीचे आहे. आपल्याकडे संपूर्ण माहिती आपण गोळा करा. जर इकडच्या स्थानिक लोकांना त्रास होत असेल तर आम्ही आपल्या सोबत आहोत, हे तुम्ही लक्षात घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्ही सर्व बाधीत लोक तुमचे आभारी आहोत. तरी पण मी तुम्हाला सांगतो की, २००४ ला हे क्षेत्र तुम्ही एम.एम.आर.डी.ए. कडे सुपूर्द केले. एवढा मोठा प्रदेश तुमच्याकडून तोडून नेला याची माहिती एकाही सदस्याला नाही किंवा तो प्रश्न तुम्ही सभागृहात आणला नाही. आता एस.ई.झेड. लावले. एस.ई.झेड. लावल्यानंतर आम्ही अगदी उध्वस्त होणार. आमची जमीनपण जाणार, धंद्यापासून सगळे जाणार, आम्ही भिकेला लागणार. याचे तुम्ही निवेदन करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या संदर्भात प्रशासनाने स्पष्टपणे निवेदन करावे. जसे आता उत्तनच्या लोकांना याच्या संदर्भात काही माहिती नाही की, एस.ई.झेड. जमीन काढून घेणार किंवा त्यांचे काय धोरण आहे? ते कशा पध्दतीने विकसित करणार? प्रायव्हेट पार्टीला देणार, अटीशर्ती काय असतील? तिथल्या लोकांना ते काय देणार? तर प्रशासनाने जर माहिती असेल या संदर्भात तर प्रशासनाने ते स्पष्ट करावे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) आपण जी लक्षवेधी मांडली की, एस.ई.झेड. बाबत काय मत आहे आणि अतिशय तीव्र भावना सन्मा. नगरसेवकांनी व्यक्त केल्या. परंतु, ह्या बाबतीत स्पेशल एन्टरटेनमेंट झोन, विशेष करमणूक क्षेत्र म्हणून आपल्या परिसराला एम.एम.आर.डी.ए. कडून नोटीस लावलेली आहे. जी नोटीस सर्वसाधारण जनतेला वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसिध्द करण्यात आलेली आहे आणि त्याच्यावर हरकती आणि सुचना मागविलेल्या आहेत. आणि महापालिकेला याबाबतीत तीच नोटीस आलेली आहे. महापालिकेच्या कुठच्याही अधिकाऱ्यांशी याबाबतीत चर्चा झालेली नाही. सदर बाबत आपल्या ज्या भावना तीव्र आहेत तशाच प्रत्येक शहरवासियांच्या आहेत. उत्तन क्षेत्र हे ह्या शहराच्या निर्मितीपासून म्हणजेच गेल्या कित्येक शतकापासून हा परिसर आहे आणि तेथील लोक मासेमारी करतात आणि उत्तनच्या जनतेबरोबर हे संपूर्ण सभागृह आहे. येथले अधिकारी राहिलेत अशी मी त्यांना विनंती करतो. परंतु, याबाबत आपल्यापर्यंत कुठल्याही प्रकारची माहिती आलेली नाही. सन्मा. घेवारे साहेबांना मी विनंती करतो की आपण याबाबतीत संपूर्ण माहिती मागवावी, शासनाकडून योग्य मी माहिती घ्यावी कारण ह्याची ॲथोरिटी आहे. एम.एम.आर.डी. आहे आणि त्यांच्या माधयमातून हा विकासाचा टप्पा येणार आहे. आपल्याला याबाबत महापालिकेकडून कुठल्या प्रकारचा ठराव करता येईल किंवा महापालिकेकडून एकमताने काहीतरी शासनाला कळविता येईल तरी त्याबाबत हे सभागृह निर्णय घेईल. परंतु, तो निर्णय तेव्हाच घेता येईल की, नेमके आपण काय केले पाहिजे. याबाबतची माहिती आपल्याला मिळेल, अधिकाऱ्यांनादेखील तेवढीच माहिती आहे. मा. घेवारे साहेबांना, मा. उपायुक्त साहेबांना विनंती करतो की, आपल्याकडे ह्याबाबत जेवढी माहिती आलेली आहे त्याचे निवेदन व्हावे आणि या क्षेत्राला, शहराच्या ह्या भागाला सर्व सभागृहाला कशी मदत करता येईल, संपूर्ण शहर त्यांच्या पाठीशी कसे उभे राहिल याबाबत विचार व्हावा.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, मी तेच तुम्हाला सांगतो की, जे तुम्ही सांगितले की, ऑब्जेक्शन पिरिएड. गेल्या सभागृहामध्येही आम्ही विषय आणला होता की, पेपरमध्ये चार दिवसापूर्वी नोटीस आलेली आहे. आपली नोटीस लागली नव्हती. नंतर नोटीस लागली. आमचे काम आम्ही करतो. आपलेही काम आपण करायला पाहिजे. त्यांचेही काम त्यांनी करायला पाहिजे. तुम्ही केले नाही तरी त्यांना क्षम्य आहे. पण तुम्हाला नाही. पण तेही करत नाही आणि तुम्हीही करत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

एस.ई.झेड. लागला ह्याचे लेटर मी मा. आयुक्तांच्या दालनातून काढले. तुमच्याकडे ते दि. २७/१०/२००६ ला आले आहे. म्हणजे दि. २१/११/२००६ ला तुम्हाला मिळाले आहे. ते मा. आयुक्तांच्या दालनातून काढले आहे. त्यांच्यासभेमध्ये बोलावले आहे आणि त्यांचे मत विचारले. तुम्ही हे वाचा म्हणजे तुम्हाला समजेल. त्यांचे अभिप्राय त्यांना विचारले आणि त्यांचे एस.ई.झेड. करायला हरकत नाही म्हणून त्यांनी त्यांचे अभिप्राय दिलेले आहेत आणि तुम्ही आम्हाला एम.एम.आर.डी. म्हणून सांगता ते कुठल्या आधारावर सांगता ते कळत नाही. एवढा मोठा नगरपालिकेचा प्रदेश तुटून चालला आहे. इथे स्पेशल इकॉनॉमी झोन म्हणून तेवढा प्रदेश तोडणार त्याला बाऊन्ड्री मारणार. ह्या नगरपालिकेची तेवढी हद्द संपणार. असे असताना आपण अजिबात रस दाखवत नाही. सदस्यांना त्याची माहिती देत नाही. याच्यात नक्की कारण काय आहे?

**मा. महापौर :-**

आपल्याला सभागृहापुढे संबंधित विभागाचे अधिकारी निवेदन देतात ते आपण ऐकून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आजच्या सभेला सुरुवात झाली. मला थोडा उशीर झाला. परंतु, आज मी महापालिकेत आल्यावर एक महत्वाचे बघितले. गेल्या सहा महिन्यापासून ज्या मागण्या आम्ही आपल्याकडे मागितल्या त्या होत नव्हत्या. परंतु, या सभागृहातील आणि महापालिकेच्या कामकाजातील दहशतीचे वातावरण बघितले तर ही मागणी गेल्या सहा महिन्यापासून मी केली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला जर ह्या विषयावर बोलायचे असेल तर ह्या विषयावरच बोला.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यावरच येतो. जरा तुम्ही ऐकून घ्या. मला पूर्ण संधी द्या. मला बोलू द्या. काही एवढी घाई केलेली नाही. आपल्याला सात वाजलेले नाहीत. आज या शहरामध्ये ह्या महापालिकेच्या सदनामध्ये आपण मेटल डिटेक्टर लावले. मी आपला आभारी आहे. या सदनामध्ये काही अधिकारी, काही पदाधिकारी हे वेपन घेऊन येतात. तीन्ही पोलिस स्टेशनला त्याच्या नोंदी आहेत. कुठल्या कुठल्या नगरसेवकाकडे वेपन आहेत. माझ्याकडे पण आहे पण हे सांगुनसुध्दा हे प्रशासन, कमिशनर, अधिकारी, मुख्यालयाचे अधिकारी, डी.एम.सी. मुख्यालय याच्यावर कुठलाही निर्णय घेत नव्हते. एखादा दुर्दैवी प्रसंग घडायच्या अगोदर आपण हे लावले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. हे मेटल डिटेक्टर झाले आणि कार्ड पंचिंगचे मशिन. आपल्याकडे इकडचे कर्मचारी वेळेवर येत नाहीत. हजेरी देऊन पळून जातात. दीड दोन वर्षापासून मी मागणी करतो, त्याचे मशिन आज लागले. आमची इच्छा होती की, १ जानेवारी २००७ पासून आपल्या हस्ते त्याचे उद्‌घाटन व्हावे. पण, ते झाले नाही, दुर्देव आहे. ही महत्वाची मशिन कधी कार्यरत होईल. ही नोकरशाही आहे. अजून चार-पाच महिनेसुध्दा लागतील. काही सांगता येत नाही. एस.ई.झेड. चा विषय फक्त आपल्या महाराष्ट्रात नाही तर अख्ख्या भारतात चालला आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी धीरुभाई अंबानी यांचे नाव घेतले. वाजपेयी सरकार पासून करली दुनिया मुट्टी मे. मी मिट्टी मे बोलतो. त्यांनी मुट्ठी मे केली. ह्या धीरुभाईला यांनीच आणले. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अख्खा भारत ह्या धीरुभाई अंबानीला पाठीवर लाथा घालून ज्या व्ही.पी. सिंग यांनी जेलमध्ये टाकले होते. त्या व्ही.पी. सिंग ह्यांचे पोस्टल तिकीट श्री. प्रमोद महाजन यांनी काढले आणि ह्याच धीरुभाई अंबानीने मी घातलेला बटन आणि धागासुध्दा बनवायला घेतला आहे. ते महाराज म्हणतात त्यांनी आमचे शेतीचे व्यवसाय सगळे खाउुन टाकले. हे खात्याकरता धीरुभाईला आमंत्रण आपण दिले. ह्या धीरुभाईला मोठा आपणच केला. राजीव गांधी तर होतेच त्यात वाजपेयींनी भर घातली. तिकीट पण काढले. ज्या व्ही.पी. सिंग ह्यांनी यार्नच्या स्मगलींगच्या प्रकरणी जेलमध्ये घातले. त्या धीरुभाईला भाजपा, पूर्वीचा काँग्रेस या सगळ्यांनी मोठे केले आणि आज तो ताकदवार झाला आहे. देश चालवायचा गोष्टी करतो. भाजी विकायला लागला. फळं विकायला लागला. धागे विकायला लागला. आता बटनपण विकायला लागला. ह्या भाजपाची सुध्दा त्याच्यामध्ये देणगी आहे. रायगडमध्ये एवढे मोठे आंदोलन झाले. तिसरा पक्ष, तिसरा घटक अजून शिल्लक आहे. श्री सिताराम येचूरी येऊन गेले, नेतृत्व केले. उत्तनला मिटींग झाली त्याच्यामध्ये श्री. मनवंत तुस्कारा देखील जनता दलाच्यावतीने आले होते. मी सुप्रिम कोर्टात गेलो होतो. मला वेळ नव्हता. नाहीतर मी ही आलो असतो. तुमचा सगळा मच्छिमार वगैरे कुठे आला? सगळेच संपलेले आहेत. आता धीरभाईचे पहिले आपण म्हणतो हॉकर्स हटाओ. आता ते सगळेच आपोआपच हटणार आहेत. मॉल निघायला लागले. तिकडे सगळे विकायला लागले. ए.सी.मध्ये आता हिरव्यागार भाज्या मिळायला लागल्या. भाजपाच्या ऑफीसला बोर्ड लागला होता की, महागाई किती वाढली. सगळे पंचविस रुपयांनी विकतो. अहो पण त्या मॉलमध्ये दहा रूपयाची काकडी पंचवीस रूपयाला विकतो. पण तो हिरवीगार विकतो म्हणून पंचविस रुपये द्यायचे हातगाडीवाला थोडी सुरकूतलेली विकतो म्हणून त्याने दहा रुपयात विकायचे. हे सगळे जे देशाचे चालले आहे हे काय नव्याने नाही आणि ह्याच्याही पेक्षा देशाची वाईट परिस्थिती येणार आहे. मा. महापौर मॅडम आमच्यासारखे आत्ता तरुण वर्ग आहेत. आमची मुले आता वीस-एक वर्षाची, अठरा, एकोणीस वर्षाची झालेली आहेत. हा तरुण वर्ग बघितला की, एकीकडे ह्या धीरुभाई अंबानीला सुर्यास्त होत आहे. त्याचा सुर्य मावळलेला आहे. मावळायला वेळ लागणार आहे. सुर्य डोक्यावर आहे त्याचे चटके आपल्याला बसतात आणि त्यातील जास्तीत जास्त चटके आमचा जो युवक वर्ग आहे, त्याला नोकऱ्या नाहीत. आज धीरुभाई अंबानी एक-एकाना सहा सहा महिने दोन-दोन लाख रुपये देतो पण सहा महिन्यात त्याचे काम झाले की, त्याल परत घरी पाठवतो. आता घरी बसा. आपल्या बुध्दीचा आम्ही उपयोग करुन घेतलेला आहे. आम्ही कर लो दुनिया मुट्ठीवाले ते मिट्टीवाले. आज टेलिफोनची वाट लावली. एम.टी.एन.एल. ची वाट लावली. ज्या-ज्या सेक्टरमध्ये त्या माणसाने घुसखोरी केली तिकडे सगळ्याची वाट लागली आणि आता बरबाद करुन टाकले आहे. डॉल्फीन संपला रिलायन्स जोरात आला. आपल्या नगरपालिकेनेसुध्दा रिलायन्सच घेतला. ह्या सगळ्याचा सांगोपांग विचार केला पाहिजे. ह्याच्या अगोदर पाच - सात वर्षापूर्वी आपल्याकडे इलेक्ट्रॉनिक पार्क आला. त्यामध्येसुध्दा काहीच नाही. मा. महापौर आपण थोडी तटस्थ भुमिका घ्याल. म्हणजे याच्यावर थोडी जरा ॲग्रेसीव्ह भुमिका घ्या असे मला वाटते. या विषयपत्रिकवर आयुक्तांकडील पत्र व त्यांनी केलेल्या कामकाजावरील पत्र हा इश्यु आहे. हा इकडे नोंद आहे. सन्मा. सदस्यांनी सांगितले आपल्याला कळो ना कळो अधिकारी तुमचे आहेत, आयुक्त, मुख्यालय आहेत, सचिव आहेत. बाकीच्या सर्व उद्योगधंद्यांना ह्यांना वेळ असतो. नाही ते उद्योगधंदे करतात. सांगाल तर मीच वाचून दाखवतो. माझ्याकडे पुराव्यासकट आहे. पण ही आलेली पत्रे सभागृहापुढे का ठेवली जात नाही? आपल्या सभागृहाला आणि प्रशासनाला ही शिस्त का नाही? ही शिस्त लागत नाही म्हणून आपल्यावर नामुष्कीची वेळ येते. आता आपण पुढे विषय चालू करा. ही जेव्ह विषयपत्रिका येईल तेव्हा माझ्याकडे आणखीन एक मोठे प्रकरण आहे. ते मी काढेन. पण आम्ही किती ओरडायचे? प्रशासनाने आपल्याला किती थकवायचे, किती फसवायचे? आलेली पत्र किती दडवून ठेवायची? आपली हरकत ही त्याच वेळेला

जायला पाहिजे होती आणि आपण काय विचार केला की, आम्ही काही केले नाही तर सगळे होईल का? असे नाही तिसऱ्या पक्षातील आमची जी थर्ड फ्रन्टची लोक आहेत. ह्याच्यावर पुर्ण आंदोलन करणार आहेत. आत्ता विजेचे सुरु झालेलेच आहे. आत्ता विजसुध्दा विकली. आता प्रत्येकाच्या घरी दिड-दोन हजार रुपये बिल येते.पोस्टाची तिकीटे उगाच निघालेली नाहीत. ही सगळी जी लुटमार चाललेली आहे ती सगळ्या क्षेत्रामध्ये आहे. इंडस्ट्रीयलमध्येसुध्दा घुसखोरी झाली. मात्र राष्ट्रवादीच्या श्री. शरद पवारांना आम्ही मानतो. कारण त्या धिरुभाई अंबानीने जेव्हा उसाचा कारखाना घेतला तेव्हा हे सगळे पुढारी थयथया नाचायला लागले. कारण त्यांच्या पोटावर आणि टोपीवर आले. साखर कारखान्यात ही जी राजकारण्यांची मक्तेदारी चालू आहे. त्या साखर कारखान्यामध्ये धिरुभाई अंबानी नको. पण ह्यांचे गोपीनाथ मुंडे त्याहीपेक्षा हुशार. त्यांनी आमच्या मालेगावची एक उस गिरणीच घेउन टाकली. आणि करायला सुरुवात केली.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौरः-**

विषयावर बोला.

**मिलन म्हात्रेः-**

मी विषयावर बोलतो. याचा बेस धिरुभाई अंबानी आहे. धिरुभाईनी काय -काय आश्वासने दिली आहेत तेच मी बोलतो. वाईट एवढे वाटते, दोन पैसेवाले मारामाऱ्या करतात, दोन पैसेवाले संघटीत झाले.तुमची आमची तरूण मुले आत्ता नोकऱ्यांकरीता वणवण फिरणार आहेत हे लक्षात घ्या. वाईट ते वाटते. उद्या तुमच्या मुलांना नोकऱ्या लागायच्या आहेत.तुमच्या मुलांना उद्योग लागायचा आहे.नुसते मच्छीमार-मच्छीमार करुन चालत नाही.

**जोजफ घोन्सालवीसः-**

त्याचा काय संबंध आहे? कशाला उगाच गोलमाल करता?

**मिलन म्हात्रेः-**

मी सगळया विषयाचे बोलतो. या भारताची अर्थव्यवस्था कशी खिळखिळी झाली आहे. वरचे सरकारदेखील त्याला साथ देते. पोस्टल तिकिट कोणी काढले? ते जर काढले असेल तर सगळी लायबिलीटी तुमच्यावर जाते. आज जी सगळी मुले तुमच्या मच्छिमांराबरोबर उपाशी मरणार आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रशासनाला निवेदन करु दया. हे बाकी काय चालले आहे. प्रशासनाने निवेदन करावे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हालाच फक्त बोलता येते अशातला भाग नाही. या सगळयाचा विचार करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रशासनाने याच्यावर निवेदन करावे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

एवढा गंभीर विषय चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या सगळयाचा विचार करा. प्रशासन कुठे चुकले आहे, त्याच्यावर प्रशासनाने विस्तृत निवेदन करावे की, हा आलेला पत्रव्यवहार आम्ही या विषयपत्रिकेवर का ठेवला नाही? आयुक्तांनी याची माहीती आमच्या सभागृहाला का दिली नाही? याची संपुर्ण डिटेल माहिती घ्या आणि मग बोला. प्रशासनाने नुसते आम्हाला हे माहिती नाही, ते माहिती नाही असे बोलायला अधिकारी इथे उभे करु नका.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, निवेदन करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रशासनाने हयाच्यावर निवेदन करावे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलता. सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील यांनी या सभागृहामध्ये उत्तन, पाली, गोराई या भागासाठी शासनाने करमणुक व पर्यटन विकास क्षेत्र रिक्रीएशन ॲट टुरीझम डेव्हलपमेंट रिसर्च झोन म्हणून नोटिफिकेशन जाहिर केलेले आहे. त्या अनुषंगाने या ठिकाणी लक्षवेधी मांडलेली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सदरची लक्षवेधी प्रशासनाकडे आली नाही. पण, सभागृहामध्ये जी चर्चा घडून आली. या माध्यमातून मी खुलासा करु इच्छितो. राज्य शासनाने एम.एम.आर.डी.ए. कडून बृहन्मुंबई व मिरा भाईंदर महानगरपालिका यासाठी करमणुक व पर्यटन विकास क्षेत्र हा झोन करण्यासाठीचा मनोदय जाहिर नोटीफिकेशनने जाहिर केलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे आणि त्यास दोन महिन्याचा अवधी संबंधित सर्व नागरिकांना हरकती सुचना देण्यासाठी देण्यात आलेला होता. त्या प्रकारची जाहिर नोटीस राज्य स्तरावरच्या व स्थानिक पेपरमध्ये तसेच महापालिकेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. या अनुषंगाने या करमणूक व पर्यटन विकास क्षेत्राने बाधित होणा-या व याला इफल्युन्स होणा-

या नागरिकांचे मत शासन जाणून घेणार आहे आणि त्याबाबत नोटीफिकेशन आलेले होते. या ठिकाणी मा. मुख्यमंत्री साहेबांकडे एक बैठक झालेली आहे. यामध्ये हा जो निसर्गरम्य परिसर आहे, बृहन्मुंबई व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या समुद्रालगतचा विशेषतः लक्षवेधीमध्ये नमुद केलेल्या भागासाठी त्यासाठी करमणुक व पर्यटनासाठी पॅन इंडिया ही कंपनी याच्यामध्ये इन्वेस्ट करण्याचे मनोदय असल्याचे एक पत्र फाईलमध्ये आहे. तर यामध्ये प्रशासनाला पुर्णपणे सविस्तर माहिती नाही ही वस्तुस्थिती आहे. तर या अनुषंगाने संबंधित नगररचना विभागाचे अधिकारी व आम्ही स्वतः एम .एम. आर. डी.ए. आणि राज्या शासनाकडून हया विशेष पर्यटन व करमणूक क्षेत्राच्या बद्दल तंतोतंत पुर्ण माहिती घेउन याबाबत किती क्षेत्र आहे. साधारणतः त्यांनी जे डिक्लेअर केले आहे. त्यामध्ये पाच हजार सातशे चाळीस हेक्टर जमीन अपेक्षित केली आहे आणि त्यामध्ये ६०टक्के मध्ये ३३० हेक्टर जमीन सरकारी व उर्वरित २४४० हेक्टर जमीन खाजगी मालकीची यामध्ये समाविष्ट होत आहे. आणि त्यामध्ये मिरा भाईंदरचा किती हिस्सा समाविष्ट होत आहे आणि बृहन्मुंबईचा किती आहे ही माहिती आम्ही घेऊ आणि यामध्ये शासनाचे मनोदय काय आहे? कशा प्रकारचा विकास होत आहे याबाबत सविस्तर माहिती येणाऱ्या सभेमध्ये आपल्यासमोर सादर करु.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, एस.ई.झेड. या विषयावर संपूर्ण भारतभर आंदोलने सुरु झालेली आहेत. पश्चिम बंगाल, रायगडसुध्दा सध्या त्याच मार्गावर आहे आणि गेल्या काही महिन्यांपासून गोराई, उत्तन परिसरातील सर्व शेतकरी, मासेमारी करणारे उत्तनमधील बांधव हेसुध्दा आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. मघापासून एस.ई.झेड. मध्ये दोन प्रकारचे अर्थ लावले जातात. एक आर्थिक क्षेत्र म्हणून आणि दुसरा करमणुक व पर्यटन क्षेत्र असे वेगवेगळे अर्थ या ठिकाणी लावले गेले आहेत. आपल्या ठिकाणी हा करमणूक व पर्यटन क्षेत्र असावे अशा प्रकारचे उल्लेख वृत्तपत्रातून आलेल्या बातम्यांमधून प्रसिध्द झालेले आहेत. पण ह्या ठिकाणी एक महत्वाची बाब अशी आहे की, जेव्हा मिरा भाईंदरचा विकास आराखडा हा सेपरेट असताना त्या ठिकाणी अगोदरच एम.टी.डी.सी. साठी जे क्षेत्र आपण जाहिर केलेले आहे. या ठिकाणी एम.टी.डी.सी. ने पुढे काय करायचे ठरवले आहे. यासंदर्भात कुठलीही माहिती नाही. आता त्याच्यानंतर एम.टी.डी.सी. चे क्षेत्र वगळून दुसरे क्षेत्र म्हणजे उत्तन बंदरसुध्दा क्षेत्र त्याच्यामध्ये सामाविष्ठ करण्याचा विचार चालला आहे. त्याच्यामागे पॅन इंडिया नावाची कंपनी आहे. तिकडे धीरुबाई अंबानी असेल तर इकडे पॅन आहे, तिकडे कुठेतरी गॅमन असेल. अशा प्रकारच्या कंपन्या स्थापित करुन स्थानिक लोकांच्या अधिकारावर जर बाधा येत असेल तर महानगरपालिकेने, आपल्या सभागृहाने नेमकी कुठली भुमिका घेतली पाहिजे. या संदर्भात या ठिकाणी चर्चा होणे महत्वाचे आहे. आम्ही बाहेर पक्ष किंवा समाज किंवा इतर नागरिक म्हणून भावना व्यक्त करु शकू. परंतु, या ठिकाणी महानगरपालिकेचे नगरसेवक प्रतिनिधी म्हणून महानगरपालिकेच्या माध्यमातून आम्ही सरकारला आमच्या भावना कळवल्या पाहिजेत. आणि त्याच्यासाठी महत्वाचे म्हणजे जेव्हा ही नोटीस बोर्डावर प्रसिध्द झाली. त्यावेळी ती जरी त्या जमिन मालकाची किंवा ती जमिन आपण ज्या ठिकाणी ॲक्वायर करणार आहेत. ती जमिन मालकाच्या संदर्भात जरी असली किंवा त्याच्या पुरती मर्यादीत जरी असली तरी ही जमिन आपल्या मिरा भाईंदरच्या विकास आरखड्याच्या अंतर्गत असल्यामुळे महानगरपालिकेने हा विषय स्वतःहून घ्यायला पाहिजे होता की, आमच्या विकास आराखड्यामध्ये एकतर एम.टी.डी.सी. साठी वेगळे क्षेत्र आरक्षीत केले असताना त्याच्याहून वेगळे अजून जास्त ॲडीशनल क्षेत्र अशा प्रकारे करमणूक व पर्यटन क्षेत्रासाठी आरक्षीत केले जाते. त्यावेळी आम्ही, महानगरपालिका ही शेवटी प्लॅनिंग ॲथोरिटी आहे. एक प्लॅनिंग ॲथोरिटी असताना दुसऱ्या प्लॅनिंग ॲथोरिटीने आमच्या अधिकारावर अतिक्रमण केल्याचे आम्हाला दिसते. तेव्हा सात दिवसांच्या आत जे ऑब्जेक्शन यायला पाहिजे होते त्याच्यामध्ये आमचेसुध्दा ऑब्जेक्शन जायला पाहिजे होते. जेव्हा महानगरपालिका प्लॅनिंग ॲथोरिटी आहे तेव्हा ती एक प्रकारे मालकच आहे. या जमिनीचीसुध्दा असा अर्थ काढला जातो. आणि जेव्हा ते आम्हाला लागू होते तेव्हा हा विषय सभागृहापुढे त्याचवेळी आणायला पाहिजे होता. खरे म्हणजे सताधाऱ्यांने म्हणा किंवा प्रशासनाने म्हणा याच्यामध्ये फार गल्लत केलेली दिसते की, जेव्हा नोटीस प्रसिध्द झाली आणि ती आपल्या महापालिकेच्या बोर्डावर आपण नोटीस लावतो. म्हणजे आपल्याला काही माहिती नाही अशातला भाग नाही. मघाशी मा. उपायुक्त साहेबांनी असे निवेदन केले की, आम्हाला सुध्दा फार काही माहिती नाही. ठिक आहे. पण आपल्याला हे तर माहिती आहे की, प्लॅनिंग ॲथोरिटी आम्ही आहोत. आमच्या अधिकारामध्ये येत असलेल्या जमिनीच्या संदर्भात आरक्षणे केले जाते किंवा धोरण ठरवले जात आहे. ते धोरण निश्चितपणे काय आहे किंवा कशाप्रकारचे असावे? किंवा या धोरणाला आमचा कसा विरोध असेल किंवा कसा सपोर्ट असेल हे दाखवण्यासाठी आम्ही महानगरपालिकेच्या सभागृहात हे आणायला पाहिजे होते. आणि ते न आणता आपण त्याच्यावर गप्प बसलो. आता ऑब्जेक्शनचा पिरिएडसुध्दा निघून गेलेला आहे आणि अशा परिस्थितीमध्ये आता आपण मत प्रदर्शन करत आहोत. ते मत कुठंपर्यंत ग्राह्य धरणार हे सुध्दा एक महत्वाचे आहे. दुसरा फार मोठा महत्वाचा भाग असा आहे की, ज्या ठिकाणी शासन असे म्हणते की, ही सरकारी जागा आहे. पण प्रत्यक्षात ह्या सरकारी जागा ज्या आहेत त्या मिठागराच्या जागा आहेत. मिठागरांच्या जागा संदर्भात बोलतो की, त्या ठिकाणी सरकरची मालकी ठरलेली नाही. सरकार मालक असल्याचे सांगते. खरं म्हणजे जे मीठ पिकवणारे आहेत ते त्याचे मालक आहेत. आता ते जमिन करण्यावर कशाप्रकारचे आहे ते निवेदन मी आता करणार नाही. परंत, एवढी बाब मात्र लक्षात ठेवायला पाहिजे, जर

सरकार सातबारावर सरकारचे नाव नसताना मालक असे सांगते. तर प्रत्यक्षात ताबा असलेले आणि वर्षानुवर्षे मीठ पिकवणारे शिलात्री हे मालक का नाहीत? तर हा मालकी हक्काचा भागसुध्दा यामध्ये येईल. ज्या ठिकाणी आम्ही एखाद्या धोरणाला जेव्हा संमती देतो. तेव्हा त्या धोरणामध्ये अंतर्भुत असलेल्या सगळ्या गोष्टी म्हणजे मग ती सरकारी जमिन, म्हणजे आम्हाला मान्य आहे. असा त्याचा अर्थ होतो. मुळात ती सरकारी जमिन नाही. मग ती सरकारी जमिन नाही मग त्यासंदर्भात धोरण ठरविण्याचा अधिकार सरकारला नाही. मग ते धोरण चुकीचे आहे. मग अशा कुठेतरी आमच्या भावना सभागृहामध्ये प्रदर्शित व्हायला पाहिजेत. ते रेकॉर्ड व्हायला पाहिजे आणि आपल्या महानगरपालिके मार्फत एकमताचा ठराव शासनाकडे जायला पाहिजे. त्यामध्ये प्रत्येक नगरसेवकाला ज्या ज्या गोष्टी धोरणाबद्दल म्हणा, आरक्षणाबद्दल म्हणा किंवा अगोदर आम्ही एम.टी.डी.सी. ला क्षेत्र दिलेले आहे. त्या क्षेत्राबद्दल काय करणार? तिथे अजून काही केलेले नाही. मला वाटते एम.टी.डी.सी. जवळ जवळ पाचशे एकर जमिनीचे आरक्षण केलेले आहे. श्री. घेवारे साहेब, हे बरोबर आहे. त्या ठिकाणी एम.टी.डी.सी. ने काही केलेले नाही. म्हणजे एम.टी.डी.सी. सुध्दा गिऱ्हाईकाची वाट बघत होती, असा त्याचा अर्थ होतो. एम.टी.डी.सी.ला सुध्दा आत्तापर्यंत कोणी धीरुभाई अंबानी भेटला नव्हता. म्हणून त्यांनीसुध्दा धोरण आखले नव्हते. असा त्याचा अर्थ होतो. मग हे वाट पाहत आहेत. त्यांना पॅन इंडिया भेटली. पॅन इंडिया भेटल्यानंतर त्यांनी एम.टी.डी.सी. कडे जाणारे क्षेत्र ते लक्षात घेतले. मग अजून किती जास्त घेता येईल त्याचा विचार सुरु झाला आणि त्याच्यातून हे धोरण सुरु झाले आहे. करमणूक आणि पर्यटन ज्या ठिकाणावर आम्ही आरक्षण केलेले आहे त्या ठिकाणावर एम.टी.डी.सी. ने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. खरे म्हणजे एम.टी.डी.सी.चे हे आरक्षणसुध्दा एम.टी.डी.सी. कडून काढून घ्यायला पाहिजे. प्लॅनिंग ऑथोरिटी म्हणून या ठिकाणी महानगरपालिकेलाच ठेवायला पाहिजे. अशा प्रकारचे माझे स्वतःचे वैयक्तिक मत आहे की, आपण इलेक्ट्रॉनिक पावर झोन यापूर्वी नाकारला होता. इलेक्ट्रॉनिक पावर झोनला आपण पुढे गेलो पाहिजे. एम.टी.डी.सी. ला आरक्षित करुन दिलेली जी जागा आहे ती जागा एम.टी.डी.सी. कडून काढून आपण इलेक्ट्रॉनिक पावर झोनमध्ये घातली तर आपल्या शहराला त्याचा जास्त फायदा होईल आणि त्या मालकांना सुध्दा त्याचा फायदा हाईल. अशा प्रकारचे धोरण ठरविण्यासाठी किंवा आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी मी म. महापौरांना विनंती करतो की, आपण या विषयावर एक स्पेशल विषय पुढच्या सभेमध्ये घ्यावा आणि त्याच्यावर एक सर्वानुमते ठराव करुन आपल्या ज्या भावना आहेत त्या शासनाला संदर्भात कळवाव्यात.

**रोहिदास पाटील :-**

साधारण नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने सभागृहाचे मनोगत आपल्या लक्षात आलेले आहे. मा. महापौरांच्या लक्षात आले आणि मा. आयुक्त म्हणून श्री. खतगावकर साहेबांच्याही लक्षात आलेले आहे. त्यात शास्त्रशुध्द कुठेही हेतुबद्दल शंका नाही. अशा पध्दतीचे करस्पॉन्डस करावे. तुम्ही ज्या - ज्या ठिकाणी माहिती काढायला जाणार. आमची आवश्यकता असेल तर आम्हाला बोलवा. आम्ही एक नाही अनेक येऊ. म्हणजे त्याच्यात पक्षीय मतभेद होतील असे मला वाटत नाही. मण याचा कुठेतरी ठिक निकाल लागायला पाहिजे. नुसते वाऱ्यावर सोडले तर त्या शेतकऱ्यांचे मिठागर वाल्यांचे कोणीही नाही, मच्छिमारांचे कोणीही नाही किंवा कुणब्यांचे कोणीही नाही असे होता कामा नये. आपल्या सगळ्या अस्तित्वाचा विषय आहे, अस्मितेचा विषय आहे. आम्ही सभागृहासमोर आणलेले आहे आणि सगळे जे ठराव होतील ते सगळे एकमताचे होतील. अशा पध्दतीचे प्रयत्न करावेत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर महोदया के अनुमती से बोलना चाहता हू। अभी जैसे इस विषय पर चर्चा हुई की, शासन और प्रशासन का क्या रवैया है। खाली मा. महासभा और जो नगरसेवक है, सबको फसवाफसवी करने का। हर किसी को कुछ भी बोलकर टाल दो या बोलदो की, हमको मालुम नही है और इस विषय को मै इसलिए कह रहा हू की, पिछली मा. महासभा मे मैने लक्षवेधी लायी थी। लक्षवेधी का मतलब क्या होता है, या लक्षवेधी पर आपने रुलिंग दि है तो उसका मतलब क्या होता है? पिछली मा. महासभा मे मा. महापौर मॅडमने रुलिंग दिया था की, मेरी लक्षवेधी पर आठ दिन मे कार्यवाही की जायेगी। उसके उपरांत मैने सचिव साहब को और अतिक्रमण विभाग के अधिकारी को रिमायन्डर दिया। फिर भी एक महिना हो गया। अभी तक उस पर कुछ भी कार्यवाही नही हुई है। तो इसका क्या मतलब समझा जाये। इसका जवाब दिजीए।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील ह्यांनी एस.ई.झेड. साठी जी लक्षवेधी मांडली होती. त्याबाबतीत सभागृहात चर्चा घडवून आणली. सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य यांचे असे मत ठरले की, पुढील मा. महासभेमध्ये रितसर विषय घेऊन प्रशासनाने पूर्णपणे त्याची खातरजमा करुन पूर्ण स्टडी करुन हा विषय मा. महासभेपुढे आणावा अशी प्रत्येकाने इथे मागणी मांडलेली आहे. त्याप्रमाणे सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील ह्यांनी मांडलेली लक्षवेधी हा विषय पुढील मा. महासभेत घेऊन याच्यावर चर्चा घडवून आणून जनतेच्या विकासासाठी जास्तीत जास्त आपल्याला योगदान देता येईल असा निर्णय सभेमध्ये घेतला जाईल. सन्मा. सदस्य आपण ज्या रुलिंगच्या गोष्टी करता ते कुठल्या संदर्भात म्हणता?

**मदन उदितनारायण सिंग :-**

अतिक्रमणच्या संदर्भात.

**मा. महापौर :-**

अतिक्रमण विभाग. सन्मा. सदस्यांनी गेल्या महिन्यामध्ये जी लक्षवेधी मांडलेली आहे. त्या संदर्भात त्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्या प्रकारे कार्यवाही केली. ती कार्यवाही कुठपर्यंत आली याची सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी.

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंग, यांनी जी लक्षवेधी उपस्थित केली होती त्या अनुषंगाने मा. महापौर यांनी आदेश दिले होते. सरकारी जागा २०७ आणि २०९ यावरील झोपडपट्टी हटविण्या संदर्भात लक्षवेधी होती. २०७ आणि २०९ ही जागा शासकीय मालकीची असल्या कारणाने शासकीय मालकीवरील अतिक्रमण काढण्याचे काम शासनाचे असल्या कारणाने प्रांत अधिकारी यांना आम्ही तसे पत्र लिहलेले आहे. दोन वेळा पत्र लिहून आयुक्त साहेबांनी त्यांना फोनवरसुध्दा माहिती दिलेली आहे. त्यांच्याकडून जागा असल्या कारणाने हटविण्याची कार्यवाही त्यांनी करायची आहे. आवश्यक ती मदत नगरपालिका देणार आहे. ही जागा संपूर्ण शासकिय मालकीची आहे. शासनाकडून आरक्षणाखाली मागितलेली जागा शासनाने दिलेली नाही आणि शासनाची जागा असल्या कारणाने अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी महसुल खात्याची आहे आणि महसुल खात्याला आम्ही निवेदन दिलेले आहे की, लवकरात लवकर कार्यवाही करावी. आणि आवश्यक ते मनुष्यबळ व यंत्रसामुग्री देण्यात येईल. त्याबाबत तलाठी ऑफीसचा सर्व्हे चालू आहे. त्याच्याकडून आदेश आल्यानंतर ती कार्यवाही करण्यांत येईल.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, जे सरकारी जागेमध्ये २०७ आणि २०९ जो काही आपण उल्लेख केलेला आहे तर त्याच्यामध्ये किती अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्याचा तुम्ही लेखी रिपोर्ट मा. कलेक्टर साहेबांना दिलेला आहे की? आता राई, मोर्वामध्ये २१८ मध्ये कार्यवाही झाली. त्यांचे तुटले गेले. तर ते ताबडतोब तुटले गेले. मग ही का तुटली गेली नाही?

**अजित पाटील :-**

ती सरकारी जागा होती. त्या संदर्भात शासनाकडे आम्ही पत्र दिले होते.

**परशुराम पाटील :-**

ही पण सरकारी जागा आहे.

**अजित पाटील :-**

कोणती?

**परशुराम पाटील :-**

राई

**अजित पाटील :-**

सांगतो ना. ते तहसिलदारामार्फत तोळ्यांत आले. त्यांनी मन्युष्यबळ मागितले होते आम्ही मनुष्यबळ दिले. तहसिलदाराच्या सुपरवायझिंगखाली जागा तोडण्यात आली.

**परशुराम पाटील :-**

तसे ते करुन घ्या ना तुम्ही. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनीसुध्दा २०९ मध्ये केले. मग त्यांच्यावर काय कार्यवाही केली.

**अजित पाटील :-**

आम्ही सर्व सरकारी जागेबद्दल प्रांत ऑफिसला पत्र लिहलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

त्यांचा रिपोर्ट तुम्ही दिलेला आहे का?

**अजित पाटील :-**

सरकारी जागेत जी अतिक्रमणे आहे त्या सगळ्यांची माहिती दिलेली आहे.

**परशुराम पाटील :-**

तुम्ही कोकोणाला माहिती दिली ते आम्हाला द्याल का?

**अजित पाटील :-**

मोघम लिहलेले आहे. सरकारी जागेवर अतिक्रमण झालेले आहे. ते हटवण्याकरिता मनुष्यबळ द्या.

**नरेंद्र मेहता :-**

ते जाऊ द्या पण मी काय बोलतो की, सरकारी जागेवरचे अतिक्रमण तुम्हाला काढता येत नाही का?

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. परशुराम पाटील, याच्यामागे तुमचे आयुष्य गेले. बोलता बोलता तुम्ही म्हातारे झाले. जरा शुध्द ठेवून बोला. उगाच कुठेतरी विषय नेऊ नका. सभागृहामध्ये बेताल बोलता म्हणून ही अशी पाळी येते. कोणीही राहत नाही. ते बघा एकटेच बसले.

**परशुराम पाटील :-**

२०९ मध्ये आपण अतिक्रमण केलेले नाही का? नाही केले तर केले नाही म्हणून म्हणा. मग तुम्ही ते हुडकून काढतो.

**रोहिदास पाटील :-**

अतिक्रमण केले म्हणून कोण बोलतो?

**परशुराम पाटील :-**

मी सांगतो ना. मला माहिती आहे.

**रोहिदास पाटील :-**

ज्यांनी अख्खे भाईंदर लुटले त्यांनी हे का बोलावे?

**परशुराम पाटील :-**

लुटले असेल ती एक वेगळी बात आहे आणि आत्ता जे आपण लुटलेले आहे याचे सांगावे ना. २०९ मध्ये ही जागा आपण कलेक्टरकडून महानगरपालिकेला हॅन्डओव्हर करु शकतो आणि ती जागा जी आहे. ती आपण अतिक्रमण केले आहे हे निश्चित आहे की नाही? ते तुम्ही सांगा ना. जर नसेल केली तर सोडा तसेच. याच्यामध्ये चीड वाटण्याची काही गरज नाही. हे काही वैयक्तिक नाही.

**नरेंद्र मेहता :-**

शासकिय जागेवरील अतिक्रमण आपण काढू शकत नाही का? महापालिकेला अधिकार नाहीत का?

**अजित पाटील :-**

सध्या लोक त्याच्यामध्ये राहतात.

**नरेंद्र मेहता :-**

हो. पण, अतिक्रमण झाले आहे. ते काढायला तुमच्याकडे अधिकार नाहीत का?

**अजित पाटील :-**

जर नविन असेल तर काढतो. पण, तिकडे लोक राहतात.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही असे म्हटले आहे की, या जागेची मालकी त्यांची आहे. जर एखाद्या खाजगी जागेने अतिक्रमण बांधले ती पण मालकी त्यांचीच आहे. तर ते अतिक्रमण त्यांनाच काढायला लागेल. तुम्हाला जायची गरजच नाही.

**अजित पाटील :-**

त्याच्या हद्दीत अनधिकृत बांधकाम असेल तर ते आपण काढू शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

मग काय अतिक्रमण काढू शकत नाही.

**अजित पाटील :-**

अनधिकृत बांधकाम जर खाजगी जागेत असेल तर आपण काढू शकतो. हे अतिक्रमण आहे. सरकारी जागेतील अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम वेगळा प्रश्न आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, सरकारी जागेत अतिक्रमण असले तरी मिरा भाईंदर महापालिका हद्दीमध्ये आहे ना?

**नरेंद्र मेहता :-**

बाऊन्ड्री किंवा काहीतरी झोपड्या वगैरे बांधल्या असतील ना?

**अजित पाटील :-**

त्या सरकारी जागेवर झाले ते अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम वेगळा मॅटर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

अतिक्रमणची व्याख्या काय आहे? अतिक्रमण काय आहे? बोर्ड लावला, बाऊन्ड्री मारली, झोपड्या बांधल्या आहेत.

**अजित पाटील :-**

ती जागा टोटली सरकारी आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

अतिक्रमण काय केले आहे? बोर्ड लावला आहे, बाऊन्ड्री मारली, झोपड्या बांधल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, यांनी अतिक्रमणची नक्की व्याख्या आम्हाला सांगावी. दुसरा प्रश्न असा आहे. सरकारी जागेत झोपड्या बनवल्या, सरकारी जागेत चाळी बांधल्या तर आपण त्यांना रस्ते बनवतोच ना? त्यांना गटारे देतोच ना. त्यांना प्रातःविधीची व्यवस्था करतो की नाही? मग ती तुम्ही सरकारी जागेत का करता? असे केलेले नाही का हे मला सांगा. मग त्याकरिता तुम्ही का करता? एखादा नगरसेवक मागणी करतो आणि तुम्ही ते करुन देता. त्यावेळेस तुम्ही का सांगत नाही की, कलेक्टरची परवानगी आणा. ज्या ज्या

सरकारी जागेमध्ये झोपड्या महापालिका हद्दीमध्ये बनवतात, हे लक्षात घ्या. सरकारी जागा महापालिका हद्दीमध्ये आहे.

**परशुराम पाटील :-**

ती आपल्या महानगरपालिकेचीच आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

महानगरपालिका की जगह है।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, त्याच्याही पलिकडे जाऊन सांगतो की, असा कुठला नियम आहे महानगरपालिकेस सरकारी जागेवरचे अतिक्रमण काढायचे नाही अशी बांधीलकी तुम्हाला आहे का?

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, उसको पानी का कनेक्शन दिया जाता है। उधर गटर बनाया जाता है और उसका कम्प्लेट देने के बावजुद अगर वह नही तुटता है तो यह महानगरपालिका की कमजोरी समझी जायेगी।

**जयंत पाटील :-**

त्या झोपड्यांना तुम्ही समर्थन करु नका.

**अजित पाटील :-**

आता राहिलेल्या झोपड्या पूर्वीच्या आहेत. नविन झालेल्या झोपड्या पाडायला माणसे पाठवली.

**जयंत पाटील :-**

त्या झोपड्या काढताना तुम्हाला शासनाने पाडू नका म्हणून सांगितले होते का?

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवागनीने बोलातो, श्री. अजित पाटील साहेब, आत्ता या सॉल्ट डिपार्टमेंटच्या बाजुला जी जागा आहे. ज्याला धाकला आगर, मोठा आगर आपण म्हणतो. त्या ठिकाणी आता एवढ्या झोपडपट्ट्या झालेल्या आहेत की, विचारु नका. त्यांना बत्ती, रोड, हे सगळे गेले आणि शहरामधले जे पहिले आहेत त्यांना कोणी काही करत नाही आणि आपण म्हणता की, सरकारी जागा, कलेक्टर लॅन्ड ही त्यांनी रेव्हेन्युने करायची असते. पण साहेब, महानगरपालिकेच्या अंडर असलेली ही जागा महानगरपालिकेचीच आहे असे आपण समजायला पाहिजे आणि ते बांधकाम रितसर त्यांची परवानगी घेऊनसुध्दा आपण तोडायला पाहिजे किंवा आपण तोडली नाही तर आपण त्यांना तोडायला सांगितले पाहिजे.

**अजित पाटील :-**

सर्व सभागृहाच्या भावना मा. आयुक्तांकडे मांडून ..........

**रतन पाटील :-**

साहेब आपण उत्तर देता. मा. महापौर मॅडम मला बोलायची संधी द्या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम, श्री. अजित पाटील साहब बोल रहे है, सरकारी जगह है। अगर सरकारी जगह है तो महानगरपालिकाने अपने पैसे से रोड क्यों बनाया? वह भरणी क्यो. किया है?

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की मागच्या सभेमध्ये मा. महापौरांनी अशी रुलिंग दिलेली आहे. त्यावेळेला मी प्रश्न असा उपस्थित केलेला की, नेताजी सुभाषचंद्र मैदानाच्या बाजुला आपला जो रोड आहे. त्या रोडच्या दुभाजकामध्ये जी झोपडपट्टी आहे. तिथे वेळोवेळी ॲक्सीडेंट होत आहेत. ती खाली करण्यासाठी मा. महापौरांनी त्यावेळेला रुलिंग दिले की, सदर झोपडपट्टी आम्ही त्वरीत खाली करु. ती आत्तापर्यंत खाली केली गेलेली नाही. त्याचबरोबर इथे झोपडपट्टी वेगाने वाढत आहे. त्या झोपडपट्टीमध्ये महाराष्ट्र पोलिस खात्यातर्फे गोपनिय अहवालाची पत्रे मिरा भाईंदरकडे आलेली आहेत. तिथे अतिरेकी गतविधी चालु आहेत आणि तिथे मदरसे आणि अशा नावाने तिथे उघडले जातात. त्याच्यावरसुध्दा महानगरपालिका आपले काही धोरण निश्चित करत नाही. ते तिथे आतंकवाद्याचे अड्डे उभे राहत आहेत. त्याच्या विरोधात आपण काय करता? आपण म्हणाले की, ते सरकारी जागेमध्ये आहे ते सरकारी जागेमध्ये असले तरी तिथे पोलिसांना कळवणे हे आपले काम आहे. आपण त्यांना मनुष्यबळ देवून ते उध्वस्त करणे हे आपले काम आहे. आपल्याकडे पालिसांचे गोपनीय अहवाल आहेत की, नाही? किती ठिकाणचे आलेले आहेत आणि तिथे अतिरेकी कारवाया चालू आहेत. आम्हाला उत्तर द्या. पोलिसांचा गोपनीय अहवाल आपल्याकडे आलेला आहे की नाही?

**अजित पाटील :-**

पोलिसांचा गोपनीय अहवाल आलेला आहे आणि श्री. राठोड क्षेत्रीय अधिकारी ह्यांना त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, मी श्री. राठोड ह्यांना स्वतःहून फोन केला तर त्यांनी मला सांगावे की, आमच्या वरिष्ठांना सांगा. हे श्री. राठोड ह्यांचे उत्तर आहे. मला, रतन पाटीलला. मग आम्ही हे कोणाला सांगायचे?

**अजित पाटील :-**

श्री. राठोड ह्यांना तसे आदेश दिलेले आहेत.

**रतन पाटील :-**

श्री. राठोड नाही तर तुम्ही काय करता? आठ दिवस झाले?

**अजित पाटील :-**

श्री. राठोड ह्यांच्याकडून रिपोर्ट आल्यानंतर कारवाई करण्यांत येईल.

**रतन पाटील :-**

किती दिवस झाले?

**अजित पाटील :-**

रिपोर्ट आल्यानंतर कारवाई करण्यांत येईल.

**रतन पाटील :-**

अशाप्रकारे वक्तव्य केले जाते की, आमच्या जेष्ठ अधिकाऱ्यांना सांगा. तुम्ही त्यांना जाब विचारा. त्यांना आत्ता इथे बोलवा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील, नगरसेवक ह्यांनी जो विषय मांडलेला आहे. त्यांच्या विषयाशी मी संमत आहे. ज्यावेळेला सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ ज्या झापेडपट्ट्या आहेत. आयुक्त साहेब हे अगदी धोकादायक आहे. आता परवा, दोन-चार दिवस अगोदर मी स्वतः नऊ, साडे नऊला येत होतो आणि त्याठिकाणी मुलं मध्ये आली. म्हणून मी गाडी उभी केली आणि त्या आजूच्या लोकांना सांगितले यहा से छोकरे लोगोको हटाव, कभी गाडी के नीचे जाएगा तो क्या होगा? तेव्हा ते म्हणाले, ऐ तुम कौन बोलनेवाला है? तुमको हम पहचानता नही हूँ। मी म्हणालो मेरे को पहचानता नही, तर ज्यापध्दतीने ते सगळे एकत्र जमा झाले. ते जमा झाल्यानंतर माझ्या गाडीचा दरवाजा खोलायला लागले. तेव्हा मला वाटले की, ह्या लोकांच्या नादी लागण्यास काही अर्थ नाही.

**रतन पाटील :-**

महानगरपालिकेमध्ये सत्ता आपलीच आहे. आपल्याच मेहरबानीने ते उभे केले आहे. आपण कशाला बोलता?

**परशुराम पाटील :-**

म्हणजे ती लोक एखाद्या कोण मोठा मंत्री - संत्री आला तर त्यांना ही ती लोक तशीच बोलणार. तर आपण ह्या लोकांना त्या डिवायडरमधून का हटवत नाही? मला हे सांगा.

**रतन पाटील :-**

विनंती कशाला करता? त्यांना आत्ताच्या आत्ता हटवा असे सांगा ना. आपण विरोधीपक्ष नेते आहात. आमच्याकडे पदे द्या. आम्ही म्हणतो की, आत्ताच्या आत्ता ह्या झोपडपट्ट्या हटल्या पाहिजेत. तुम्ही असे बोला ना.

**परशुराम पाटील :-**

या झोपडपट्टीला कोणाचा आर्शिवाद आहे?

**रतन पाटील :-**

तुमचाच. सताधाऱ्यांचाच. आज ही आम्ही बोलतो, तुमचाच. साहेब, आपण बोला ना. आत्ताच्या आत्ता त्या झोपडपट्ट्या काढून टाका. श्री. अजित पाटील साहेब, आपण या प्रश्नावर उत्तर द्या.

**अजित पाटील :-**

सुभाषचंद्र बोस मैदानावरील झोपडपट्टयांचा सर्व्हे करण्यांत आलेला आहे आणि त्यांच्यामध्ये काही लोकांना फोटोपास दिलेला आहे. जे बिन फोटोपासवाले आहेत. त्यांना हटविण्याकरिता ७ तारखेला पोलिसांकडून मागणी केली होती आणि पोलिस बंदोबस्त मिळाला नाही. १२ तारखेला पोलिस बंदोबस्त मिळाला आणि फक्त १ पोलिस आला. त्यावर १०-१२ झोपड्या हटविण्यांत आलेल्या आहेत. त्या झोपडपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात पत्रिका दोष असल्याकारणाने पोलिस बंदोबस्त देण्यासंदर्भात पोलिसांना पत्र लिहलेले आहे व जास्त पोलीस बंदोबस्त मिळाल्यावर ती झोपडपट्टी हटविण्यात येईल. आम्ही प्रयत्न करुन १५ तारखेला १० झोपडपट्ट्या हटविलेल्या आहेत. एकच पोलीस होता.

**रतन पाटील :-**

बाहेर किती पोलीस आणले आहेत ते तरी पहिल्यांदा बघा.

**अजित पाटील :-**

त्या झोपडपट्टीची असलेली संख्या आणि त्याठिकाणी एकच पोलीस बंदोबस्त मिळाला असल्याकारणाने १०-१२ झोपड्या हटवलेल्या आहेत आणि ज्यादा पोलीस कुमक मिळावे असे पत्र दिलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

श्री. अजित पाटील साहेब, आपण सभागृहाची दिशाभूल करत आहात.

**अजित पाटील :-**

श्री. अजित पाटील आपण हे सांगा की, ही अतिक्रमणे हटविले जातील.

**परशुराम पाटील :-**

सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ ज्या डिवायडरमध्ये बनले. तेव्हा तिथे झोपडपट्टी होती. ती किती होती? श्री. खांबित साहेब, ज्यावेळी आपण तिथे डिवायडरचे फाऊंडेशन घातले त्यावेळेला तिथे त्या झोपड्या होत्या का? आपण हे किती साली बनविले? मग आपण त्यांना फोटोपास कसे दिले गेले?

**अजित पाटील :-**

त्यांना फोटोपास दाखविले आहेत. त्याची चौकशी चालू आहे. त्यांना फोटोपास दिलेले आहेत.

**परशुराम पाटील :-**

फोटोपास कसे दिले? साहेब, डिवायडरचे काम किती वर्षापूर्वी झाले?

**रतन पाटील :-**

अहो साहेब, चौकशी करुन सगळी आरक्षणे काढून नेली. सगळी आरक्षणे संपलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. अजित पाटील साहेब, त्या झोपडपट्टीमध्ये रहिवासी काल आला असेल त्याला आपल्या महापालिकेमधून आज फोटोपास मिळतो.

**परशुराम पाटील :-**

श्री. खांबित साहेब, हे किती वर्षापूर्वी झालेले आहे?

**अजित पाटील :-**

पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळाला की, झोपडपट्टी हटविण्यांत येईल.

**दिपक खांबित :-**

सन २००४ ला झाले.

**परशुराम पाटील :-**

मग तुम्ही फोटोपास केव्हा दिले?

**अजित पाटील :-**

त्यांच्या फोटोपासची चौकशी चालू आहे.

**परशुराम पाटील :-**

श्री. अजित पाटील साहेब, तुम्ही असे काय म्हणता?

**अजित पाटील :-**

पोलीस बंदोबस्त झाल्यानंतर ज्यांचे फोटोपास नाहीत त्या सगळ्या झोपड्या हटविण्यात येतील. १५ तारखेला एकच पोलीस दिला होता. ज्यादा पोलीसांची मागणी केलेली आहे. १०-१२ पोलीस आल्यानंतर हटविण्यांत येतील. त्याची नंतर चौकशी होईल. पण पोलीस बंदोबस्त असला तर आम्ही त्या इमिजिएट हटवू.

**परशुराम पाटील** :-

साहेब, फोटोपासचा विषय होत नाही.

**रतन पाटील** :-

आपल्याकडे डॉक्युमेंट आले आहेत.

**अजित पाटील :-**

पोलिस बंदोबस्त मिळाल्यावर त्या त्वरीत हटविण्यात येतील.

**रतन पाटील :-**

श्री. अजित पाटील साहेब, त्या गोपनीय अहवालाचे बोला.

**अजित पाटील :-**

गोपनीय अहवालासंदर्भात श्री. राठोड यांना आदेश दिलेले आहेत. त्यांचा चौकशी रिपोर्ट आल्यानंतर मा. आयुक्तांच्या मंजूरीने त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

**रतन पाटील :-**

आपण किती दिवसात मला देता?

**अजित पाटील :-**

तीन दिवसांमध्ये साहेबांची मंजूरी घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

**रतन पाटील :-**

साहेबांची मंजूरी घेतल्यानंतर बरोबर? आणि त्यांनतर झाले नाही तर आपल्या ऑफीसवर आम्ही मोर्चा आणू.

**अजित पाटील :-**

तीन दिवसानंतर साहेबांच्या मंजूरीने कार्यवाही करण्यात येईल.

**जयंत पाटील :-**

श्री. अजित पाटील साहेब, आपण सभागृहामध्ये बोलता.

**रतन पाटील :-**

साहेब, तुमचे अधिकारी उलट उत्तरे देतात.

**जयंत पाटील :-**

आम्हाला साहेबांची परवानगी पाहिजे हा अर्थ वेगळा. मा. महापौर तुम्हाला रुलिंग देतील. आपण सभागृहामध्ये बोलता. साहेबांनी परवानगी दिली तर आम्ही तोडु असे तुम्ही म्हणता. हे चुकीचे आहे.

**अजित पाटील :-,**

ठिक आहे. तीन दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

**जयंत पाटील :-**

मा. पिठासीन अधिकारी कोण आहेत? साहेब, आहेत का? त्यांच्या रुलिंगप्रमाणे झाले पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, लक्षवेधीमध्ये आलेल्या विषयावर कार्यवाही होणार की नाही?

**तुळशीदास म्हात्रे :-**

काहीही कार्यवाही होउ दे. मग आम्ही ती सहन करायची का? उद्या साहेब, बदलुन जाईल . साहेब उद्या बदलुन गेला तर. श्री. अजित पाटील, सर्व्हे. नं. २३३ तिथे सुध्दा आता सात झोपड्या झाल्या त्या मागे तोडल्या होत्या. पुन्हा तिकडे झोपड्या झाल्या तीसुध्दा कलेक्टरची जागा आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, अतिक्रमण विभाग मे हम लोग जो जो कम्पेंट करते है। आज तर एक भी कार्यवाही नही हुई है। आज आर. एन. पी पार्क मे गटर पर ऑफिस बनता है। कही भी दुकान बनती है। मेरे पास पचासो कम्पेंट हे। एक पर भी अतिक्रमणने कारवाई नही किया अतिक्रमण विभाग क्या कर रहा है? अतिक्रमण विभाग की जरुरत क्या है। सिर्फ पैसा वसुल करने के लिए है क्या ?

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, पिछली मा. महासभा मे इस विषय पर बहोत चर्चा हुई। हमने बहोत सारे प्रश्न भी पुछे। किसका प्रेशर है? इसके पिछे किसका हात है? लेकिन किसीने कोई जवाब नही दिया। मा. आयुक्त साहब भी बैठे थे ? सभी ने आश्वासन दिया की, यह कारवाई तुंरत होगी लेकिन आजतक उसपर कोई कारवाई हुई नही। ऑफिस पर नही हुई और झोपडपट्टीपर भी नही हुई। ऑफिस मतलब एक गाला बिकेगा यह गॅरेंटी मे आपको देता हु।ऐसे कई गाले मिरा - भाईंदर मे बनते है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

उसपर पहले से टॅक्स लग चुका है।

**हंसुकुमार पांडे :-**

टॅक्स लगते है। ओपन जगह पर टॅक्स लगाते दिया और बोला की, वहाँ गाला था। एक बारदान से बांधा हुआ गाला उसे ऑफिस माना जाता है क्या? जगह घेर लिया । उसको बोला हमारा पहले से गाला था। शेड था आपको प्लॅन के हिसाब से मुझे बताईये की वहॉ पर गाला कहाँ है। है क्या? नही है। आज की नयी बात कस्तुरी पार्क मे एक जगह प्लिंथ उठाकर रखा गया है। दो बार उसपर बिल्डींगं बन रही थी। दोनो बार उसको तोडा गया क्योंकी वह ग्रीन झोन मे है इसलिए तोडा गया। और फिर उसके उपर आज वापस काम चालु हो रहा है। कमिश्नर साहब ने श्री. अजित पाटील साहब को बोला है की, उसको तुंरत हटा दिया जाये। अब मै देखता हु की, कितने दिन मे हटता है वह श्री. संजय जैन नामका आदमी है वह क्लिअर कट बोलता है की, नगरपालिका को पैसा पहुँच गया है नगरपालिका कुछ नही करेगी और लोगों को गाली देता है। महिलाओंको गाली देता है। यह अपने महानगरपालिका के लिये शरम की बात है की, जो आदमी पैसा खाया लेकिन लोगों को बोलकर क्यो दिखाता है की, महानगरपालिका हमारी जेब मे है। कोई कुछ नही कर सकती है जैन नगर परिसर मे इतनी चाल बन गयी। क्या सी. आर. झेड मे चाल बन रही है यह महानगरपालिका को मालुम नही था। उसमे सबका टॅक्स लगा दिया गया। हम लोगो ने कई बार इसका कंम्प्लेंट किया। लेकिन उसका कुछ हुआ नही मेरे ख्याल से मा. महासभा का कोई अर्थ ही नही है। मा. महासभा सिर्फ पब्लिक को बेवकुफ बनाने के लिऐ रखा जाता है। मै आप लोगो को स्पष्ट बोलता हु। नगरसेवकोंका सिर्फ सुनना और उसपर कुछ कार्यवाही न करना इसके लिऐ मा. महासभा रखी जाती है। हम लोग बेवकुफ है जो गला फाडकर यहॉ चिल्लाते है। डायस पर बैठे लोगो को सुनाते है। लेकिन उसपर कोई कार्यवाही होती नही। उसका कारण सिर्फ एकही है की, मेरे खयाल से ठन - ठन गोपाल सब जगह पहुच जाता है।

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्य, श्री. हंसुकुमार पांडे यांनी जी सुचना केली आहे त्या संदर्भा मध्ये बांधकाम तोडण्याकरीता साईडवर इंजिनिअर आता आहेत आज संध्याकाळापर्यंत ते बांधकाम तोडले जाईल.

**हंसुकुमार पांडे :-**

गेल्या एक महिन्यात तुटले नाही ते कधी पर्यंत तुटते ते बघु.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या विषयाचे काय?

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलु इच्छिते की, मी गेले पंधरा दिवस यांच्याकडे कंम्प्लेंट केलेली आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर माझ्या विषयाचे काय? माझा विषय पहिल्यापासुन चालु आहे. माझा विषय कम्प्लिट करु द्या. नंतर कोणालाही बोलु द्या.

**मुक्ता रांजणकर :-**

पंधरा दिवसापासुन अतिक्रमणला पत्र दिले. अजुन त्याच्यावर करावाई नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

गेल्या मा. महासभेत आपण दिलेल्या रुलिंगवर इम्प्लिमेंटेशन होत नाही त्याचे काय?

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, तुमचे कर्मचारी आम्हाला असे शब्द बोलतात की, शेवटी तो ......

**अजित पाटील :-**

आपण सांगितलेल्याचा पंचनामा केलेला आहे. नोटीस देउन काम तोडण्याम येईल.

**मुक्ता रांजणकर :-**

एका साध्या कॉन्ट्रॉक्टरचे एवढे चालते. तो त्याचा माणुस आहे त्याचे अमुक - अमुक नाव आहे. त्याचे अतिक्रमण आम्ही कसे तोडायचे ? म्हणजे हे काय?

**अजित पाटील :-**

इंजिनिअरला सांगितले. त्यांने पंचनामा केलेला आहे. त्या गाळ्याचे बांधकाम तोडण्यात येईल.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, अतिक्रमणचा विषय आहे तो, थट्टा आणि मस्करीचा विषय नाही. मिरा - भाईंदर शहरामध्ये अनधिकृत बांधकाम अतिक्रमण आणि इनलिगल बिल्डींग हे जोराने चालले आहे असे पेपरमध्ये येते आणि काशिमिरा रोडवर किती अनाधिकृत बांधकामे आणि बिंल्डीग झाल्या हे आपण डोळ्याने बघतो. श्री. अजित पाटील साहेबांकडे जाते तर ते बोलतात माझा सॅन्डविच झाला आहे आणि मला या अग्निवर बसवलेले आहे करणारे करुन गेले आणि मी बसलो आहे. त्यांची काही चुक नाही. परंतु हा हसण्याचा मुद्दा नाही. कारण ह्याच्यामध्ये फोटोपास बनवतात आणि गाळा व्हायच्या अगोदर त्याला टॅक्स लागतो. त्या कर्मचायावर आपण काय कार्यवाही करणार? त्यांना ताबडतोब सस्पेंड करा असा मी ठराव मांडत आहे. दुसरे श्री. मदन उदित नारायण सिंग यांनी मागच्या मा. महासभेत झोपडपट्टीचा उल्लेख केला होता आणि सोमवारी ते बांधकाम तोडायचे आहे असे आदेश झाला होता. परंतु तिकडे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ऑफिस उघडले आहे आणि तिकडे झोपडपट्टी झालेली आहे. ती झोपडपट्टी का हटवत नाही? कोणाचा आशिर्वाद आहे? असाही प्रश्न विचारला होता. हा थट्टेचा आणि मस्करीचा विषय नाही. पुर्ण शहराला आपल्याला अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामाचे शहर बनवायचे आहे का? श्री. अजित पाटील ह्यांना काही प्रॉब्लेम असेल किंवा कोणाची भिती असेल तर त्यांना ते पद सोडावे आणि दुसरा कोणी डॅशिंग असेल त्याला द्यावे. आणि श्री. किरण राठोड यांनी रिपोर्ट सादर केला नाही असे वक्तव्य त्यांनी केले. मी श्री. राठोड यांच्याकडे गेलो. त्यांनी मला रिपोर्ट दाखवला. त्यांनी लेखी रिपोर्ट सादर केलेला आहे. त्याच्यावर कोणाची बांधिलकी आहे, कोणाचे प्रेशर आहे म्हणुन त्याच्यावर कार्यवाही होत नाही. हा हसायचा आणि मस्करीचा विषय नाही.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौराच्यां परवानगीने बोलतो. श्री. राठोड यांना दिलेला फोन नेउन कुठेतरी फेकुन टाका तो कुठेतरी झोपलेला असतो. किंवा दारु पिउन असतो. त्याचे इकडे कामच नाही. त्याला कुठेतरी एखाद्या गटारावर मुकादम म्हणुन ठेवा त्याचे ते अतिक्रमणचे काम नाही.

**प्रभात पाटील :-**

मघाशी मा. उपमहापौर आमच्या बरोबर कमिशनर साहेबांच्या दालनामध्ये होते. आता आम्ही कॉग्रेस झालो. सभागृहामध्ये बोलुन थकलो म्हणुन कमिशनर साहेबांच्या दालनात जाउन बसुन अनधिकृत बांधकामाचा विषय घेतला. ही नामुष्की या मा. महासभेवर यायला लागलेली आहे की, मा. महासभेमध्ये घसा फोडण्यात काही अर्थ राहिलेला नाही. आता तिथे जा त्यांच्याजवळ बसा आणि काम करुन घ्या. श्री. अजित पाटील आता बोलले की, तिथे माणसे गेलेली आहेत. डेप्युटी कमिशनर साहेब, आम्ही मधाशी बसुन काही गोष्टी सांगितल्या त्याचा तो परिणाम आहे. मघाशी कमिश्नर साहेबांच्या तोंडातुन एक वाक्य बाहेर पडले की, काही नगरसेवक सांगतात. ते तोडा आणि नगरसेवक सांगतात त्यांना अभय द्या.

**प्रभात पाटील :-**

सगळीकडे बोलले जाते बोलबाला केला जातो. परंतु, आम्ही या अनधिकृत बांधकामाच्या विरोधात बोलतो. तुमच्याकडून कारवाई होत नाही. आम्ही सच्चे आहोत म्हणून आम्ही बोलतो. कारवाई करणे हे तुमचे काम आहे आणि तुमच्याकडून कारवाई झाली पाहिजे. मघाशी पोलीस प्रोटेक्शनचा विषय निघाला. मी मा. महापौरांना विनंती करेन. मिरा भाईंदरमध्ये पोलिस कशासाठी आहेत हे मला माहिती नाही. पण तुमच्या मागणीवर पोलिस येत असतील तर मा. महापौर साहेबा, तुम्ही तुमचा अधिकार वापरून अनधिकृत बांधकामासाठी पोलिस द्या. तुमच्या मागणीवर जर महापालिकेत पोलिस येत असतील तर तुम्ही अनधिकृत बांधकामासाठी द्या. परंतु ही अनधिकृत बांधकामे वाढायला नको किंवा तोडली गेली पाहिजेत. अशी मी तुम्हाला विनंती करेन. तुम्ही तुमचा अधिकार येथे वापरा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला माझी सुचना मांडण्यासाठी परवानगी द्यावी ही विनंती. मा. महापौर मॅडम, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानासमोर आंबेडकर नगर आणि भोलानगरच्या ज्या पात्र झोपडीधारकांची घरे तोडल्यासंबंधी अनेक सन्मा. नगरसेवकांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला. या सगळ्या झोपडीधारकांची नावे २००२ च्या मतदार यादीमध्ये पण होती. याच्याआधी लोकसभा आणि विधानसभेचे देखील मतदान झालेले आहे. त्यादेखील मतदार यादीमध्ये यांची नावे आहेत. त्यांचे फोटोपासदेखील महानगरपालिकेने इश्यू केलेले आहेत. सन्मा. नगरसेवकांनी मला थोडे को-ऑपरेट करावे ही विनंती. फार गंभीर विषय आहे. प्रत्येकांना जर झोपडपट्टी बेकायदेशीर दिसते तर सर्व्हिस रोडमधील मोठमोठया इमारती का दिसत नाहीत? महानगरपालिकेच्या समोर राममंदिर रोडवर महानगरपालिकेने ज्यावेळी नोटीस लावली. ती नोटीस त्या बिल्डरने स्विकारलेली नाही. तर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तिकडे जाऊन भिंतीवर नोटीस लावली व फोटो काढला. त्या बिल्डिंगच्या स्लॅबचे काम महानगरपालिकेच्या समोर चालू आहे. आणि अजूनपर्यंत श्री. अजित पाटील साहेब, त्या बिल्डिंगवर हेअरिंग का लावत नाहीत? हे मी त्यांना विचारतो. त्या गोष्टीला एक महिन्याहून जास्त झालेला आहे. या बाजूला तुम्ही फक्त झोपडपट्टीची बाजू घेऊन बोलता. फक्त तुम्हांला झोपडपट्टी बेकायदेशीर दिसतात. त्या हायवेवर, दहिसर ते वर्सोवाच्या ब्रिजपर्यंत आणि गोल्डननेस्ट ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत त्या दोन्ही सर्व्हिस रोडवर जी बेकायदेशीर बांधकामे होतात त्या बेकायदेशीर बांधकामांना मा. महापौर मॅडम आपण दोन महिन्यापूर्वी रुलिंग दिले. तरीदेखिल ते बेकायदेशीर आणि अतिक्रमण का हटविण्यात येत नाहीत? तुम्हाला फक्त झापेडया दिसतात? ज्या झोपडयांच्या विरोधात बोलता त्या मतदारांकडे मते मागण्यासाठी जाऊ नये. मा. महापौर मॅडम, मी आज याठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छितो, ०६ डिसेंबरच्या आधी या ठिकाणी तीन महासभा झाल्या. या तीन महासभांमध्ये सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांचे ''ज'' चे प्रस्ताव होते की, आंबेडकर नगर आणि भोला नगर येथील लोकांना आपण इंद्रलोक आणि नवघर येथे पुर्नवसन करावे. सन्मा. उपमहापौर साहेबांनी देखील आमचा ''ज'' प्रस्ताव एकदा फेटाळला. कारण, त्या मिटींगमध्ये आपण गैरहजर होत्या. त्यानंतर दोन मिटींगमध्ये देखील आपण आमचे विषय फेटाळलात आणि सांगितले की, पुढच्या वेळेस हा विषय विषयपत्रिकेवर घेण्यात येईल. ०६ डिसेंबरच्या मिटींगमध्ये आपल्या अधिकाऱ्यांनी दिशाभूल केलेली आहे. मा. महापौर मॅडम, बाकीचे नगरसेवक बोलत असताना मी काहीच बोललो नव्हतो. आपण माझे बोलणे फार गांर्भीयपूर्वक ऐकावे. झोपडपट्टीचे लोक झोपडपट्टीच्या रस्त्यावर का राहतात? त्यांची पक्की घरे तुम्ही तोडलेली आहेत, प्रशासनाने तोडलेली आहेत. या ठिकाणी सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस आणि श्री. आसिफ शेख ह्यांनी जो ठराव मांडला त्यावेळी मी आणि सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांनी या ठिकाणी उभे राहून आपल्याला विरोध केला होता की, आपण अशा प्रकारचा ठराव करु नका. नवघरला एकशे एक घरे तयार आहेत. त्यापैकी महानगरपालिका बोलते की, मर्यादित एकशे एक घरांपैकी एकूण ५९ सदनिका जागेवर बांधायच्या आहेत. स्थळ निरिक्षण केले असता ६७ सदनिकांचे बांधकाम झाले असून ४१ सदनिका पूर्ण झालेल्या आहेत असेदेखील एका ठिकाणी प्रशासन म्हणते. त्याच्यानंतर त्यांनी खाली स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, याबाबत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ०९ आणि टेबल ३(१) (ब) नुसार विकास योजना अंमलबजावणीकामी होणाऱ्या विस्थापितांना सदरील घरे द्यायची आहेत.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, हा विषय इथे नाही आणि त्याच्याशिवाय त्या झोपडया ह्या आत्ता त्या डिवायडरमध्ये झालेल्या आहेत. आणि ज्या झोपडया आपण त्यांना बांधून देणार आहोत त्या ज्यांचे फोटोपास १९९५ च्या अगोदरचे असतील त्यांच्यासाठी आहेत. आत्ता डिवायडरमध्ये बांधलेल्या आहेत त्यांना आपल्या या योजनेमध्ये झापेडया कशा दिल्या जातील? हे नगरसेवक चुकीचे वक्तव्य करतात. आपण याला रुलिंग द्यावे. पुढे विषय वाढवू नये.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. जेव्हा श्री. नाईक साहेबांनी झोपडया तोडलेल्या तेव्हा तिकडे जवळ-जवळ दहा-पंधरा झोपडया होत्या. आत्ता तिकडे खूपच झोपडया झाल्या आहेत. या सगळ्या झोपडया

कोणामुळे झाल्या? आज तुम्ही जर तिकडे दहा झोपडया तोडल्या. तर तिकडे रात्रीच्या रात्री पंधरा झोपडया बांधल्या जातात.

**परशुराम पाटील :-**

त्या डिवायडरमध्ये वोटींग लिस्टमध्ये नाव म्हणता, तर वोटींग लिस्टमध्ये कुठल्या एरियातील आहे. ते तुम्ही प्रुफ करु शकाल का?

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या इकडे आंबेडकर नगर झोपडपट्टीमध्ये औषध फवारणी आणि पावडर टाकली जाते. तर सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा यांना तिकडे मुकादम ठेवले आहे का?

**रोहित सुवर्णा :-**

मी मुकादम आहे.

(सभागृहात गोंधळ)

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मांडलेला जो ठराव आहे. जो सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख आणि सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस यांनी मांडला. तो मी इथे वाचून दाखवतो. याबाबत आत्तापर्यंत विकास योजनेतील नविन रस्ते.......

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तिथल्या सगळ्या झोपडया तोडून टाका. तिथे एकाचाही फोटोपास आणि टॅक्स पावती नाही. हे कोणाच्या आर्शिवादाने दिलेले आहेत.

**परशुराम पाटील :-**

मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहेब, आपण रुलिंग द्या.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तिकडे टँकरने पाणी पुरवठा केला जातो आणि दुसऱ्यांना पोलिस स्टेशनला का नेले जाते?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही झोपडपट्टी हटवा पण त्यांना त्यांच्या रुमचा ताबा द्या.

**रोहित सुवर्णा :-**

त्यांना तुम्ही घर द्या. घर तयार आहे.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना पाणी देऊन पोलिस स्टेशनला दुसऱ्यांची कंम्लेंट कशावरून केली जाते? आपण त्यांना पाणी कशाला देता?

**मा. महापौर :-**

आपण सर्वांनी बसून घ्या.

**परशुराम पाटील :-**

त्या रस्त्यामध्ये आज किती घाण आहे. तुम्ही सुंदर मिरा भाईंदर म्हणता. आत्ता त्यांना ताबा द्या ते हटवा हे कोणी शिकवले आहे. वाटेल तर उद्या मी पण तिकडे दहा झोपडया बांधू शकेन.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही पहिल्यापासून बोलतो. मॅडम, जी घरे तयार आहेत. तिथे पुर्नवसन करा.

**परशुराम पाटील :-**

तिथे काही गरज नाही.

**रोहित सुवर्णा :-**

तात्पुरती व्यवस्था जी असेल.....

**परशुराम पाटील :-**

काही तात्पुरती व्यवस्था करण्याची गरज नाही.

**संगिता म्हात्रे :-**

स्वतःला गरज असेल तर आधी आपले पुर्नवसन करुन घ्या.

**मा. महापौर :-**

सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य यांच्या भावना लक्षात घेता.....

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषय अतिक्रमणचा चाललेला आहे. शहरामध्ये ज्या झोपडपट्टया बनतात. सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंग यांनी जो विषय उचलला. त्या विषयावर या सभागृहामध्ये विषय चर्चेला आलेला आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या विषयाचे काय झाले?

**जयंत पाटील :-**

हाऊसिंग फॉर डिसहाउॅस्ड हा विषय वेगळा आहे. मूळात त्याचे नॉर्म्स ठरलेले नाहीत. शासनाचे काय नियम आहेत. ते आपल्याला माहिती नाहीत. आणि हाऊस कोणाला द्यायचे? डिसहाऊस्ड कोण आहेत? महापालिकेच्या रस्त्यामध्ये किंवा महापालिकेच्या एखाद्या विकासकामामध्ये अडथळा येत असेल तर त्यांना ते द्यायचे असा नियम आहे. आपण जर विकास नियंत्रण नियमावली जर पाहिली. तर त्याच्यातून आपल्याला कळेल की, महापालिकेचे प्रकल्प बाधित जे झाले असतील त्यांना ते द्यायचे असे आहे. कोणीही येऊन झोपडपट्टी बांधतो आणि त्यांना आपण रूम द्यायचे असा कुठेही नियम नाही. प्रश्न आहे की, ज्या झोपडपट्टया बनत आहेत. त्यासंबंधी विषय चर्चेला आलेला आहे. त्याबाबत आपण कृपा करुन निर्णय द्यावा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील जे बोलले ते बरोबर आहे.

**रोहिदास पाटीलः-**

मा. महापौर मॅडम, एक अति महत्वाचा विषय आलेला आहे. ज्याच्यावर कुठेतरी चर्चा केली. ते वास्तविक आहे की, याच्यावर निश्चित धोरण तुम्ही सांगत नाहीत, उत्तर देत नाही. आणि अधिकारीही त्याच्यावर बोट ठेवून बोलत नाहीत. जे रोड डी.पी प्लॅनमध्ये दाखवले आहेत. त्याचे प्रोटेक्शन करण्याची जबाबदारी कोणाची आहे? खाजगी जागेत तुम्ही भरणी करता आणि त्याच्यामध्ये जर कोणी अतिक्रमण करतो तर त्याच्यावर तुम्ही काही बोलत नाहीत. आत्ता ९० फूट रोड आहे, गोल्डन नेस्टचा रस्ता आहे. १२० फूटामध्ये कुठेही बांधकाम येऊ नये. असा त्रिवार सत्याचा नियम आहे. मा. उपायुक्त श्री. बालाजी खतगांवकर साहेब, बरोबर आहे की, चुकीचे बोलतो? तुमचा डी.पी रोड ९० फूटांचा आहे. त्यांच्या पंधरा फूट या बाजूला पंधरा फूट त्या बाजूला. १२० फूटामध्ये बांधकाम नसावे. त्याला टी.पी परवानगी देत नाही. आत्ता ९० फूटावर तीन माळ्याची बिल्डिंग चालली आहे. कोणाही अधिकाऱ्याला दिसत नाही? कोणी नगरसेवकाने तक्रार करायला पाहिजे का? पण हे कशासाठी? एखादा नगरसेवक कशासाठी बोलतो? जे डी.पी.रोड आहेत ते डी.पी.रोड प्रोटेक्ट करायचे हे महापालिकेतील कोणत्या खात्याचे कर्तव्य आहे तेवढेच निवेदन तुम्ही करा. मा. महापौर मॅडम, मी आयुक्तांना प्रश्न विचारतो. हा नियम आहे. तुमच्या डोक्यावर तुम्ही व्याप घेऊ नका. त्यांनाच ते काम करु द्या की, डी.पी रोड मध्ये जो रस्ता दाखवलेला आहे. त्याला प्रोटेक्ट करण्याचे काम कोणाचे? कधी कधी असाही मॅसेज जातो की, नगरसेवक तक्रार करतात आणि गप्प बसतात. ते कशासाठी? जी तुमची कर्तव्ये आहेत ती तरी पार पाडा. नाल्यामध्ये बांधकाम झालेले आहे. रस्त्यामध्ये बांधकाम झालेले आहे. तुम्ही अडीच कोटी रुपये खर्च करुन नाला काढला त्याच्यात बांधकाम झाले आहे. ते कोणाला दिसणार कसे नाही? आपण सगळेच त्या रस्त्याने जातो - येतो. सन्मा. सदस्य श्री. उदितनारायण सिंग हे जी मागणी करतात. मॅडम, तुम्ही सन्मा. सदस्य मदन उदितनारायण सिंग यांना शिक्षा केली आहे का? म्हणजे ते तुमच्या बरोबर फिरतात म्हणून तुम्ही शिक्षा करता का? हे सभागृह आहे. या सभागृहाचे आम्ही तुम्हाला सन्मानाने बघतो. तुम्ही सगळ्यांना सारखा न्याय द्यायला पाहिजे.तुम्ही सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंग यांना एक तास उभे केले.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसून घ्या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही लक्षवेधी देतो. अतिक्रमणसाठी पत्र देतो. परंतु, त्याच्यावर काही कार्यवाही होत नाही. मग आम्ही काय करायचे? मी आत्ता सगळ्या पत्रांना इथे महापालिकेतच आग लावतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, आपण उपस्थित केलेल्या प्रश्नावरच मी रुलिंग देते. आपण बसून घ्या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

तुम्ही मागच्यावेळीसुध्दा रुलिंग दिले होते. त्यारुलिंगचे काय झाले? तुमच्या रुलिंगला हे लोक काही ऐकत नाहीत. रुलिंगला काहीच महत्व देत नाहीत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंग तसेच सभागृहातील सन्मा. सदस्य श्री. परशुराम पाटील, श्री. तुळशीदास म्हात्रे, श्री. हंसुकुमार पांडेजी, श्री. जयंत पाटील, श्री. रतन पाटील, श्री. नरेंद्र मेहता तसेच सदस्या श्रीम. मुक्ता रांजणकर, श्रीम. रिटा शाह, श्रीम. प्रभात पाटील यांनी सभागृहामध्ये शहरामध्ये होणाऱ्या विविध ठिकाणच्या अतिक्रमणाबाबत आपले मत व्यक्त केले आणि हे अतिक्रमण शहरातून दुर करण्यासाठी प्रत्येक वेळेस मा. महासभेमध्ये या विषयावर जोरदार चर्चा केली जाते आणि परत एक महिना पूर्ण झाला की, तोच विषय पुन्हा मा. महासभेत येतो. संबंधित अधिकारी याबाबतीत कठोर निर्णय घेत नाहीत असे या सभागृहात दिसून आलेले आहे. मा. महापौरांचे रुलिंग तसेच सभागृहातून आलेल्या सदस्यांच्या वेदना, त्यांची या शहरातील चांगले शहर असावे म्हणून जी तळमळ आहे ही प्रत्येकाची तळमळ आहे. शहराचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी ते या सभागृहामध्ये आहेत. त्यांना नक्कीच मानाचे स्थान आहे आणि डायसवरुन जे रुलिंग दिले

जाते त्याच्यावर आपण त्वरीत अंमलबजावणी करावी अशी मी या ठिकाणी उपस्थित असलेले मा. उपायुक्त (मख्यालय) आणि अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांना मा. आयुक्तांच्या शेऱ्याची वाट न बघता आपण या अतिक्रमणावर मोहिम राबवली गेली पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

सर्व्हिस रोडवरचे बोला.

**हंसुकुमार पांडे :-**

टेम्पो स्टॅन्ड.

**मा. महापौर :-**

तसेच, सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे यांनी सांगितल्याप्रमाणे टेम्पो स्टॅन्ड. तसेच, काशिमिरापासुन पूर्ण छत्रपती शिवाजी मार्ग यावर सर्व्हिस रोडबाबत..........

**मदन उदित नारायण सिंग** :-

जेसलपार्क चौपाटीवर सेठ बिल्डरने अतिक्रमण केले आहे.

**चंद्रकांत मोदी** :-

कनकिया पोलिस स्टैशन है। उधर भी झोपडपट्टी बहुत है। उधर भी ॲक्सीडंट ज्यादा होता है। दुसरा सेंट जोसेफ स्कुल के गेट के बाहर पास गॅरेज बनाया गया है। उधर बच्चो को बहोत तकलीफ होती है।

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी आपआपली मते व्यक्त केलेली आहेत. त्यावर त्वरीत कार्यवाही करायला सुरुवात केली पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौरांनी रुलिंग दिले त्याप्रमाणे जर कार्यवाही झाली नाही तर पुढच्या मा. महासभेत सर्व लक्षवेधी आणि सगळी पत्र डायससमोर आणून मी आग लावणार.

**मा. महापौर :-**

आपल्याला तशी वेळ येणार नाही.

**रतन पाटील :-**

त्याचबरोबर ज्यांनी आपले खोटे पुरावे सादर करुन फोटोपास बनवले त्याचीसुध्दा चौकशी लावावी.

**प्रभात पाटील :-**

ह्या सुचनेचा जरुर विचार करावा. सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांनी मांडलेली सुचना जरी असेल तरी खोट्या पध्दतीने जे फोटोपास तयार करतात, आजही बनतात. त्या अधिकाऱ्यांवर पहिल्यांदा कारवाई झाली पाहिजे असे तुम्ही आदेश द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, ह्यांनी मांडलेली सुचना की, फोटोपासची चौकशी करुन त्याचा माहिती अहवाल सर्वांपुढे सादर करावा. तसेच सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा ह्यांनी झोपडपट्टीबाबत जी त्यांची समस्या सभागृहापुढे मांडलेली आहे. जे प्रकल्पबाधीत निवासी झालेले आहेत. त्यांना विस्थापित करणे ही सुध्दा आपली जबाबदारी आहे. तर आपण हाऊसिंग सोसायटीमध्ये आपल्याला जी १०१ घरे मिळणार आहेत. हाऊसिंग फॉर डिसहाऊस हा प्रकल्प आपण राबवलेला आहे आणि त्याच्या अंतर्गत आपल्याला जी १०१ घरे मिळणार आहेत. त्यापैकी ४० ते ४१ घरे आपल्या ताब्यात आलेली आहेत आणि जे डि.सी. रुलमध्ये नियम बनवून त्यामध्ये जे पात्र होतात त्यांना तिथे प्रस्थापित केले जाईल. अशाप्रकारे आपल्याही समस्येचे निराकारण होईल. तर सर्व सदस्यांनी जे अतिक्रमणच्या बाबतीत पत्रव्यवहार केलेले आहेत. ते महापौर दालनामध्ये आणून आपली कारवाई झाली किंवा नाही याचीसुध्दा शहानिशा करा आणि ती कारवाई कुठंपर्यंत होत आहे याचीसुध्दा महिती द्या. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या कॉन्टॅक्टमध्ये राहून ती कारवाई लवकरात लवकर व्हावी म्हणून आपण अग्रेसर राहा.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण आत्ता रुलिंग दिले की, संबंधित बाधीत जे झोपडपट्टीमध्ये आहेत. त्यांना हाऊस फॉर डिसहाऊसमध्ये जी घरे उपलब्ध होते तिथे घरे देणार. पण निश्चित त्या कायद्याच्या अंतर्गत कायदा काय आहे ते तुम्ही बघा.

**मा. महापौर :-**

कायद्याच्या अंतर्गत राहूनच त्यांना घरे देणार.

**रतन पाटील :-**

ज्यांचे त्या जागेचे पुरावे, सरकारी जागा सोडून जागेचे मालकी हक्कपत्र असेल अशानांच ते द्यायचे असते. म्हणून ते बघून त्या पध्दतीने देण्यात यावे.

**मा. महापौर :-**

आपली सुचना घेतलेली आहे. सचिवांनी पुढील कामकाजास सुरुवात करावी.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सदानंदनगर, मुर्धा येथे २५० स्क्वेअर फुट झोपडपट्टीमध्ये फोटोपास दिलेले आहे. तो आपण तपासून काढावा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. आपण आत्ताच मुद्दा आणला की, फोटोपास हे अनधिकृतपणे दिले जातात. कोणत्या झोपडपट्टीची नाव कुठे आली आहेत हे माहिती पडत नाही. त्यासाठी मी प्रशासनाला पत्र दिलेले. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व झोपडपट्ट्या गलिच्छ वस्त्या व दलित वस्त्या घोषित करणेबाबत. अद्यापपर्यंत आपण त्या घोषीत केलेल्या नाहीत आणि हा सविस्तर विषय विषयपटलावर यावा. कारण कोणत्या झापेडपट्टीमध्ये कोण राहते आणि कोणत्या झोपडपट्टीमध्ये त्याचे नाव येते ते माहिती नसते. त्या कारणाने हे फोटोपास अनधिकृतपणे दिले जातात आणि त्याचे अतिक्रमण अन्य झोपडपट्टीवर होते आणि झोपडपट्टी वाढत जाते. आपण जो मुद्दा आता उपस्थित केलेला आहे त्याच्याशी मी सहमत आहे. परंतु, मी प्रशासनाला झोपडपट्ट्या घोषीत करण्याबाबत जे पत्र दिलेले आहे. तो सविस्तर विषय विषयपटलावर घेऊन त्याचा निर्णय घेण्यांत यावा.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते. मॅडम, विजय पार्कला रिलायन्स गॅसवाल्यांचे काम चालू आहे आणि तिथे खोदकाम झालेले आहे. रविवारी सकाळी साडेसहा वाजता एम.एच.०४/एच८७६१ हा ट्रक होता आणि आपण विजय पार्कचा रस्ता चांगला बनवलेला होता. पण तो खोदलेला आहे आणि तिथे जे मोठे मोठे दगड होते ते चोरीला गेलेले आहेत. मी श्री. दिपक खांबित साहेबांना रविवारी सकाळी फोनदेखील केला. परंतु, साहेबांचा फोन स्विच ऑफ होता. दुसरी गोष्ट ब्रॉड वे अव्हेन्युमध्ये एस.टी.पी. टँक आहे. त्या एस.टी.पी. टँकमुळे तेथील रहिवाशांना फार त्रास होत आहे. तिथे दुर्गंधी पसरलेली आहे. गेल्या वेळेससुध्दा या विषयावर मी बोलले होते. पण आपल्याकडून काहीच कार्यवाही झालेली नाही आणि श्री. खांबित साहेब, आपण गेल्या दोन महिन्यापूर्वी मला आश्वासन दिले होते की, गोकुळ धामचे गटार चार दिवसामध्ये ताबडतोब बांधून देईन. परंतु, ठेकेदाराच्या काही अडचणीमुळे ते बनवले नाही. पण आज जवळजवळ दोन महिने उलटून गेले तरी त्या गटाराचे काम अजून झालेले नाही. तर ते कधी होणार आहे की, आपण कागदोपत्रीच दाखवता? गेल्या वेळेससुध्दा मी तुमच्यावर हा आरोप केला होता की, हे गटार आपण कागदोपत्री तर दाखवत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या श्रीम. सुरेखा गायकवाड यांनी उपस्थित केलेला मुद्दा याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

माहिती घेऊन उत्तर द्यावे लागेल. दोन्ही कामांची माहिती घेतो.

**सुरेखा गायकवाड :-**

मी साडेसहा वाजता त्यांना पकडले. मला तिथल्या रहिवाशांचा फोन आला होता की, ताई, असे झाले आहे. तेव्हा मी नंबर लिहून घेतला आणि ते थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा गाडी निघून गेली.

**दिपक खांबित :-**

दोन्ही कामाबाबतची माहिती घेउन मी तुम्हाला सांगतो.

**सुरेखा गायकवाड :-**

श्री. खांबित साहेब, गोकुळ धामचे गटार .........

**दिपक खंबित :-**

त्याची पण माहिती घेउन मी तुम्हाला सांगतो.

**सुरेखा गायकवाड :-**

माहिती घेउन म्हणजे किती दिवस? साहेब, आता दोन वर्षे झाली. नारळ फोडलेला त्याला दोन वर्षे झाली.

**दिपक खांबित :-**

मी स्वतः पाहणी करुन तुम्हाला आजच सांगतो.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**सुरेखा गायकवाड :-**

ब्रॉड वे अव्हेन्यु बद्दल मला सांगा. तिथे आपण काय करणार आहात? तिथले लोक आजारी पडले आहेत. त्यांना त्रास होतो. त्याच्याबद्दल आपण काही कार्यवाही करणार आहात की नाही? पुढच्या वेळेस काय साहेब, प्रत्येक ासवेळी पुढच्या वेळेस. आमची पाच वर्षे निघून गेली तरी तुमची पुढची वेळ कधी येणार?

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर महोदया, दुसरी लक्षवेधी जी होती ती अतिशय महत्वाची लक्षवेधी आहे. त्याच्यावर मघाशी मा. उपमहापौर साहेबांनी निवेदन केले. पण त्यामध्ये खरी वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या शिक्षण अधिकाऱ्याला आपण कार्यमुक्त केले असे या ठिकाणी सांगितले गेले. मागेसुध्दा सभागृहामध्ये मा. आयुक्तांनी आश्वासने दिली होती. सर्व नगरसेवकांनी याच्यावर गदारोळ माजवला होता की, आता याच्यापुढे ते शिक्षण अधिकारी येणार नाहीत. शिक्षण अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केले असेल, त्यांची बदली झाली असेल किंवा अन्यत्र त्यांना हाकलण्यात आले असेल किंवा त्याचे कार्यालय सील केले असेल. या गोष्टींशी नगरसेवकांना काही देणे-घेणे नाही. या ठिकाणी महत्वाची बाब अशी आहे की, कुठलाही शिक्षण अधिकारी ड्युटीवर नसताना महापालिका शाळा आणि खाजगी शाळा ज्या प्राथमिक शाळा आहेत, ज्यांना अनुदान प्राप्त आहे. अशा सगळ्या शाळांचे वेतन बिल पाठविण्याचे प्रॉब्लेम सुरु झालेले आहेत. काही शाळांची वेतन बिले पे युनिटने परत पाठविलेली आहेत. त्याच्यामुळे त्यांचे वेतन थांबवलेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये शिक्षण अधिकारी नसताना काही शाळांमध्ये मुख्याध्यापक बदली झाले. दुसरे प्रभारी मुख्याध्यापक नेमले, त्यालासुध्दा मान्यता मिळत नाही. अतिशय महत्वाचा प्रश्न असून मोठे संकट उभे राहिलेले आहे. या ठिकाणी जे सांगितले गेले की, त्यांची बदली झाली किंवा त्यांना कार्यमुक्त केले ही बाब चुकीची आहे. अजुनही श्री. सुर्यवंशी हेच शिक्षण अधिकारी आहेत. फक्त ते कार्यालयात बसत नाहीत. ते भाईंदरमध्ये शाळांमध्ये फिरत असतात आणि अजूनही ते शिक्षण विभागाचे काम करत आहेत. प्रशासनाने कोणत्या बेसवर हे सांगितले की त्यांना आम्ही बदललेले आहे. ते परत येणार नाहीत. तेच मला कळत नाही. प्रशासनाने ही भुमिका स्पष्ट करावी की, तुम्हाला त्यांची बदली करायची आहे का? तुम्हाला त्यांना परत पाठवायचे आहे का? आणि ते पाठवायचे असेल तर त्याला प्रोसिजर आहे. ते प्रोसिजर तुम्हाला ॲडॉप्ट करायचे आहे की नाही? फक्त या ठिकाणी आश्वासने द्यायची की, पुन्हा तो शिक्षण अधिकारी दिसणार नाही. पुढच्या मिटींगला दिसणार नाही. अशा पध्दतीचे निवेदन मा. आयुक्तांनी चार महिन्यापूर्वी निवेदन केले होते आणि अजुनही शिक्षण तेच शिक्षण अधिकारी आहेत. शिक्षण अधिकारी आहेत, त्यांना बसायला कार्यालय नाही. ते कुठलेही प्रशासकिय कामकाज करत नाहीत. शाळांची कामे थांबलेली आहेत, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत जी केंद्रे चालतात त्यांनासुध्दा गेले दहा महिने वेतन दिलेले नाही. खिचडीच्या बाबतीमध्ये सुध्दा हा सगळा गोंधळ निर्माण झालेला आहे. एवढी मोठी महापालिका असताना आपल्याकडे एक अधिकारी जो आपल्याला योग्य वाटत नाही. तो आपण बदलु शकत नाही ही खेदजनक बाब आहे. ज्या खात्याने त्यांची नेमणूक केली होती त्या खात्याकडे आपण त्यांची बदली मागितलीच नाही किंवा त्यांना कार्यमुक्त करा असे त्यांना सांगितलेच नाही. तुमच्या लेव्हलला तुम्ही आदेश काढला आणि तो आदेश महापालिकेतच राहिला. तो आदेश ज्या अधिकाऱ्यापुढे किंवा ज्या ऑथोरिटीकडे जायला पाहिजे. त्या ऑथोरिटीकडे गेलाच नाही. आता डेप्युटी डायरेक्टर ही ऑथोरिटी नाही. तुम्हाला मी हे सांगु इच्छितो की, डेप्युटी डायरेक्टर त्यांची नेमणूक करत नाही किंवा त्यांची बदलीसुध्दा करत नाही किंवा प्रतिनियुक्तीवर गेलेले अधिकारी परत बोलवू शकत नाही. त्यांची नेमणूक शिक्षण खात्याच्या सचिवांनी केलेली आहे. त्याच्यामुळे महापालिकेने, मा. आयुक्तांनी ही बाब लक्षात घ्यावी की, त्यांची नेमणूक रद्द करायची असेल किंवा त्यांना प्रतिनियुक्तीवरुन मागे घ्यायचे असेल तर तुम्हाला सचिवांनाच भेटायला पाहिजे. त्यांनाच तो प्रस्ताव द्यायला पाहिजे. नाहीतर अजून किती महिने हे असेच चालू राहील आणि सगळ्यांचे कामे अडली आहेत. आमच्या शाळांचीसुध्दा सगळी वेतन बिले जशीच्या तशी पडून आहेत. आता त्याच्यावर श्री. परब हे सही करतात असे मला वाटते. कोणीतरी प्रशासन अधिकारी म्हणून त्यांना चार्ज दिलेला आहे. असा प्रशासन अधिकाऱ्याचा चार्ज कोणाला कसा देता येतो? जे सक्षम अधिकारी आहेत त्यांना प्रशासन अधिकाऱ्याचा चार्ज देता येईल. ते मग प्रभारी प्रशासन अधिकारी तथा त्यांची काहीतरी दुसरी पोस्ट आहे असे करुन सह्या करतात आणि वेतन बिल पे युनिटमध्ये ॲक्सेप्ट केले जात नाही. आणि सगळे प्रस्ताव तसेच रखडून आहेत. आपण नक्की सांगा. आता मा. आयुक्त साहेब इथे नाहीत. मा. उपायुक्त साहेबांनी नक्की दिशा सांगावी की, आम्ही असे करणार आहोत.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला त्याचा खुलासा करतो. शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी श्री. सुर्यवंशी यांच्याबाबत गंभीर तक्रारी होत्या. सभागृहामध्ये सुध्दा त्याबाबत चर्चा घडवून आणली होती. या सर्व बाबींचा विचार करुन मा. आयुक्तांनी एम.सी.एस.आर. खाली शासनाला एक महिन्याची पूर्व सुचना देउन श्री. सुर्यवंशी यांना कार्यमुक्त केलेले आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याबाबत नोंद घेउन त्यांची इतरत्र बदली करणे अपेक्षित आहे. पण ते होत नाही. ही बाब शासनाच्या निर्दशनास आणलेली आहे. संबंधित विभागाच्या सचिवांनासुध्दा याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. श्री. सुर्यवंशी यांचा या ठिकाणी काय इंटरेस्ट आहे हा मुख्य मुद्दा आहे. या परिसरातील अधिपत्याखाली खाजगी व शासकिय शाळांच्या कामकाजामध्ये व्यत्यय होउ नये म्हणून. प्रशासन अधिकाऱ्याचे कामकाज मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिक्षक श्री. परब यांच्याकडे देण्यात आलेले आहे. त्यांनी जो सहीचा वापर करणे अपेक्षित होते. त्यांनी मा. सभापतींच्या सहीने वेतन दिल्यमुळे ते कॅश होउ शकले नाहीत. त्यामध्ये दुरुस्ती करण्यांत आलेली आहे आणि आपण या ठिकाणी मुद्दा उपस्थित केल्याप्रमाणे महाराष्ट्र शिक्षण अधिनियमात जी तरतुद आहे की, महापालिकेला जरी शासनाचे प्रशासन अधिकारी असले

तरी २२(२) मध्ये तरतुद आहे की, महापालिका निश्चित करु शकते की, ते अधिकारी महापालिकेचे घ्यायचे की, शासनाचे घ्यायचे. याबाबत मा. आयुक्तांकडे चर्चा झालेली आहे. हा विषय आपण सभागृहासमोर घेणार आहोत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग तुम्ही दुसरा शिक्षण अधिकारी आणणार की, तुमचा कर्मचारी शिक्षण अधिकारी म्हणून नेमणार आणि ही सगळी प्रक्रिया व्हायला इतके महिने कशाला गेले?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासन अधिकारी श्री. सुर्यवंशी यांना या ठिकाणी रुजू करुन घेतलेले नाही. म्हणून ते सद्या आपल्याकडे कामकाजात नाहीत आणि त्यांचा कार्यभार आपण श्री. परब यांच्याकडे दिलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

रुजू करुन न घेणे हा भाग वेगळा आहे. एखाद्याला कार्यालयात येउ न देणे आणि त्याचे कार्यालय सील करणे हा भाग वेगळा आहे. एखादा अधिकारी हा अधिकारी म्हणूनच तुमच्याकडे आहे. फक्त तुम्ही त्याला बसायला कार्यालय सील केलेले आहे. मग ही बाब कशी काय? रुजू करुन न घेणे याचा अर्थ तुम्ही शासनाला कळवले की, तुम्ही प्रतिनियुक्तीवर पाठवलेला अधिकारी आम्ही रुजू करुन घेतला नाही. पण त्याला अजूनही शासनाने प्रतिनियुक्तीवर ठेवलेले आहे. फक्त तुम्ही त्याचे कार्यालय बंद केले. म्हणजे तो अधिकारी सेवेत आहे. महापालिकेच्या प्रतिनयुक्तीच्या सेवेवर आहे असे या ठिकाणी स्पष्ट होते. तुम्ही कितीही असे सांगितले की, कार्यालय सील केलेले आहे ..........

**रोहिदास पाटील :-**

साहेब, याच्यावर स्पष्ट खुलासा करा की, सहीचे अधिकार जर तुम्ही प्रशासन अधिकारी श्री. गोविंद परब यांना नेमले असेल तर त्यांची सही व्हॅलीड आहे का? मग श्री. सुर्यवंशी यांना बाहेर ठेवा किंवा आतमध्ये ठेवा हा विषय गौण ठरेल. पण जे शिक्षकांचे व कर्मचाऱ्यांचे पगार व्हायला पाहिजे, कामकाज चालायला पाहिजे. प्रशासनाच्या अखत्यारितील ही बाब असल्या कारणाने श्री. परब यांच्या सहीने केलेले कोणतेही कागदपत्र त्याच्यावर पगार निघू शकेल किंवा पगार निघणार नाही, एवढा खुलासा झाला मग तुम्ही ...........

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यात कोणतीही अडचण येणार नाही. श्री. परब यांच्या सहीने सर्व कामकाज सुरळीत होईल.

**रतन पाटील :-**

जरा प्रशासनाने खुलासा करावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेव्हा श्री. परब यांनी प्रभारी प्रशासन अधिकारी तथा अधिक्षक म्हणून सह्या केल्या. तेव्हा काही शाळांची वेतन बिले ही पे युनिटमधून परत पाठवली.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती दक्षता घेउ. ती गैरसोय होणार नाही.

**रतन पाटील :-**

प्रशासनाने मला जरा एक खुलासा करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला फक्त इतके सांगा की, ती वेतन बिले कशा पध्दतीने पास होतील. आता आमच्याकडे एक मुख्याध्यापक गैरहजर आहेत म्हणजे दिर्घकालीन रजेवर आहेत. त्यांच्या जागी प्रभारी मुख्याध्यापक नेमायचा होता. प्रभारी मुख्याध्यापक नेमायला आपल्याकडची प्राथमिक मंजुरी लागते. त्याच्यानंतर शिक्षण खाते मान्यता देते. परंतु, आपल्याकडचे लोक तशा प्रकारची मान्यता द्यायला तयार नाहीत. आता परिक्षांचे दिवस आले. या महिन्यामध्ये परिक्षा सुरु होतात. जर त्यांना मान्यता मिळाली नाही तर परिक्षांची जबाबदारी कोण घेणार?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासन अधिकारी श्री. सुर्यवंशी यांचे कामकाज विचारात घेता सर्व शिक्षा अभियान व इतर शैक्षणिक कामकाजामध्ये जी प्रगती अपेक्षित होती. त्याबाबत प्रधान सचिव यांचे डी.ओ. आपल्याला आलेले आहेत आणि आपल्याकडे आपल्यासुध्दा तक्रारी आहेत. ह्या सर्व बाबींचा विचार करुन त्यांना कार्यमुक्त केलेले आहे. आणि शासन स्तरावर त्याबाबत अंतिम आदेश करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. एक आठवड्यामध्ये हा विषय मिटेल. आणि इतर शाळांना ...........

**प्रफुल्ल पाटील :-**

आमचे मत शिक्षण अधिकारी श्री. सुर्यवंशी यांना ठेवा असे नाही. त्यांच्यावर तुम्ही जे चार्जेस ठेवले ते सर्व नगरसेवकांनी देखील ठेवलेले आहेत. परंतु, त्यांच्या जागी बदली दुसरा शिक्षण अधिकारी येत नाही तोपर्यंत काम सुरळीत कसे काय होणार?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दुसरे अधिकारी येईपर्यंत श्री. परब यांच्या वतीने कामकाज सुरळीत होण्याच्या अनुषंगाने दक्षता घेतली जाईल.

**रतन पाटील :-**

साहेब, मला असे सांगा की, आपले शिक्षण मंडळ झालेले आहे आणि आपल्याला शिक्षण अधिकारी म्हणून पद मंजूर झालेले आहे. ते पद आपण का भरलेले नाही.

**तुळशिदास म्हात्रे :-**

त्या शासनाचे श्री. सुर्यवंशी यांनी पत्र आणून दिलेली आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील तो विषय नाही. आपण बसा.

**रतन पाटील :-**

मॅडम, विषय तोच आहे.

**तूळशिदास म्हात्रे :-**

त्याला परत रुजू करा असे पत्र तुमच्याकडे आलेले की नाही? तुम्ही त्याचा पाठपुरावा केला का? त्या अधिकाऱ्याला तुम्ही भेटले का? आत्तापर्यंत या नगरपालिकेचा इतिहास झालेला आहे. डी.पी.चे रस्तेसुद्धा शासनाचे लोन पास होणार होते. एका रस्त्यावर लक्ष नाही. कारभार असाच चाललेला आहे. अतिशय वाईट कारभार चाललेला आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दि. १३/०२/२००७ ला शासनाकडून आपल्याला असे पत्र आले आहे की, मे २००७ पर्यंत या अधिकाऱ्याची बदली आपण करु नये. हे खरे आहे का?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही वस्तूस्थिती खरी आहे.

**जयंत पाटील :-**

मग दुसरे शिक्षण अधिकारी तुम्ही कसे........

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्तांनी त्यांना रुजू करुन घेतलेले नाही. त्या अनुषंगाने शासनाकडे पाठपुरावा करत आहेत.

**जयंत पाटील :-**

माझ्याकडे आत्ता पत्र आहे. हे बघा.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बरोबर आहे. त्या पत्राच्या आधारे.....

**जयंत पाटील :-**

तुम्ही इकडे करा ना. तुम्ही अजून त्यांना काढलेले नाही. तुम्ही त्यांना काढू शकत नाहीत. शासनाचे आपल्याला तसे आदेश आहेत. श्री. सूर्यवंशी सूर्यप्रकाशाइतके सत्य आहेत असे मी म्हणत नाही. एकदम काळा माणूस आहे. त्याने या शहरातील शाळांचे वाटोळे केलेले आहे. परंतु, शासनाचा असा आदेश आहे की, आचारसंहिता लागल्यामुळे मे, २००७ पर्यंत त्यांना काढण्यात येऊ नये. त्याच्यामुळे तुम्ही कसे काढणार? आणि जर त्याला काढत नाही तर तो आपला पगार घेणार आहे तर त्याला त्याच्या पदावर रुजू करा. त्याच्याकडून काम करुन घ्या.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपले कामकाज त्यांच्याकडून होत नसल्यामुळे त्यांचा पगार शासन स्तरावर दिला जाईल.

**जयंत पाटील :-**

आज प्रत्येक शाळांच्या प्रोग्राममध्ये ते जातात. आणि तिथे ते शिक्षण अधिकारी म्हणून सांगतात. परवाच्या दिवशी मा. उपमहापौर महोदय बरोबर होते. शिक्षण अधिकारी म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. आपण सभागृहामध्ये चर्चा करतो. मॅडम, शासनाचे पत्र आलेले आहे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांनी तिथे जायला नको. शासनाने जरी आदेश केले तरी नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांना अजून रुजू करुन घेतलेले नाही. त्यांनी कामकाजामध्ये तसा सहभाग घ्यायला नको. वास्तविक त्यांनी त्यांच्या डिपार्टमेंटला जाऊन....

**प्रफुल्ल पाटील :-**

नवीन नियुक्ती असेल तर रुजू झाले. पण इथे ते रुजू आहेत.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहामध्ये दोन लक्षवेधी होत्या. त्यापैकी एका लक्षवेधीवर चर्चा करायची होती. दुसरी लक्षवेधी ही पुढील सभेत घेण्याबाबत आपण चर्चा केली होती. परंतु, विषय अतिशय महत्वाचा आहे. श्री. सुर्यवंशी या माणसाचा शहरामध्ये काय इंटरेस्ट आहे हे त्यांनाच माहिती. परंतु, या माणसापासून या शहरातील शाळांना, महापालिकेच्या शाळांना कोणत्याही प्रकारचा उपयोग झाला नाही. आणि भविष्यात होईल. अशीही काही लक्षणे नाहीत. त्यांना कार्यमुक्त केल्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. परंतु, शिक्षण उपसंचालिका श्रीम. काकण मॅडम, ह्यांच्याशी त्यांचे अतिशय जवळचे संबंध आहेत. आणि श्रीम. काकड मॅडमकडून आयुक्तांना

तशा आशयाचा फोन आला की, आपण ह्यांना दोन-तीन महिने सांभाळून घ्या. मग आम्ही त्यांची कुठेतरी नियुक्ती करतो. त्यानंतर श्री. सुर्यवंशी हे अशा आशयाचे पत्र घेऊन आले की, आचारसंहिता सुरू असल्यामुळे त्यांची बदली होऊ शकत नाही. आपल्या शहरामध्ये निवडणूका आहेत का? त्याच्यामुळे आचारसंहिता हे एक कारण शोधले. हे कारण संयुक्तीक नाही आणि हा अधिकारी नको हे या महापालिकेतील सर्व सन्मा. नगरसेवकांचे मत आहे. या शहरातील शाळांना त्यांनी काही दिलेले नाही. येथील मा. आयुक्तांचे मत आहे. आणि या विषयी आपण पत्र पाठवले. त्यांनी आणलेले पत्र आपण स्विकारू किंवा अंमलबजावणी करु हे गरजेचे नाही आणि त्यांनी आणलेला आदेश हा अंतिम नाही. त्यांना जायचेच आहे आणि ते आले त्यावेळेला देखील, त्यांची नियुक्ती झाली तेव्हा सर्व सदस्यांनी गदारोळ केला होता. तेव्हापासून आजपर्यंत त्यांचे तेच काम चालू आहे की, इथे मला कशा प्रकारे बस्तान बसवता येईल. शहरामध्ये काय इंटरेस्ट आहे? त्यांच्यामागे बरीच भ्रष्टाचाराची प्रकरणे झाली होती. त्यानंतरच्या अधिकाऱ्यांच्या काळामध्ये तांदूळ विकला गेला होता. मला वाटते मा. उपायुक्त (मुख्यालय) साहेब, जुनी प्रकरणे जी आहेत त्याचीच आपण चौकशी करावी. आणि त्या चौकशीच्या माध्यमातून त्या अधिकाऱ्यांवर महापालिकेमार्फत फौजदारी गुन्हे दाखल करावेत. म्हणजे इथे येण्याचा त्यांचा इंटरेस्ट संपेल. याबाबत मा. आयुक्त महोदयांशी वारंवार चर्चा सुरू आहे. सन्मा. सदस्य श्री. जयंत (दादा) पाटील, परवा हा आदेश आला त्यानंतर चार दिवस सुट्टीचे गेले. त्याच्यामुळे या विषयी कार्यवाही झाली नाही. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मा. श्री. फडके साहेबांशी संपर्क केला होता. परंतु, ते यवतमाळला होते. त्याच्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही. गुरुवारी या विषयावर मा. शिक्षणमंत्र्यांना भेटण्याचा माझा प्रयत्न आहे आणि या विषयात आपण कुठेतरी निर्णयाप्रत गेले पाहिजे. आज सभेमध्ये बऱ्याच विषयावर चर्चा झाली. वास्तविक, आज सभागृहाचा नूर वेगळा, मा. महापौरांनी सगळ्या विषयांना मान्यता दिली. मा. सभागृहाला आणि मा. महापौरांना विनंती करतो की, पुढील विषयांना सुरूवात करावी.

**मा. महापौर :-**

सचिवांनी विषयाला सुरूवात करा.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते. मला हा विषय पहिलाच मांडायला पाहिजे होता. आपण ह्या महापालिकेतर्फे ज्या डायऱ्या दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये राष्ट्रगीतच चुकीचे लिहिलेले आहे. आणि ही जर बाब विशेष वाटत नसेल...

**मा. महापौर :-**

सचिव पुढील विषयाला सुरूवात करा.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांचा मुद्दा बरोबर आहे. आपण त्याची दुरूस्ती केलेली आहे. आणि येणाऱ्या दोन दिवसांत चांगल्या डायऱ्या आम्ही वाटप करणार आहोत. स्थायी समितीमध्ये याबाबत पूर्ण चर्चा झालेली आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, मघाशी आपण अतिक्रमणचा विषय घेतला होता. तर आपल्या महानगरपालिकेची जी शासकिय इमारत आहे. त्याच्यावर एका पक्षाने अतिक्रमण केलेले आहे. त्याच्यावर आपण काय करणार आहात. शासकिय इमारतीवर राष्ट्रध्वज फडकवला जातो. त्यांच्या स्मरणीकेवर त्यांच्या पक्षाचा झेंडा फडकवलेला आहे. त्याच्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात. माझ्याकडे पुरावा आहे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुमचे पत्र प्रशासनाला मिळालेले आहे. त्याबाबत मा. आयुक्तांना सादर केलेले आहे. मा. आयुक्तांच्या निर्णयाने पुढील कार्यवाही केली जाईल.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ११२ चे वाचन केले.)

**सुरेखा गायकवाड :-**

पान क्र. ०४ वर अनुमोदन सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान साहेबांनी दिलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

नगरसचिव साहेब, पान क्र. ५४ आणि ५५ ची पुरवणी का दिलेली आहे.

**नगरसचिव :-**

प्रिटींग मिस्टेक झालेली होती.

**प्रकाश दुबोले :-**

कोणती प्रिंटींग मिस्टेक झाली. जवळ-जवळ सगळे सारखेच दिसते.

**नगरसचिव :-**

त्याच्यामध्ये सुचक व अनुमोदक यांचे नाव नव्हते.

**प्रकाश दुबोले :-**

पहिल्या ह्याच्यात सुचक व अनुमोदक यांची नावे होती.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ११३ च्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, पान क्र. ४१ वर जो ठराव मांडलेला आहे. जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखडयात सी.डी.पी. समाविष्ट विकास कामाची प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेबाबत प्राधान्यक्रम ठरवणे. त्याच्यामध्ये अ. क्र. २१ मध्ये वाल्मिकी आंबेडकर आवास योजना ही आत्ता बंद झालेली असून त्या ठिकाणी बी.एस.यू.पी. योजने अंतर्गत घरकूल बांधणे. त्याच्यात फक्त अकरा कोटी दहा लाख रूपये आहेत. त्या ठिकाणी मी हा ठराव मांडण्याच्या आधी काही सुचना मांडल्या होत्या. आपण त्याच्यात रुलिंगदेखील दिलेले आहे की, सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा जे काही बोलतात ते यामध्ये समाविष्ट करुन घेण्यात यावे. तर या ठिकाणी रक्कम वाढविण्यात आलेली नाही. ४२८ घरांना आपल्याला पुर्नवसन करायचे आहे. तर ती रक्कम खूप छोटी आहे. आपण पान क्र. ४१ वर रुलिंग दिलेले आहे की, सन्मा. सभागृह व सन्मा. सदस्य यांनी दिलेल्या सुचनांसह हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. पण मी दिलेल्या ज्या सुचना आहेत त्या आपण याच्यामध्ये घेतलेल्याच नाहीत. तसेच, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील, सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंग व सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील ह्यांनी ज्या सुचना मांडल्या ती दुरुस्ती आपण केलेली नाही. फक्त सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस जे काही बोलले तीच दुरुस्ती झालेली आहे. तर कृपया अधिकारी वर्गाला ह्या सगळ्या दुरुस्त्या करुन पुन्हा सभागृहासमोर हा ठराव आणण्यात यावा. कारण हा ठराव जर असाच सी.डी.पी. ला गेला तर केंद्र सरकारकडून आपल्याला बरोबर पैसे येणार नाहीत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा, आपण मांडलेल्या सुचना याच्यात सामावून घेण्यात आलेल्या आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

मी एक चूक दाखवलेली नाही. आपण रुलिंग दिलेले आहे की, रक्कम वाढविण्यात यावी. अकरा कोटी दहा लाख ही कमी पडते. तर बजेटमध्ये आपण असे बोललो होतो की, आपण सी.डी.पी. कडून जो केंद्र शासनाकडून जो पैसा येणार आहे. तो जर आपण आत्ता प्रोजेक्ट केले की, आम्हाला जास्त द्या. तर आपण तो दिल्लीला पाठवणार आहे. मग ती रक्कम आपण रुलिंग दिल्यानंतर देखील वाढवली गेली नाही. पान क्र. २१ वर बी.एस.यू.पी. योजने अंतर्गत घरकूल बांधणे. ती रक्कम खूप छोटी आहे. अकरा कोटी दहा लाखामध्ये आपण प्रॉपर्टी विकत घेऊ शकणार नाही. सर्व्हे नं. २२३ जो आहे तो जरी उद्या कलेक्टरने आपल्याला दिला. आपल्या या छोटया रक्कमेमध्ये आपल्याला जमिन मिळणार नाही तर आपण घर कसे बांधणार? ती अमाऊन्ट वाढविण्यात यावी असा आपण प्रशासनाला स्पष्ट आदेश द्यावे अशी माझी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

घरकूल अंतर्गत जी योजना आहे तसेच हाऊसिंग फॉर डिसहाउसिंग ही जी योजना आहे यावर इथे अकरा कोटी रुपये रक्कम दिलेली आहे. परंतु, ही रक्कम कमी आहे. याच्यामध्ये तरतुद करुन ही रक्कम वाढविण्यात येईल.

**रोहित सुवर्णा :-**

धन्यवाद मॅडम।

**रतन पाटील :-**

मा. नगरसचिव साहेब, पुढील विषयाला सुरूवात करण्यापूर्वी मा. महापौरांना विनंती करतो. शासनाकडून मा. आयुक्तांच्या नावावर आपल्याकडे काही पत्र आलेली आहेत का? शासनाकडून दि. १८/०१/२००७ रोजी मा. आयुक्तांच्या नावावर एक पत्र आलेले आहे. आणि हे पत्र नगरविकास विभागाकडून आलेले आहे. उ. स. दांडेकर, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्याकडून हे पत्र आलेले आहे. ते पत्र सभेमध्ये आणायला पाहिजे होते. ते पत्र सभेमध्ये आलेच नाही.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून जी पत्र आली होती त्याची एक यादी तयार करुन सर्व सदस्यांना वाटप केलेली आहेत.

**रतन पाटील :-**

या पत्राचा काहीच उल्लेख नाही. या पत्राचे महत्व नाही का? नगरविकास खात्याच्या वतीने शासनाने एक पत्र आलेले आहे. शासनाकडून , नगरविकास खात्याकडून पत्र आलेले आहे असे तुम्ही इथे काहीच दिलेले नाही. तसा काही उल्लेख नाही.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तारीख काय आहे?

**रतन पाटील :-**

दि. १०/०१/२००७.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे आल्याची तारीख काय आहे?

**रतन पाटील :-**

आल्याची दि. १९/०१/२००७

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते पुढच्या सभेत देणार आहोत. हा जो गठ्ठा आहे तो अमुक तारखेपर्यंत आपल्याला दिलेला आहे. प्रत्येक सभेला जी पत्र जमा होतात. ती पत्र देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

**रतन पाटील :-**

मला वाटते, प्रशासनला या विषयाचे महत्व नाही.

खतगांवकर सो. :-

एखाद्या पत्राबद्दलची चर्चा हा विषय वेगळा आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील साहेब, विषयाप्रमाणे सभा होऊ द्या. याच्यापुढे आयुक्तांकडील पत्रव्यवहार हा विषय आहे. तेव्हा चर्चा करा.

**प्रकरण क्र. ११४ :-**

दि. १७/१/२००७रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८९ :-**

दि. १७/११/२००६ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(नगरसचिवांनी प्रकरण क्र.११५ चे वाचन केले.)**

**रोहिदास पाटील :-**

या विषयावर प्रशासनाचे म्हणणे आहे की, फक्त परिवहन समितीचा ठराव आहे म्हणून मा. महासभेसमोर ठेवला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, याच्यावर प्रशासनाचा गोषवारा नाही.

**रतन पाटील :-**

कुठलाही गोषवारा नाही. काही दिलेले नाही. तर सदर प्रकरण क्र. ११४ आणि ११५ हे दोन्ही विषय प्रशासनाचा गोषवारा नसल्याकारणाने फेटाळून लावावेत. प्रशासनाचा तसा रितसर गोषवाऱ्यासहित विषय घ्या.

**परशुराम पाटील :-**

आपण पुढच्या मिटींगमध्ये घ्या. फेटाळून लावण्यापेक्षा पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**रतन पाटील :-**

साहेब, गोषवारा येऊ द्या.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, सदर विषयाचे प्रशानाचे गोषवारे नसतील तर सदरचे विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**मा. उपमहापौर :-**

रिझर्व्हेशनला सुरूवात केलेली नाही. काही प्रकरणात सुरूवात केलेली आहे. ही रिझर्व्हेशन आपण ताब्यात घेण्यासाठी आपल्याला ठोस निर्णय द्यावे लागतील. अन्यथा, विषय पुढच्या सभेत आला तर तो टिपण्यांसह यावा. परंतु, त्या विषयाचे गांभिर्य आपल्याला असे सांगते की ह्या जागेचे मालक त्याचे रिझर्व्हेशन बदलण्याचा प्रयत्न करणार आहेत किंवा त्याच्यावर काहीतरी कामधंदे सुरू करणार किंवा ती अस्तित्वात हे प्रकार होतील म्हणून रिझर्व्हेशन जेवढे आपल्याला ताब्यात घेऊन त्याच्यावर विकसित कसे करता येतील याबाबत....

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेच्या हिताच्या नागरिकांच्या हिताच्या आपल्या कामकाजास आम्ही कुठेही विरोध करत नाही.

**रतन पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, आत्तापर्यंत आम्ही हेच बोलतो की, सर्व आरक्षणे ताब्यात घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही याला नाही म्हणत नाही. आम्ही म्हणतो की, तुम्ही त्याची पुर्तता करा. तुमच्या लक्षात असेल आम्ही दर वेळेला आरक्षण क्र. १२२ बद्दल बोलतो. आत्ता आरक्षण क्र. १२२ जागेवर आहे का? जी पुर्तता करायला पाहिजे ती पुर्तता प्रशासनाने न केल्यामुळे ही पाळी येते. तिथे तीन बांधकामे होती. तीनच्या ठिकाणी तिथे तेहतीस की, त्रेचाळीस बांधकामे झाली हे त्यांना माहिती ते आरक्षण राहिलेच नाही. अत्यंत महत्त्वाचे, मोक्याच्या जागेवरचे आरक्षण आत्ता संपत चालले. तिथे लादीवाले आहे, गॅरेजवाले आले, पुन्हा पक्षांची कार्यालये झाली. हे काय आहे? इथे कुठल्याही पक्षाचा बोर्ड लागला तर तुम्ही त्याला प्रोटेक्शन देणार का? काहीतरी ठोस भुमिका घ्या की नाही? आत्ता तर निवडणुका आल्या म्हणून जत्राच भरली आहे. कोणीही कुठेतरी बोर्ड लावत बसणार, या पक्षाचे कार्यालय, त्या पक्षाचे कार्यालय आमचे कोण ऐकते. पिठासिन अधिकारी ऐकत नाहीत. अधिकारी ऐकत नाहीत.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, परिवहन समितीच्या सभापतींनी सही करुन हा जो ठराव पाठवलेला आहे. ठराव क्र. ५२ (अ) आणि ५२ (ब) मी आपल्याला ५२(ब) मध्ये काही चुका आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. मुळतः आरक्षण क्र. ३२६ हा बस डेपो डी.पी.रोड मध्ये नाहीच. हा ट्रक टर्मिनल आहे. या आपल्या डी.सी.आर मध्ये दिलेले आहे. तसेच आपल्या डी.पी. प्लॅनमध्ये देखील दिलेले आहे. असे असताना सभापतींनी हा ठराव कसा काय केला? या परिवहन समितीच्या सदस्यांनी याचा अभ्यासच केला नाही. ३२६ क्रमांकाचा ट्रक टर्मिनल लिहिलेला आहे तसेच ३१६ क्रमांकाचा बस स्टॅण्ड, जरी लिहिलेला असेल. तरी तो ॲप्रीपिएट ॲथोरिटी बी.ई.एस.टी., आपण नाही. आपल्या मालकीची नाही, बी.ई.एस.टी. ची आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यावर तुम्ही रितसर आणा. म्हणजे आम्ही विचारु शकतो. सगळे जमेत धरले जाईल असे नाही. ज्याचे टी.पी.मध्ये पहिल्यांदा तुम्ही प्रोव्हिजन केलेले आहे. या ॲथोरिटी बदलायचा अधिकार आपल्याला नाही. प्रशासनाची याच्यावर टिपणी येऊ द्या. ॲप्रोप्रिएट याच्यासाठी कोण असेल किंवा कोण त्याच्या कोणासाठी केले असेल, हेतू कोणता असेल? हेतू बदलायचा असेल तर त्याला पुर्तता करायला लागेल. आणले आणि दिले असे होते का? आणि आपण चांगल्यासाठी करतो. जे रखडणार नाही त्याच्यासाठी करतो. तुम्ही पुढच्या पंधरा दिवसांनी मिटींग घ्या, कधीही मिटींग घ्या. तातडीची मिटींग घ्या. पण जे कराल ते कॉंक्रीट करा की, ते तुमच्या हातात तरी लागले पाहिजे. ते असेच होईल त्याची क्वेरी निघेल. कुठेही काही नाही. आम्ही तुम्हाला आग्रह करतो सविस्तर टिपणी द्या आणि विषय चर्चेला आणा. नाहीतर ही हवेतील चर्चा होईल आणि ठराव काही फायद्याचा होणार नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, परिवहन समितीचे सदस्य किंवा परिवहन समितीचे सभापती हे जे अशा पध्दतीचे ठराव आणतात की त्यांनी मिटींगला...

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी बसून घ्या.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा जी आपण जो मुद्दा उपस्थित केला होता की, त्यासाठी डेव्हलपमेंट ॲथोरिटी बेस्ट आहे.

**रोहित सुवर्णा :-**

डेव्हलपमेंट ॲथोरिटी नाही ॲप्रोप्रिएट ॲथोरिटी.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणजे जे कोणी विकास करेल ती ॲथोरिटी बेस्ट आहे. ज्यावेळेस हा डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर झाला. त्यावेळेस आपल्याकडे परिवहन सेवा नव्हती अशी मला खात्री वाटते. म्हणून त्यावेळेस परिवहनचे कामकाज राज्य शासनाचे बेस्ट करत होते म्हणून त्याठिकाणी बेस्ट ठेवलेले आहे. पण आज आपल्याकडे परिवहन सेवा कार्यान्वित झालेली आहे. तर आपल्याला ती ॲथोरिटी किंवा जो कोणी विकासक आहे तो बदलण्याचे मा. महासभेचे अधिकार आहेत. ते बदलता येते. आणि राज्य शासनाची परवानगी घेऊन त्याच्यात बदल करता येते.

**रोहित सुवर्णा :-**

मीच तेच बोलतो.

**रोहिदास पाटील :-**

त्याचसाठी आम्ही तुमची टिपणी मागतो.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्यासाठी हे परिवहन समितीचे जे विषय आहेत त्याच्यावर आपण निर्णय घेऊ शकतो.

**रतन पाटील :-**

साहेब, तशा पध्दतीने रितसर गोषवारा आणा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. उपायुक्त (मुख्यालय) साहेब, एखादे रिझर्व्हेशन बदलायचे असेल तर कलम ३७ च्या खाली तुम्ही एम.आर.टी.पी. मध्ये मॉडीफिकेशन ऑफ रिझर्व्हेशन करुन आणा.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तो विषय होईल.

**रोहित सुवर्णा :-**

कधी होईल. आत्ता तुम्ही आमच्यासमोर डायरेक्ट आणलात.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हा विषय त्याच्यासाठीच आहे. डी.पी.मध्ये आवश्यक ते बदल करणे आणि हे धोरण निश्चित करणे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपला गोषवारा नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मग तुम्ही आम्हाला गोषवारा का दिला नाही?

**रतन पाटील :-**

आपला गोषवारा नाही तर कशा पध्दतीने द्यायचे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, कधीतरी अधिकाऱ्यांना किंवा मा. महापौरांना बोलताना आपण जरा लिमिट ठेवा. बोलण्याचा संयम ठेवा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही बोलत असताना इतर नगरसेवक जर उभे राहिले नाही तर ही अडचण येणार नाही. तुम्ही आम्हाला वेळ देणार नाही म्हणून आम्ही घाई  करतो. म्हणून हे खिचकट होते. तुम्ही पहिलेच मला वेळ दिली असती तर मी तुम्हाला रितसर बोललो असतो. मा. महापौर मॅडम, या ठिकाणी पॅरेग्राफ नं.२ मध्ये स्पष्ट लिहिले आहे की, मिरा भाईंदर चालू असलेबाबात जमिनी ताब्यात घेणेबाबतची कार्यवाही असल्याबाबतचे मा. सहाय्यक संचालक यांनी उपरोक्त पत्रान्वये परिवहन उपक्रमास कळविले आहे. आत्ता ते उपरोक्त पत्र कुठे लिहिले त्यांचा नंबर नाही, त्याची तारीख नाही. आणि आम्हाला कसे समजणार? उपरोक्त पत्र याच्या सोबतच नाही. मग आम्हाला कसे समजेल की, तुम्ही बस देणार आहात की, ट्रक टर्मिनल देणार आहात. मा. महापौर मॅडम्, कृपया या दोन्ही ठरावावर महिन्याला एकच मिटींग घेतली पाहिजे असे नाही. कमीत कमी एक मिटींग घेतली पाहिजे. तुम्ही लगेच या सगळया विषयावर दर आठवडयाला मिटींग लावा आमची तयारी आहे. लवकर लवकर चांगले-चांगले विषय घ्या. आणि योग्य निर्णय घ्या.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ११५ आणि ११६ हे दोन्ही विषय आपल्या मा. महासभेपुढे आलेले आहेत. परंतु, याला प्रशासनाचा गोषवारा नसल्यामुळे प्रशासनाचा गोषवारा लवकरच प्राप्त होईल आणि पुढील मा. महासभेमध्ये हे दोन्ही विषय घेण्यात येतील. तोपर्यंत हे विषय पेंन्डींग ठेवण्यात येत आहेत.

**प्रकरण क्र. ११५ :-**

परिवहन उपक्रमासाठी बस गाड्यांची पार्किंग करण्याकरिता महानगरपालिका विकास आराखड्यातील आरक्षणे परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेबाबत मा. महासभेस विनंती करणे. (परिवहन समिती सभा दि. २०/१२/२००६ नुसार शिफारस केलेला ठराव क्र. ५२ अ)

(सदरचा विषय गोषवारा नसल्यामुळे मा. महापौर यांच्या आदेशानुसार पुढील सभेत घेण्याचे ठरले.)

**प्रकरण क्र. ११६ :-**

परिवहन उपक्रमासाठी डेपो, (आगार) बस स्थानक बांधणेकरीता महानगरपालिका विकास आराखड्यातील आरक्षणे परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेबाबत मा. महासभेस विनंती करणे. (परिवहन समिती सभा दि. २०/१२/२००६ नुसार शिफारस केलेला ठराव क्र. ५२ ब)

(सदरचा विषय गोषवारा नसल्यामुळे मा. महापौर यांच्या आदेशानुसार पुढील सभेत घेण्याचे ठरले.)

**नगरसचिव :-**

मा. आयुक्तांकडील पत्र मी सर्व सदस्यांना वितरीत केले आहेत.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाला सुरूवात करावी.

**रतन पाटील :-**

आयुक्तांकडील जी पत्र आहेत ती सभेला का आलेली नाहीत. तो विषय महत्वाचा नाही का? पत्राचे गांभिर्य आहे. महाराष्ट्र शासनाने मा. आयुक्तांच्या नावाने पाठवलेले आहे. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन ठराव क्र. ३४ दि. १२/१०/२००६ च्या इतिवृत्तांतात बदल केल्याबद्दल श्रीम. निर्मला सावळे, महापौर मिरा-भाईंदर महानगरपालिका यांची तक्रार संदर्भ आपले प. क्र. जावक आयुक्त दि. १४/१ह००६ चे पत्र. उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे मा. आयुक्तांच्या नावाने दिलेले आहे. १) उपरोक्त ठरावात नमुद केलेल्या पदांपैकी यापूर्वी नमूद केलेल्या पदा व्यतिरिक्त...

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन्मा. सदस्य हा विषय आम्ही मा. आयुक्तांकडे सादर केलेला आहे आणि येणाऱ्या समजायला पाहिजे की, कोणता विषय आहे. मला माहिती आहे ते मी तुम्हाला सांगतो. तुम्ही पत्राची तारीख वाचल्यानंतर आमच्या लक्षात आलेले आहे. तो विषय मा. आयुक्तांकडे सादर केलेला मा. आयुक्त येणाऱ्या सभेत ते सादर करतील. त्याची फाईल ऑलरेडी तयार झालेली आहे.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाना सुरुवात करावी.

**रिटा शाह :-**

नगरसचिव, आयुक्तांकडील पत्रामध्ये १८/०१ पर्यंतचे सर्व दिलेले आहे. शेवटचे तम्ही १८ जानेवारी दिलेले आहे. मग त्याच्या मधले एकसुध्दा परिपत्रक नाही का? आपण एक २४ ऑगस्ट दिले आहे आणि एक १८/०१ दिलेले आहे. मग त्याच्या मधले परिपत्रक कुठे आहे?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मॅडम, जसे आले आहेत तसे आपण दिलेले आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण ०३/१० चे परिपत्रक याच्यामध्ये इन्क्लुड केलेले नाही. किती परिपत्रक असे आहेत जे आपण आम्हाला दिलेले नाहीत. मधले मधले आपण गहाळ केलेले आहेत आणि शेवटचे १८/०१ दिलेले आहे. ०३/१० च्या परिपत्रकामध्ये सुप्रिम कोर्टाचे डायरेक्शन आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या महापालिकेचे कामकाज आता पारदर्शक सुरु झाले आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, पारदर्शक नाही. ०३/१० चे सुप्रिम कोर्टाचे डायरेक्शन आहेत.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

एखादे राहिले असेल तर आपण ते निश्चित देवू. असा कुठलाही पत्रव्यवहार आपण ............

**रिटा शाह :-**

राहिले असेल. मॅडम कसे असते. प्रशासन आमचे चुकले म्हणून माफ करा. हे मुद्दाम दिलेले नाही. सुप्रिम कोर्टाची ऑर्डर आहे आणि मधले परिपत्रक आमच्यापर्यंत दिलेले नाही. ते का दिले नाही हे मुख्यालयानींच सांगायला पाहिजे. फक्त चुकून राहिले असे डायसवर उभे राहून उत्तर देणे योग्य नाही. प्रत्येक वेळी आम्ही हेच ऐकायचे का? आम्ही नगरसेवक म्हणजे वेडेवाकडे आहोत का?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

शासनाचा पत्रव्यवहार हा ओपन असतो.

**रिटा शाह :-**

आपण हे आयुक्तांकडील परिपत्रक सुरु केलेले आहे. त्याच्यामध्ये ते बोलले की, आपण एका तारखेपर्यंत दिलेले आहे. ठिक आहे. आम्ही मान्य केले की, अमुक तारखेपर्यंत त्यांनी दिलेले आहे. त्यांनी १८/०१ पर्यंत दिलेले आहे. त्याच्या मधले ०३/१० चे पत्रक ती सुप्रिम कोर्टाचे ऑर्डर आहे. ते त्यांनी दिलेले नाही आणि बोलतात चुकून राहिले आहे. ही खुप मोठी कॉम्प्लीकेशनची गोष्ट आहे. म्हणून त्यांनी चुकून दिलेले आहे. कारण हायकोर्टाचा एक निर्णय २४ ऑगस्टला लागलेला होता. त्याच्यावर लागलेला स्टे उठवला होता आणि परत ०३/१० ला लागला. त्यावेळी त्याच्यावर प्रमोशनच्या बाबतीत स्टे आणलेला. त्याच्यामधील एक महिन्याच्या पिरियडमध्ये हायकोर्टाने दिलेल्या निर्णयावर या लोकांनी काहीच कामे केलेली नाहीत आणि म्हणून ही लपवालपवी चाललेली आहे. कोणत्याही कोर्टाने ऑर्डर केली तर किती दिवसात ॲप्लीकेबल व्हायला पाहिजे आणि त्याचे इम्प्लीमेन्टेशन करायला पाहिजे. कोर्टाने ऑर्डर केला त्याचा काही मानसन्मान नाही का?

**रतन पाटील :-**

मा. खतगावकर साहेब सांगतात की, पुढच्या मिटींगला घेउ. पुढची मिटींग बजेटची असणार. तुम्ही खास सभा लावणार आहात का? हे विषय त्या खास सभेमध्ये घेणार आहात की, बजेटच्या मिटींगमध्ये घेणार आहात?

**मा. महापौर :-**

तुम्ही येणार आहात ना.

**रतन पाटील :-**

आम्ही आहोत. आम्ही असणारच.

**रिटा शाह :-**

मॅडम माझा महत्वाचा प्रश्न आहे. कोणत्यही कोर्टाने दिलेला निर्णय आपल्याला किती दिवसात ॲप्लीकेबल असतो किंवा त्यांनी कार्यन्वीत करायला पाहिजे. या दोन ऑर्डरमध्ये हायकोर्टाने ऑर्डर केली होती. हायकोर्टाच्या ऑर्डर नंतर एक महिन्यानंतर सुप्रिम कोर्टाची ऑर्डर आलेली आहे. त्याच्या मधील एक महिन्यापर्यंत कोर्टाने केलेल्या ऑर्डर या मुख्यालय, या कार्यालय, या प्रशासनाने पाळलेली नाही. त्या लोकांनी कंटेम्प्ट ऑफ कोर्ट केलेले आहे. त्यांनी एक महिन्यापर्यंत त्या ऑर्डरवर काम का केलेले नाही? त्या पध्दतीने काम केले नाही. त्याचा खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

हायकोर्टाची कधीची ऑर्डर आहे, जरा दाखवा.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणत्या मॅटरशी इश्यु आहे. ते आम्हाला स्पष्ट सांगा.

**रिटा शाह :-**

आपल्याकडून चार लोक कोर्टात गेले. कोर्टात गेल्यानंतर कोर्टाचा निर्णय त्यांच्या बाजूने लागला आणि त्यांच्या बाजूने निर्णय लागताना आपले सहाय्यक आयुक्त श्री. संजय गोखले उपस्थित होते. त्यांच्या संगनमताने चार लोकांचा निर्णय लागला. निर्णय लागून एक महिना झाल्यानंतर एक व्यक्ती कोर्टात गेला आणि कोर्टातून स्टे आणला की, कुठलेही प्रमोशन होवू नये. त्यानंतर महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट त्याच्या विरुध्द कोर्टात गेली आणि २४ ऑगस्टला निर्णय आला की, पदोन्नती द्यायची. परंतु, त्यांना कुठलेही अधिकार द्यायचे नाहीत. त्यानंतर एक महिन्याने सुप्रिम कोर्टाने त्याच्यावर स्टे आणला. परंतु, जो निर्णय एक महिन्यापूर्वी लागला आणि सुप्रिम कोर्टाच्या निर्णयामध्ये एक महिना होता. मग त्या ऑर्डरचे त्यांनी काय केले? एखाद्या वेळेस त्यांना ऑर्डर मान्य नव्हती तर त्यांनी कोर्टात ॲप्लीकेशन पुट-अप केली का? की, तुम्ही जो निर्णय दिलेला आहे त्याच्या विरोधात आम्ही ॲप्लीकेशन करतो. त्या ऑर्डरला तुम्ही चॅलेंज केले का? तुम्ही त्याच्यावर काय निर्णय घेतला आणि काय कार्यवाही केली? आपण मला त्याचे उत्तर द्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, जरा दोन मिनिटे ठराव द्या. मी त्याच विषयावर बोलतो. मा. महापौर मॅडम, पदोन्नतीच्या संबंधी हायकोर्ट सुप्रिम कोर्ट किंवा इंडस्ट्रीयल कोर्टामध्ये वेळोवेळी आपल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जे काही निर्णय लागले ते सगळे लागलेले निर्णय एका बाजूला ठेवा. आता सन्मा. सदस्या रिटा शाह जे काही बोलल्या त्यासंबंधी शासनाने जे काही परिपत्रक ३ ऑक्टोंबरला काढलेले आहेत. ३ ऑक्टोंबरचे परिपत्रक आपल्या महानगरपालिकेमध्ये येते. त्याच्या नंतरचे ४ ऑक्टोंबरचे परिपत्रक तुम्ही याच्यामध्ये लावता. मग त्याच्यामध्ये महानगरपालिका प्रशासन ३ ऑक्टोबरचे परिपत्रक लावत नाही. कुठेतरी लपवून ठेवता जसे काही बोगस सहीच्या बाबतीत मा. आयुक्तांचे पत्र. सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील तुमच्या निदर्शनास आणतो. ही पत्र महत्वाची नाहीत का? मॅटर कोर्टात जातात असे काही मॅटर आमच्या नगरसेवकांना माहिती पडले. ४ ऑक्टोंबरचे परिपत्रक अतिशय महत्वाचे आहे असे म्हणत नाही. पण आपणच आपल्या चेंबरमध्ये त्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, पदोन्नतीच्या बाबतीत, सेवाजेष्ठतेच्या नियमांच्या बाबतीत ण्क मिटींग बोलावलेली होती. त्याच्यावर स्टडी करुन एक मिटींग करणार होते. परत काहीच झाले नाही. त्याच्यानंतर तुमचीच पळापळ झाली.

**रिटा शाह :-**

पण मॅडम, मी जो प्रश्न विचारला त्याचे काय?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा साहेब, ती मिटींग झाली. त्याच्यामध्ये सदस्य होते आणि आम्ही त्या मिटींगमध्ये चर्चा घडवून आणली.

**रोहित सुवर्णा :-**

पण त्या मिटींगमध्ये मी एक सदस्य होतो. पण मला कोणीही बोलावले नाही.

**मा. महापौर :-**

पुढच्या मिटींगला आपल्यालाही बोलावले जाईल.

**रिटा शाह :-**

मॅडम, पण मी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी मा. उपायुक्त (मु.) यांना सांगा. त्यांनी त्या एक महिन्यासाठी त्याच्यावर काय कार्यवाही केली. ठिक आहे. त्यांना ती ऑर्डर मान्य नाही तर त्यांनी त्या ऑर्डरला चॅलेंज केले का?

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपायुक्त (मु.) श्री. बालाजी खतगावकर साहेब मी या विषयावरच बोलतो. मॅडम, गेल्या महिन्यामध्ये मी दिल्लीला सुप्रिम कोर्टामध्ये गेलो होतो.

**शशिकांत भोईर :-**

एकच मिटींग झालेली आणि त्यांना सांगितले की, सविस्तर पत्र द्या. नंतर तुमचा विचार केला जाईल. त्यानंतर आज २० तारीख, आजपर्यंत विचार केला गेला नाही.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांच्या दालनामध्ये सर्व पत्रकांचा विचार करुन हेअरिंग लावली जाणार आणि नंतर पुढील मिटींगबाबत ठरविले जाईल.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण विषय आणणार होते. आपण त्यांचा विषय आणा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या प्रकरणी पदोन्नतीच्या बाबतीमध्ये आता जो उल्लेख केला गेला. श्री. रंगराव पवार हा इसम हायकोर्टात हरल्यानंतर सुप्रिम कोर्टात गेला. त्याच्यावर सुप्रिम कोर्टाने रितसर एक निर्णय दिला. त्या निकालावर दुसरे स्पेशल रिट पिटीशन फाईल झाले. हा जो मधला कालावधी आहे. याच्यामध्ये दोन-तीन महिने गेलेले आहेत आणि आता त्या स्पेशल रिट पिटीशनवर पण निराळे पिटीशन फाईल होत आहे. त्या केसमधील बहुतेक सगळी कागदपत्रे मी काढून आणलेली आहेत. त्यामुळे एखादा निकाल लागला की त्याला अपिल फाईल करायचा एक ठराविक कालावधी असतो. तो कालावधी ओव्हर झाल्याशिवाय त्याच्यावर ॲक्ट करता येत नाही. त्याच्यावर सुप्रिम कोर्टात एस.एल.पी. फाईल झाली आहे. त्या एस.एल.पी. चा पण निकाला लागला आणि त्याच्यावर आता तीन सदस्यीय खंडपिठाकडे हे प्रकरण चाललेले आहे.
ह्याची पोझीशन काय आहे? आपले विधी अधिकारी आहेत. ते जर असते तर बरे झाले असते. माझ्याकडे काही कागद आणलेले आहेत. त्याचा जर प्रशासनाला उपयोग करता आला तर मी ती मदत करायला तयार आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझा प्रश्न तो नाही. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे जे बोलतात. सुप्रिम कोर्टाने जो निर्णय दिला तो मला मान्य आहे. मी कोर्टाच्या विरोधात बोलत नाही. मी बोलते की, हायकोर्टाचा निर्णय चोवीस ऑगस्टला लागला. आणि ज्या चार इंजिनियरची ऑर्डर लागलेली. त्या सुप्रिम कोर्टाच्या ऑर्डरमध्ये एक महिन्याचा गॅप होता. मी मान्य करते की, ती ऑर्डर मुख्यालयाला किंवा प्रशासनाला मान्य नव्हती. मग त्यांनी त्या ऑर्डरला चॅलेज मुख्यालयाला किंवा प्रशासनाला मान्य नव्हती. मग त्यांनी त्या ऑर्डरला चॅलेंज केलें का? जर चॅलेंज केले नाही तर त्यांनी त्याच्यावर काय कार्यवाही केली? सूप्रिम कोर्टाची ऑर्डर पण मला मान्य आहे आणि हायकोर्टाची ऑर्डरपण मान्य आहे. त्या पदोन्नत्यांबद्दल मी बोलत नाही. मी फक्त असे बोलते की, एखाद्या कोर्टाने काही निर्णय लावला. त्याला एक महिना गेल्यानंतर सुप्रिम कोर्टाने ऑर्डर दिल्या. परंतु, त्या एक महिन्याच्या काळात प्रशासनाने मुख्यालयाने त्याच्यावर काय निर्णय घेतला. ठिक आहे, ती ऑर्डर बोगस असेल, खोटी असेल किंवा काहीतरी तिकडम वाचून त्यांनी आणली असेल. मग प्रशासनाने त्याच्यावर काही कार्यवाही केली का? चॅलेंज केले का? मग कशाला त्या निर्णयाला असेच बाजूला ठेवलेले आहे? याचा अर्थ आपल्या प्रशासनाला कोर्टाच्या निर्णयाची काही कदर नाही. सुप्रिम कोर्टाने निर्णय दिला तो मला मान्य आहे. जो चोवीस ऑगस्टला झाला तो निर्णय मला मान्य आहे. परंतु, चार इंजिनियर कोर्टामध्ये जाऊन, आपले सहाय्यक आयुक्त श्री. गोखले साहेबांची त्याच्यावर सही आहे आणि निर्णय लागला. एक महिन्यानंतर सुप्रिम कोर्टाची ऑर्डर आलेली आहे.

**मा. महापौर :-**

मागच्या मा. महासभेमध्ये तो विषय झाला.

**रिटा शाह :-**

झाला पण मला याचे उत्तर तेव्हाही मिळाले नव्हते आणि आजही मिळणार नाही. कारण त्यांनी हा निर्णय....

**मा. महापौर :-**

प्रमोशन करणार आहोत.

**रिटा शाह :-**

प्रमोशन करणार ही गोष्ट वेगळी. आज नाही तर उद्या पाच वर्षानंतर प्रमोशन होणारच आहेत. परंतु, माझा प्रश्न असा आहे की, महिनाभर कोर्टाच्या निर्णयाचा आदर का केला नाही?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्थगिती आहे.

**रिटा शाह :-**

मॅडम, स्थगिती एक महिन्यानंतर आली आहे. एक महिनाभर त्याच्यावर कार्यवाही का केली नाही? ठिक आहे, ऑर्डर बोगस आहे हे मी मान्य करते. चार लोकांनी मिळून संगनमताने काहीतरी तिकडम रचवले आणि कोर्टाला फसवले. मग प्रशासनाने तिकडे जाऊन काही चॅलेंज केले का? म्हणजे प्रशासन आपल्या इकडे जेवढे नगरसेवक बसले आहेत त्यांना कोर्टाची भिती दाखवून फसवा-फसवी करत आहे. मॅडम ह्या लोकांनी कंटेम्ट ऑफ कोर्ट केलेले आहे. कोर्टाच्या निर्णयाला त्यांना कोणाची काहीच भिती नाही का? त्यांना असे वाटते की, शासन आमच्या हातात आहे. आम्ही काही केले ते आम्हाला खरे आणि आम्हाला नगरसेवकांना मुख्यालयाकडे नेले तर नगरसेवकांना प्रमोशन बद्दल काही अधिकार नाहीत असे उत्तर आम्हाला देतात. परंतु, त्यांना मी सेक्शन दाखवते. ४४(अ) खाली विचारायचे अधिकार नगरसेवकांना आहेत की प्रमोशन का केले नाहीत? का झाले नाही? सेक्शनने ४४(अ) खाली सर्व अधिकार आम्हाला दिलेले आहेत. आज मी जाहीर करते की, श्री. दिपक खांबीत आणि मा. उपायुक्त (मुख्यालय) या दोघांच्या वादामुळे ... कारण ती दोन-तीन मुले आहेत ती श्री. दिपक खांबीत यांच्या ओळखीमधली आहेत. म्हणून या एक महिन्यापर्यंत कोर्टाच्या निर्णयाला पण त्यांनी ठिक आहे. तुम्हाला मान्य नाही तर तुम्ही कोर्टात जाऊन चॅलेंज करा की, आम्हाला मान्य नाही. कुठल्या कारणासाठी मान्य नाही ते तुम्ही चॅलेंज करा. परंतु, एक महिन्यापर्यंत ती ऑर्डर त्यांनी रखडवली आहे. आणि आज आपल्याला सुप्रिम कोर्टाचे निर्णय दाखवतात. म्हणजे हे लोक एवढी दिशाभूल करतात. मग श्री. बालाजी खतगांवकर, मा. उपायुक्त (मुख्यालय) यांच्यावर आपण कार्यवाही का करु नये? श्री. बालाजी खतगांवकर साहेबांनी कुठलीही कार्यवाही केली नाही तर मा. आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात शोकॉज नोटीस पाठवली का?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन्मा. सदस्या आपण सभागृहामध्ये बेजबाबदारपणाने वक्तव्य करु नये.

**रिटा शाह :-**

मी बेजबाबदरपणाने वक्तव्य करत नाही. मला फक्त उत्तर द्या की एक महिन्यापर्यंत तुम्ही कार्यवाही का केली नाही?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुम्ही बोलता तसे आम्हालाही बोलता येते.

**रिटा शाह :-**

साहेब, तुम्ही मला धमकी देऊ नका.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

धमकीची भाषा नाही. आपण जे बोलता ते अप्रशासकीय आणि काहीतरीच बोलता.

**मा. महापौर :-**

आपल्याला काय अपेक्षित आहे तेवढेच आपण बोला.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आपण नियमाप्रमाणे चर्चा करा. शोकॉज नोटीस द्या आणि असे शब्द आपण वापरु शकत नाही.

**रिटा शाह :-**

मी नियमातच बोलते. मी फक्त विचारते की, यांनी कामे केली नाहीत तर मा. आयुक्तांनी यांच्यावर कार्यवाही केली? हे विचारायचा माझा अधिकार आहे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन्मा. सदस्या आपण जो मुद्दा या ठिकाणी मांडला. मागच्या मा. महासभेमध्ये यावर सविस्तर चर्चा झालेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, माझा एकच प्रश्न होता. तेव्हाही हाच प्रश्न होता. तुम्ही काय बोलले...

**मा. महापौर :-**

मॅडम, त्यांना बोलू द्या. तुम्ही बसून घ्या. गेल्या महिन्यामध्ये या विषयावर तीन तास पूर्ण चर्चा झालेली आहे.

**रिटा शाह :-**

पूर्ण चर्चा झाली. त्याच्यामध्ये विषय घेतला.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

एखाद्याचे प्रमोशन देण्यासाठी श्री. खतगांवकर किंवा श्री. खांबित हे जबाबदार नसतात. त्यासाठी रितसर निवड समिती असते. त्याचे अध्यक्ष मा. आयुक्त आहेत आणि निवड समितीचे कामकाज काही कालावधीने केले जाते. दरम्यानच्या काळामध्ये निवड समितीची बैठक लागली नव्हती. म्हणून त्यावेळेस त्यावर निर्णय घेता आला नाही. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे त्या काळात निवड समितीची बैठक झालेली नव्हती. पण ज्यावेळेस निवड समितीची बैठक झाली. त्यावेळेस विचार करण्याचा मुद्दा आला. तत्कालीन

वेळेच्या नंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने आत्ता पदोन्नतीला पूर्णपणे स्थगिती दिलेली आहे आणि ही चर्चा मागच्या मा. महासभेमध्ये झालेली आहे. त्यावर पुनःश्च चर्चा करणे मला संयुक्तिक वाटत नाही.

**रिटा शाह :-**

मला मान्य आहे. सुप्रिम कोर्टाचे आदेश आहेत हे मी मान्य करते. परंतु, जो एक महिन्याचा पिरिएड होता. कोर्टाचा निर्णय लागल्यानंतर निवड समितीची गरज नसते.

**मा. महापौर :-**

मॅडम, आपण आत्ता बसून घ्या. पुढेपण विषय आहेत आणि आपले याच्यावरही समाधान होत नाही. आपण आपल्या महापौर दालनामध्ये मा. आयुक्त आणि आपल्याकडे आलेले जे सर्व पत्रव्यवहार आहेत. एकत्र बसून आपण याच्यावर चर्चा करु आणि योग्य तो निर्णय घेऊ या. सचिवांनी पुढील सभेला सुरूवात करावी.

(नगरसचिवांना पुरक घोषणा क्र. ११७ चे वाचन केले.)

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर ''ज'' खाली जे प्रस्ताव येतात ते सदस्यांच्या सुचना म्हणून घेतले जातात की, ठराव करुन त्याची अंमलबजावणी केली जाते.

**नगरसचिव :-**

ठराव केला जातो.

**प्रकाश दुबोले :-**

या ठरावावर कायदेशिर अंमलबजावणी करता येते का?

**नगरसचिव :-**

अंमलबजावणी प्रशासनाने करायची असते.

**प्रकाश दुबोले :-**

अंमलबजावणी केली तर ती कायदेशीर आहे का?

**नगरसचिव :-**

पुरक अजेंडा झाला की, मग त्याचा ठराव होऊ शकतो.

**प्रकाश दुबोले :-**

जो काही ठराव होईल त्याला.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण हे गैरहजर आहेत.

**प्रकरण क्र. ११७ :-**

सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहान यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रिक्त असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुशेष भरणेबाबत.

(सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहान हे सभेस उपस्थित नसल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

(नगरसचिवांनी पुरक घोषणा क्र. ११८ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. देविदास पाटील आणि श्री. संतोष भाऊराव पाटील यांची शिपाई पदावर २०/१०/२००६ पासून कायम स्वरुपी नेमणूक करण्याबाबत जावक क्रमांक मनपा/आस्था/१३१२/२००६-०७, दि. २०/१०/२००६ च्या आदेशानुसार कळविण्यांत आले आहे. परंतु सदर कर्मचारी हे तत्कालीन नगरपरिषद असल्यापासून काम करीत आहेत. दि. १ जून १९९२ पासून शिपाई पदावर ते काम करित असुन सेवापुस्तकात सुध्दा तशी नोंद घेण्यात आलेली आहे. मा. स्थायी समिती सभा दि. ०६/०६/९७ ठराव क्र. २० व मा. स्थायी समिती सभा दि. १७/०४/९७, ठराव क्र. १९(अ) अन्वये आवश्यक त्या मंजूरीसुध्दा घेण्यात आलेल्या आहेत. सदर कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेकडे ०१ जून १९९२ पासून कायम करण्याबाबत मागणी केलेली आहे. परंतु प्रशासनाने २०/१०/२००६ पासून कायम करण्याचे आदेश काढल्याने दोन्ही कर्मचाऱ्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे तरी श्री. देविदास पाटील आणि श्री. संतोष पाटील यांना शिपाई पदावर ०१ जून १९९२ पासून कायम करुन नेमणुकीचे आदेश सेवाजेष्ठता देण्यास व सेवाजेष्ठतेची नोंद सेवा पुस्तिकेस करण्यास, नियमानुसार असलेले सर्व फायदे देण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**संगिता म्हात्रे :-**

अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ११८ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात प्रकाश पाटील यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महापालिकेच्या अस्थापनेवरील श्री. देविदास पाटील व श्री. संतोष पाटील, पद - शिपाई यांना दि. ०१/०६/१९९२ पासून कायम करून सेवाजेष्ठता व नियमानुसार असणारे सर्व फायदे देणेबाबत.

**ठराव क्र. ९० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. देविदास पाटील आणि श्री. संतोष भाऊराव पाटील यांची शिपाई पदावर २०/१०/२००६ पासून कायम स्वरुपी नेमणूक करण्याबाबत जावक क्रमांक मनपा/आस्था/१३१२/२००६-०७, दि. २०/१०/२००६ च्या आदेशानुसार कळविण्यांत आले आहे. परंतु सदर कर्मचारी हे तत्कालीन नगरपरिषद असल्यापासून काम करीत आहेत. दि. १ जून १९९२ पासून शिपाई पदावर ते काम करित असुन सेवापुस्तकात सुध्दा तशी नोंद घेण्यात आलेली आहे. मा. स्थायी समिती सभा दि. ०६/०६/९७ ठराव क्र. २० व मा. स्थायी समिती सभा दि. १७/०४/९७, ठराव क्र. १९(अ) अन्वये आवश्यक त्या मंजूरीसुध्दा घेण्यात आलेल्या आहेत. सदर कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेकडे ०१ जून १९९२ पासून कायम करण्याबाबत मागणी केलेली आहे. परंतु प्रशासनाने २०/१०/२००६ पासून कायम करण्याचे आदेश काढल्याने दोन्ही कर्मचाऱ्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे तरी श्री. देविदास पाटील आणि श्री. संतोष पाटील यांना शिपाई पदावर ०१ जून १९९२ पासून कायम करुन नेमणुकीचे आदेश सेवाजेष्ठता देण्यास व सेवाजेष्ठतेची नोंद सेवा पुस्तिकेस करण्यास, नियमानुसार असलेले सर्व फायदे देण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. संगिता म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रे :-**

या पत्रामध्ये ०३/०३/२००७ आणि ०८/०२/२००७ ची दोन पत्र सन्मा. जिल्हाधिकारी, ठाणे उपसचिव यांच्याकडचे आपल्याला आयुक्तांकडे पत्र आलेले आहे. आणि एक मुख्य कार्यकारी, जिल्हापरिषद ठाणे यांचे पत्र आलेले आहे. सार्वजनिक इस्पितळाकरीता उत्तनची जागा मोफत मिळणेबाबत पत्रे आहे.आणि एक व्हॅल्युएशन काढुन दिलेले आहे. त्याचे एक पत्रे आहे. ही दोन पत्र माझ्याकडे आहेत. याचा उल्लेख या पत्राच्या लिस्टमध्ये कुठेही नाही. मागच्या सभेमध्ये सन्मा. महापौरांनी स्पेशल या केसमध्ये यापुढे आलेली पत्र आम्ही विषयपत्रिकेवर ठेवु असे रुलिंग दिलेले आहे. तरी सुध्दा या पत्रामध्ये दोन पत्रांचा उल्लेख नाही. आणि आपली मिटींग वीस तारखेला आहे.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडुन मला जो पत्रांचा गठ्ठा आला होता. त्याप्रमाणे मी वाटप केलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे कार्यालय हे सुध्दा एक प्रशासन आहे आणि श्री. बालाजी खतगांवकर साहेब हे सुध्दा एक प्रशासन आहे.

**नगरसचिव :-**

मा. आयुक्तांमार्फत माझ्याकडे पत्र आलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा की, तुम्ही डाव्या कानाचे डॉक्टर आणि ते उजव्या कानाचे डॉक्टर असे आहे का?

**नगरसचिव :-**

सर्व पत्र मा. आयुक्तांकडे जातात. मा. आयुक्तांकडुन माझ्याकडे बंच आला.

**मिलन म्हात्रे :-**

माझी मा. आयुक्तांची तक्रार आहे, आता बोला माझा एवढा आग्रह आहे की, तुमच्या लिस्टमध्ये ही पत्र आली पाहिजेत. आणि मा. महापौरांचे रुलिंग आहे म्हणजे विषय संपला कार्यवाही कोणाची ते तुम्ही ठरवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शाह, सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील, सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे ह्यांनी सुचना मांडली की, आतापर्यंत जे परिपत्रक शासनाकडुन आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे आलेले आहेत. ती संपुर्ण पत्र मा. महासभे मध्ये ठेवली गेली नाहीत तर जी पत्र शिल्लक आहेत ती पुढिल मा. महासभेत ठेवण्यात येतील.

( नगरसचिवांनी पुरक घोषणा क्रमांक ११९ चे वाचन केले. )

( सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी पुरक घोषणा क्र. ११९ च्या ठरावाचे वाचन केले. )

**प्रकरण क्र. ११९ :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ गजानन पाटील यांचे दिनांक १३/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर वाहन चालक पदावर नेमणूक करणेबाबत.

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर १) श्री. प्रकाश पांडूरंग पाटील २) श्री. विलास हरीभाउ साळवी हे दि. २३/५/१९९४ तसेच ३) श्री. सुनिल शांताराम लोनुप्टे ४) श्री. सदानंद गोविंद चुरी हे दि. ०४/११/१९९५ पासून तात्कालीन नगरपालिका असताना ठेका पध्दतीने वाहन चालक पदावर काम करित आहेत. त्यांची नेमणूकी ही मा. स्थायी समिती सभा दि. ०५/९/१९९७ ठराव क्र. ४१ (ई) व तद्नंतर मा. सर्वसाधारण सभा दि. ०३/११/१९९९ ठराव क्र. २७७ (१५०) अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

वरील चारही कर्मचारी आजपर्यंत वाहन चालक या पदावर काम करित असून आज त्यांचे वय ही वाढलेले आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक या संवर्गातील काही पदे मंजुर आहेत. तसेच वाहन चालक पदावरील काही कर्मचारी हे शारीरीक दृष्ट्या सक्षम नसल्याने वाहन चालकाचे काम न करता लिपिक व समान वेतन श्रेणीवर इतर कामे करीत आहेत. त्यांच्याऐवजी वाहन चालक म्हणून वरील चार कर्मचारी काम करीत आहेत. सदर चार कर्मचाऱ्यांचे वय ही वाढलेले आहे. तरी सदर चार वाहन चालकांना वाहन चालक या पदनामाची पदे मंजुर करुन कायमस्वरुपी नेमणूक करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.      अनुमोदन :- श्रीम. संगिता म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**संगिता म्हात्रे :-**

अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

**ठराव सर्वांनुमते मंजुर.**

(नगरसचिवांनी पुरक घोषणा क्र. १२० चे वाचन केले. )

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो हे गैरहजर असल्यामुळे सन्मा.सदस्य श्री. मोहन पाटील यांनी सदर प्रस्ताव घेण्याबाबत पत्र दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांनी गैरहजरीचे पत्र दिले आहे का? आज गैरहजरीची पत्र किती आहेत ?

**नगरसचिव :-**

त्यांनी पत्र दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जर पत्र दिले असेल तर तुम्ही हा ठराव घेउ शकता. अन्यथा आमचे जसे वाईप आउट करता तसा तोही वाईप आउट करायला लागेल.

**नगरसचिव :-**

या प्रस्तावावर बोलण्यासाठी त्यांनी सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील यांनी पत्र दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय म्हणतो की, गैरहजर असल्याचे पत्र आहे का?

**नगरसचिव :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग हा आणता येणार नाही. आमचा आणलात ? मग माझा पण घ्या. नसेल तर तो कॅन्सल करा आणि माझाही घ्या. कायदा सगळ्यांना सारखा.

**प्रकरण क्र. १२० :-**

सन्मा. सदस्य श्री. लिओ इजिदोर कोलासो यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

(सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो हे सभेस उपस्थित नसल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

(नगरचिवांनी पुरक घोषणा क्र. १२१ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत आर. शाह यांनी प्रकरण क्र. १२१ च्या ठरावाचे वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याच्यामध्ये थोडीशी दुरुस्ती करा. हे सगळे मिरा भाईंदरच्या ज्या एन.ओ.सी आपण देणार. त्या एका ठिकाणाहुन न देता प्रत्येक विभागातुन, जे जे विभाग आहेत त्या त्या विभागातुन देण्यात याव्यात. सगळीकडुन फिरुन एखाद्या नगरसेवकाची जी परिस्थिती होते, तर सामान्य नागरिकाची परिस्थिती काय होणार आहे एक खिडकी योजना न बनता प्रत्येक विभागात ह्या एन.ओ.सी देण्यात याव्यात.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर शहरामध्ये आपले अनेक विभाग आहेत त्यामध्ये ए.टी.पी विभाग आहे, आरोग्य विभाग आहे. अशा विभागामधुन अभिप्राय मागायचा पुर्ण महाराष्ट्राची योजना आहे की, एक खिडकी योजना सर्वसामान्य जनतेला सहज सुविधा उपलब्ध व्हावी अशा योजना असतांना आपण ही प्रोसिजर अवघड करत चाललेले आहोत. आता जे डिपार्टमेंट एन.ओ.सी देत आहेत त्या आपण रद्द करणार त्याचा अभिप्राय मागणार पुन्हा अधिक्षकाचे एक टेबल वाढवणार, उपायुक्ताचे एक टेबल वाढणार म्हणजे अनेक टेबल फक्त वाढवत जायचे आणि सर्वसामान्य जनतेला त्रास द्यायचा हा प्रकार इथे दिसतो त्यासाठी जी प्रोंसीजर चालु आहे त्या त्या विभागाने एन.ओ.सी देउन त्यांची जबाबदारी राहील या परवान्यावर कोणीही अधिकारी येतो आणि जबाबदाऱ्या घेतो आपल्या सर्व विभागावर मा. उपआयुक्त इन्चार्ज आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मी, मा. आयुक्तांना विचारतो सदस्यांनी ज चा प्रस्ताव आणला या सगळ्या वादळी वातारवणामध्ये होय म्हटले की, सगळे भागले की, बरोबर आहे. तुमचे मत काय आहे? म्हणजे कोणीतरी सांगितले की, इकडुन उचला आणि तिकडे न्या. ही बोरांची टोपली आहे का? काय चालले आहे हे आम्हाला समजत नाही. प्रशासनाची त्याच्यात भुमिका काय? काही तांत्रिक अडचणी येतील नाही येतील. नियमात आहे नियमात नाही त्याचे अधिकारी नियुक्त आहेत, नाहीत हे डिपार्टमेंट काढा तिकडे द्या. ते डिपार्टमेंट काढा तिकडे द्या. आणखीन एक केबीन खोला. केबीन खोलली की त्याला असिस्टंन्ट द्या .प्रशासनाची भुमीका काय आहे? आम्ही एखादे साधे काम आणले की, तुम्ही सांगता पैसे नाहीत. प्रोव्हीजन नाही हे कामकाज कशा पध्दतीने चालले आहे. काहीतरी तारतम्य आहे की, नाही?

**रतन पाटील :-**

प्रशासनाने आपली भुमीका सादर करावी. खुलासा करावा.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, मागे जो कॅम्प लावला त्याच्यामध्ये काहीच एन.ओ.सी लायसन्स वगैरे देण्यात आले नाही. फक्त तीन - चार ठिकाणी कॅम्प लावला.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

असा धोरणात्मक निर्णय करण्यापुर्वी प्रशासनाकडुन गोषवारा घेउन, त्यावर सविस्तर चर्चा होवुन आणि असलेल्या कामकाजामधील काही त्रुटी आहेत त्याचा अभ्यास करुन निर्णय झाला तर त्यांची चांगल्या प्रकारे अमंजबजाणवी होउ शकते जरी ज खाली निर्णय झाला तरी मा. आयुक्त अमंलबजावणी करण्यापुर्वी तपासुन पाहतील.

**एस. ए. खान :-**

व्यवस्थित करा ना. रितसर गोषवारा द्या माहिती द्या नंतर करा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांनी रुलिंग द्यावे.

**प्रकाश दुबोले :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी ज चे प्रस्ताव आणतांना आपण सर्वांनी विचार करावे. सर्व कायदेशीर गोष्टींची माहिती घेउन आपण ज चे प्रस्ताव आणा. आपला जर एखादा अधिकारी , कर्मचारी सांगता आणि आपण त्याच्या फायद्यासाठी प्रस्ताव आणतो ही बाब पण गंभीर आहे. आपण सर्व सदस्यांनी या गोष्टीचा विचार करायला पाहिजे की आपण जो प्रस्ताव आणतो तो योग्य आहे का? संबंधित खात्याच्या अधिकाऱ्याला विचारावे कोणीतरी अधिकारी बोलले प्रस्ताव टाका की आपण प्रस्ताव टाकतो मग त्यांचे त्यांचे कर्मचाऱ्यांमध्ये वाद होतात प्रत्येक सदस्यांनी या गोष्टीचा विचार करावा.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, एक एक्झाम्पल है। हमारे मित्र ने एक फ्लॅट बेचा है। उसका एन.ओ.सी को आज बीस दिन हो गया वो चक्कर काट रहा है। ये ऑफिस मे जाओ इधर जाओ, उधर जाओ। पिउन भी पेपर दबा कर रखता है ऐसा काम चलता है। तो एक ही अधिकारी को ऐसा अधिकार दो की उसका साइन हो गया तो काम खत्म हो जाए वो बिचारा फ्लॅट बेच रहा है मेन्टनेस रसिद है और क्या चाहिए तो इस तरह

से परेशानी होती है तो एकही अधिकारी को अधिकार दिजीए की पब्लीक को चक्कर काटना नही पडेगा काम फटाफट हो जाऐगा।

**एस. ए. खान :-**

दुकानाची एन.ओ.सी द्यायची आहे तर इकडे जा तिकडे जा.

**रतन पाटील :-**

म्हणुन प्रत्येक विभागाने जे विभाग आहेत तर विभागावर एन.ओ.सी देण्यात यावी कशाला इकडे तिकडे प्रत्येक विभागाने प्रत्येकाची एन.ओ.सी द्यावी.

**एस. ए. खान :-**

ज्या दुकानांची एन.सी आहे त्यांना तरी द्यायला पाहिजे.

**शशिकांत शहा :-**

मा. महापौर मॅडम, यह परवाना विभाग खोलने की जरुरत नही है। उसको भी बंद कर दो ना परवाना विभाग क्यों खोला हुआ है। जब परवाना विभाग को चार्ज किया हुआ है तो परवाना विभाग क्यों खोला है? सब डिपार्टमेंट एन.ओ.सी देंगे जब उस विभाग का परमिशन लेकर उनको एक ही जगह से एन.ओ.सी मिले जिससे किसी आदमी को कही पर जाना नही पडेगा एक ही जगह वह सब काम हो सकता है।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, १७ नोव्हेंबर २००६ ला एक असाच ज चा प्रस्ताव आपण सभागृहापुढे......

**एस.ए.खान :-**

मा. महापौर महोदया पाच सहा महिने झाले पाण्याची टंचाई चाललेली आहे.

**रोहित सुवर्णा :-**

ज प्रस्तावाची जी प्रथा चाललेली आहे ज्या ज्या लोंकांनी ज प्रस्ताव आणलेले आहेत. त्या त्या लोकांनी कधीतरी प्रशासनाला लेखी पत्र दिलेले आहे का? त्यांची चौकशी करण्यात यावी. जर प्रशासनाने त्याचा काम केल नसेल तर ज प्रस्तावात ते आणु शकतात हा नियम आहे ज प्रस्ताव संबधी त्या सदस्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे का? जर केलेला नसेल तर आपण हा ज प्रस्ताव रद्द करु शकता आपण याची चौकशी देखील प्रशासनाकडे केलेली नाही. आणि नेहमी सर्वानुमते ठराव मंजुर असे बोलता गेल्या वेळी सन्मा. नगसेवक श्री. महेंद्रसिंग चौहाण यांनी सतरा नोव्हेंबरला असाच एक ज प्रस्ताव आणला उद्यान अधिक्षक या पदाच्या डीग्रीमध्ये बदल केला होता. डिग्री चालेल की डिप्लोमा चालेल अशा प्रकारचा ठराव होता. त्याच्यावर आपण रुलिंग काय दिले आहे ते बघा. सदर ठरावाचे इतिवृत्तांत मंजुरीसाठी वाट न पाहता तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी अशा पध्दतीचा ठराव कधीच होत नाही. असे असेल तर मग इतिवृत्तांताची गरज काय आहे? आपण इतिवृत्तांत मंजुर कशाला करायचे?

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, पक्षीय भुमिका म्हणुन आम्ही मिळेल त्या ठिकाणी सहकार्य करु. पण नियमबाह्य काम असेल तर आमच्या पक्षाची भुमिका नक्की राहील की, नियमानुसार काम करा. प्रत्येक प्रोसिडींगमध्ये मी हे आणणार. कोर्टाचे, शासनाचे जे निर्देश असतील त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण या सभागृहामध्ये बोललात की माझी सही नाही त्या प्रकरणामध्ये देखील मा. आयुक्तांना मंत्रालयामधुन एक पत्र आले की, इतिवृत्तांत मंजुर झाल्याशिवाय शासनाकडे कुठलाही ठराव पाठवु नये. अशा प्रकारचे घोळ असतात. प्रत्येक ज प्रस्तावामध्ये प्रशासनाची भुमिका काय आहे? प्रशासनाचे म्हणणे काय आहे? ह्या गोष्टीकडे लक्ष द्या कुठल्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होउ नये.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शहा यांनी जो ज चा प्रस्ताव आणलेला आहे त्या संबधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता हा ज चा प्रस्तावावरील विषय गोषवाऱ्यासहित पुढील मिटींगमध्ये घेण्यात येईल.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, याच्या आधी आपण जे दोन तीन ज प्रस्ताव मांडले त्याच्याबद्दल संबधित नगरसेवकांनी प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला आहे का?

**मा. महापौर :-**

आधिचे दोन मंजुर केलेले आहेत. ते दोन विषय वेगळे आहेत आणि हा विषय वेगळा आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, अशा प्रकारचे ठराव हे बेकायदेशीर असतात.

**प्रभात पाटील :-**

ठराव बेकायदेशीर कसे होउ शकतात?

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, या गोष्टीकडे लक्ष द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहित सुवर्णा यांनी पत्रव्यवहार केलेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

प्रशासनाची भुमिका काय हे प्रशासनाने सांगावे.

**रोहिदास पाटील :-**

आमच्या माहिती नुसार जे ज प्रस्ताव येतात ते प्रस्ताव स्विकारल्यानंतर त्या ज च्या प्रस्तावावर प्रशासनाने त्यांचे मत मांडले पाहिजे की हे अभ्यास केला आमचे असे मत आहे तेव्हा ही सभा निर्णय घेते अन्यथा पक्ष म्हणुन आम्ही सांगणार की, कोर्टाचे निर्देश शासनाचे निर्देश याचा अभ्यास करुन त्याच्यावर अमंलबजावणी करावी अशी आमची पक्षाची भुमीका आहे.

**शशिकांत शहा :-**

ज के जितने सवाल है सबको अगली मिंटीग मे ले लो।

**मिलन म्हात्रे :-**

ज चे प्रस्ताव म्हणजे सत्ताधाऱ्यांची काम शासनाकडुन प्रशासनाकडुन होत नाही. त्याचा परिणाम म्हणजे ज चा प्रस्ताव ज चा प्रस्ताव हे आमचे विरोधकांचे हत्यार आहे सत्ताधाऱ्यांचे नाही. मला आठवते सन्मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहेब एकदा सभागृहात बोलले होते की, म्हात्रे साहेब तुम्ही ज चा प्रस्ताव दिला आता सगळे नगरसेवक शिकतील आणि ज चा प्रस्ताव सर्वात प्रथम मी मांडला आणि आमचे लिगल असुनसुध्दा प्रशासनाने फेटाळले.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही आपल्या पत्रात मा. महापौर मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. स्थायी समिती सभापती या सर्वांना पत्र देउनच विषय घेतलेला आहे.

**प्रकरण क्र. १२१ :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत आर. शाह यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारे सर्व परवाने (एन.ओ.सी.) मार्केट परवाना विभागामार्फत देणेबाबत.

**ठराव क्र. ९२ :-**

प्रकरण क्र. १२१ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३ व ३७६ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील उद्योग व्यवसाय धारकांना परवाना द्यायची परवानगी सुरु केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे. मात्र विविध प्रकारच्या उद्योग व्यवसायधारकांना महापालिकेच्या विविध विभाग परवाना देत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. वास्तविक सर्व प्रकारचे परवाने, एन.ओ.सी. हे महानगरपालिकेचे मार्केट परवाना विभागामार्फत देणे आवश्यक आहे. या उपर विविध व्यवसाय धारकांना परवाना, एन.ओ.सी. मिळणेकरीता अट दिल्यानंतर संबंधित विभागाचे अभिप्राय देवून त्यांना परवाने, एन.ओ.सी., मार्केट परवाने देण्यात आले. परस्पर इतर विभागाने परवाने देवू नये असा मी ठराव मांडतो

**सुचक :- श्री. शशिकांत शाह.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण वरचे दोन ठराव सर्वांनुमते मंजुर केलेले आहेत. सभागृहामध्ये मी एक निषेधाचा ठराव मांडत आहे. काल अटहारी एकस्प्रेसला जी समझौता एक्स्प्रेस म्हणुन दोन देशातल्या सामंतस्य करारावर आधारीत म्हणुन भारत आणि पाकीस्तान दरम्यान धावते आहे. त्या एक्स्प्रेसवर काल कधी घातकी शक्तीनीं विनाशक शक्तींनी बॉम्बस्फोट घडवुन आणले आणि त्यामध्ये सदुसष्ट लोकांचे बळी गेलेले आहेत. आणि कित्येक लोक जखमी झालेले आहेत. या विध्वंसक कार्याबद्दल ज्यांनी हे कृत्य केलेले आहे त्यांच्या निषेधाचा ठराव मी इथे मांडत आहे आणि मृत आत्म्यांना शांती लाभावी त्यासाठी हे सभागृह दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन त्यांना श्रध्दांजली अर्पण करेल असा मी ठराव मांडते.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री प्राध्यापक श्री. सदानंद वर्दे साहेब तसेच श्री. अमित विलास विचारे हे नालासोपारा येथे राहतात पण श्री. विलास विचारे यांचे सुपुत्र आहेत त्यांचे देखील या दरम्यान निधन झालेले आहे.

**दुःखवटा ठराव ९२(अ) :-**

काल अटहारी एकस्प्रेसला जी समझौता एक्स्प्रेस म्हणुन दोन देशातल्या सामंजस्य करारावर आधारीत म्हणुन भारत आणि पाकीस्तान दरम्यान धावते आहे. त्या एक्स्प्रेसवर काल काही घातकी विनाशक शक्तींनी बॉम्बस्फोट घडवुन आणले आणि त्यामध्ये सदुसष्ट लोकांचे बळी गेलेले आहेत. तसेच महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री प्राध्यापक श्री. सदानंद वर्दे साहेब तसेच श्री. अमित विलास विचारे हे नालासोपारा येथे राहतात पण श्री. विलास विचारे यांचे सुपुत्र आहेत त्यांचे देखील या दरम्यान निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करून दुःखवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- प्रभात पाटील.** **अनुमोदन :- प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन मृतात्म्यास श्रध्दांजली द्यायची आहे.

(सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन मृतात्म्यास श्रध्दांजली अपर्ण केली.)

**मा. महापौर :-**

आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असुन सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग आपले सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहिर करते.

**(सभा संपल्याची वेळ दू. ३.०० वा.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**